म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 2015

# कीर्तिरूपे उरावे

★

अेलिस फ्लेमिंग

REFBK-0015921

१८१६

निबंध

७४६९३
९३।३।०७

२०१८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
अनुक्रम ७४६९३ वि: निबंध
स्थळक्र. २०१८ नों दि ९३।३।०७

कीर्तिरूपे उरावे

# कीर्तिरूपे उरावे

लेखक

**ॲलिस फ्लेमिंग**

❀

अनुवादक

**स. के. श्रोत्री**

REFBK-0015921

१५८२९

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड
३, राउण्ड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई – २.

Copyright © 1965 by Alice Fleming
'GREAT WOMEN TEACHERS'
By Alice Fleming
Originally published by J. B. Lippincott Company

प्रथम आवृत्ती
१९६७

* *

मूल्य रु. २·००

* *

प्रकाशक :

अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लि. प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता,
मुंबई २.

मुद्रक :

अनंत जे. शाह,
लिपिका प्रेस, कुर्ला रोड,
अंधेरी, मुंबई ५९.

# प्रास्ताविक

* * *

स्त्रियांचे शिक्षण ही बहुधा प्रत्येक देशातील समस्या होती. कोणीतरी पुढाकार घेऊन ती सोडविण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रात स्त्री-शिक्षणाचा विषय निघताच महर्षि कर्वे यांचे नाव चटकन आपल्या डोळ्यासमोर येते. परंतु अमेरिकेतील—आजच्या आधुनिक जगातील सुधारणेच्या शिखरावर असलेल्या देशातील—स्त्रियांच्या शिक्षणाचे श्रेय मुख्यतः स्त्रियांकडेच जाते असे दिसेल.

या पुस्तकात एमा हार्ट विलर्ड, एलिझबेथ पामर पीबॉडी, मार्था बेरी आदि दहा स्त्रियांची शैक्षणिक क्षेत्रातील कर्तबगारी सांगणारी शब्दचित्रे रेखाटलेली आहेत. एमा हार्ट विलर्डने सर्व प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितीस तोंड देऊन अमेरिकेतील स्त्री-शिक्षणाचा पाया घातला आणि देशाला उत्तम शिक्षक पुरविले; हे यातील पहिल्या स्त्रीचे वैशिष्टच; तर शेवटच्या चरित्रातील स्त्रीची कर्तबगारी याहून अगदी निराळी ! व्हर्जिनिया गिल्डरस्लीव्ह यांनी बर्नार्ड महाविद्यालयाच्या प्रमुख म्हणून केलेली कामगिरी ही गौरवास्पद आहेच; परंतु आंतरराष्ट्रीय सलोख्याच्या दृष्टीने शैक्षणिक क्षेत्रांत राष्ट्रसंघाच्या द्वारे त्यांनी केलेली कामगिरी अलौकिक म्हटली पाहिजे. या पुस्तकांतील इतरहि आठ थोर स्त्रियांचें अध्यापनक्षेत्रामधील कर्तृत्व अमेरिकेच्या इतिहासांत अविस्मरणीय आहे.

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | एमा हार्ट विलर्ड | ९ |
| २. | मेरी लायन | २४ |
| ३. | एलिझाबेथ पामर पीबॉडी | ३७ |
| ४. | ॲलिस फ्रीमन पामर | ४९ |
| ५. | मेरी मॅकलिऑड बीटन | ६१ |
| ६. | ॲलिस मॉरिसन नॅश | ७४ |
| ७. | एला फ्लॅग यंग | ८६ |
| ८. | मार्था बेरी | ९८ |
| ९. | फ्लॉरेन्स डन्लॉप | ११२ |
| १०. | व्हर्जिनिया गिल्डरस्लीव्ह | १२३ |

दा.क्र. ९५८२९ (स्थळ प्रत)

# १ : एमा हार्ट विलर्ड

"निर्वाहः प्रतिपन्न वस्तुषुः" हाती घेतलेलें काम तडीस न्यावयाचे या निर्धाराने वागणारी स्त्री तुम्ही पाहिली आहे का ? फ्लॉरेन्स नाइटींगेल ही त्यांपैकी एक होती; तशीच क्लेअरा बार्टन आणि अनेकांना जरी माहीत नसली तरी एमा विलर्ड ही एक त्याच जातीची स्त्री होती.

एखादी स्त्री दृढनिश्चयी कशी होते ह्याचा आधींपासून अंदाज करणें नेहमीच सोपे नसते. पण एमा विलर्ड ही लहानपणापासूनच निश्चयी स्वभावाची मुलगी होती हे खरे. तिने आपल्या आयुष्यांत शाळेत न जाण्याचा निर्धार केला होता. हे मात्र थोडेसे चमत्कारिक होते.

एमाचा जन्म १७८७ साली कनेक्टिकट वसाहतीत बर्लिन शहरामध्ये झाला. नुकतेच अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध संपले होते. फारच थोड्या राज्यांमध्यें सरकारी शाळा होत्या. ज्या काही शाळा होत्या त्यांमध्यें प्रवेश होता फक्त मुलांनाच ! मुली मात्र घरीच जरूरीपुरते शिक्षण घेत. पण रविवारचें प्रार्थनापुस्तक वाचण्यास येण्याइतपतच त्या शिक्षणाची मर्यादा होती.

मात्र ज्या वसाहतींनीं पहिल्यांदाच सरकारी शाळा स्थापन केल्या त्यांत कनेक्टिकटची वसाहत होती. उन्हाळ्यामध्यें ज्यावेळेला मुलगे शेतावर काम करीत असत त्यावेळी ती शाळा मुलींकरिता खुली असे. कालांतराने मुली बारमाही त्या शाळेंत जाऊ लागल्या.

एमा वर्दिंगटन सेंटरमधल्या सरकारी शाळेंत जाऊ लागली. शाळा म्हणजे एक जुनीपुराणी खोली होती. तिथें ती वाचावयास शिकली. बेरजा–वजाबाक्या व अक्षरे गिरवू लागली. तिच्याकरिता शाई घरीच तयार केलेली असे आणि टांक, हंसीच्या पिसाचा शिक्षकांनीच बनविलेला.

एक दिवस दुपारी एमाचे वडील सॅम्युअल हार्ट बातमी घेऊन घरीं आले कीं 'वर्दिगटनसेंटरमध्ये एक नवीन शिक्षणसंस्था उघडत आहेत.

डॉ. टॉमस मायनर हे येल युनिव्हर्सिटीचे पदवीधर आहेत. आणि ते शिक्षक म्हणून येत आहेत." ते पुढे म्हणाले, "या संस्थेत मुलांच्या बरोबर मुलींनाही प्रवेश आहे. सरकारी शाळेत एमा जे शिक्षण घेत आहे ते तिला तिथेही चालू ठेवता येईल."

नवीन शाळेंत जायचे म्हणजे एमाला आनंद झाला असता; पण आतां मात्र तिला तसे वाटले नाहीं. ज्या आठवड्यांत नवीन शाळा सुरू होणार होती, त्याच आठवड्यांत मेरी ली, या आपल्या लग्न झालेल्या बहिणीच्या घरी जाण्याचे ती मनोराज्य करीत होती. मेरी लीच्या मुलींबरोबर खेळणें तिला फार आवडे.

"मला खरोखरीच शाळेंत जावेसें वाटत नाहीं." एमा आपली बहीण नॅन्सी हिच्याबरोबर त्या दिवशीं संध्याकाळी उबदार दुलई पांघरून बसली असतांना कुजबुजत होती, "मी शाळेत न जाता मेरीकडे गेले तर आईबाबा रागावतील का ?"

नॅन्सी अर्धवट झोपेत कुजबुजली, "मला नाहीं बाई माहीत ! तूं आपली त्यांनाच विचार."

"तें तर आतां मी करणार आहेच !" असं म्हणत दुलईतून बाहेर येऊन ती आई-वडिलांच्या खोलीकडे गेली.

"आई बाबा" तिनें हाक मारली.

"आंत ये. काय गडबड आहे एमा? " मिसेस हार्टनी विचारले.

एमाने विचारले, "ज्यांना शाळेत जाणें आणि शिक्षण घेणें आवडत नाही त्यांना शाळेत पाठविणे हा त्यांच्यावर अन्याय नाहीं काय ?"

"म्हणून तू एवढ्या मध्यरात्रीं आम्हाला उठविलेंस होय ?" सॅम्युअल हार्टनी तिला जरा जोरातच विचारले.

आपल्या मनांतील विचार बोलून दाखवीत ती म्हणाली, "मी विचार करीत होते. पुढील आठवड्यांत मी शाळेंत जाण्याऐवजी मेरीकडे गेले तर ?"

तिची आई लिडिया हार्ट म्हणाली, "म्हणजे काय एमा ? मला तर वाटलें कीं, आपलं शिक्षण चालू ठेवण्याला तूं उत्सुक असशील."

सॅम्युअल हार्ट आपल्या बिछान्यावर बसले होते. त्यांच्या चेहेऱ्यावर एमाच्या हातातील मेणबत्तीचा प्रकाश पडला होता. पण ते शांत होते. "शिक्षणांत ज्याचें मन रमत नाही, किंवा ज्याला शिक्षणाची किंमत कळत नाहीं ते त्यावर लादावें असें मला बिलकुल वाटत नाही." आपल्या करारी आवाजांत ते म्हणाले, "तुला मेरीकडे जावेसें वाटत असेल तर खुशाल जा. पण आत्तां मात्र आपण झोपी जाणार."

इकडे नॅन्सी आपल्या पांढऱ्या शुभ्र युनिफॉर्मला इस्त्री करत होती, तर एमा केन्सिंगटनला मेरीकडे जाण्याच्या तयारीत आपली बॅग भरीत होती.

पुढल्या आठवड्यांत एमा आपल्या बहिणीच्या घरून परत आली. आपला शाळेत न जाण्याचा बेत योग्य आहे किंवा नाही याचा विचार तिच्या डोक्यांत सारखा घोळत होता. त्यातच नॅन्सीच्या हातांत तिनें भूगोलाचे नवीन पुस्तक पाहिलें.

"जगांतील सर्व खंडे व महासागर यांची माहिती आम्हांला डॉ. मायनर देत आहेत. त्यांच्यापाशी सुंदर सुंदर मोठाले नकाशे आणि तक्ते आहेत." नॅन्सीने एमाला सांगितलें आणि पुढे म्हणाली, "आम्हांला ते इतिहास, गणित पण शिकवणार आहेत."

एमाला आतां निराळेंच वाटावयास लागले. "आई ! आई !" म्हणून ती मोठ्याने ओरडली; तशीच वेगाने जिन्यावरून धडधडत आईकडे स्वैपाक-घरांत गेली.

आई चरक्यावर सूत काढीत होती. एमाला काय म्हणून विचारण्याच्या आंतच एमाने एका दमांत मोठ्या आवाजांत जाहीर केले, "आई उद्यांपासून मी शाळेत जाणार आहे."

"पण एमा" आई म्हणाली, "मला वाटले तूं शिकायचं नाही असा मनाशी निर्धार केला आहेस. त्यातून तुझे कपडे तर किती वाईट आहेत. आणि शनिवारपासून तू शाळेत जाणार हे कसं शक्य आहे ?"

एमा ओरडली, "मी जाणारच ! अगदीं म्हणजे जाणारच !" आणि दुसऱ्या दिवशी एमा नवीन शिक्षणसंस्थेत दाखल झाली.

डॉ. मायनरनीं तिला पहिल्या दिवशीच सांगितले, "इतर मुलांच्या-बरोबर येईपर्यंत कांही दिवस मागे राहिलेला अभ्यास तुला स्वतःच करावा लागेल."

एमाने मनाशी ठरवून टाकले कीं, कांहीही झाले तरी वर्गाच्या मागे राहावयाचे नाही. एके दिवशी रात्रीं लिडियाने–तिच्या वहिणीनें–आपल्या कांहीं मैत्रिणींना बोलावले होते. तेव्हां एमाने आपली पुस्तकें घेतली आणि कडाक्याची थंडी असतांना सुद्धां ती खुशाल चांदण्यात बसून अभ्यास करूं लागली.

स्वयंपाकघराशेजारच्या एका झाडाशी ती अंगाची घडी करून वसली. आपला लोकरीचा झगा तिने कसाबसा अंगाभोवतीं गुंडाळला होता व मॉर्सच्या भूगोलाचे पुस्तक छातीशी घट्ट आवळून धरले होते.

अंधार पडला होता. कडाक्याची थंडी पडली होती. मधून मधून शेजा-रच्या तीन मजली घरांतल्या खिडक्यांतील लुकलुकणाऱ्या दिव्यांकडे ती बघत होती. त्याच घरांत तिचा जन्म झाला होता. आंत कांही मुली गाणी म्हणत होत्या त्यांचे आवाज तिच्या कानावर पडत होते. ती मनाशी म्हणाली, "आंत किती ऊबदार असेल शेगडीशीं ! कुणी सायडर पीत असतील, कुणी कांही खात पण असतील."

निर्धारानें आपले लक्ष घरापासून तिनें वळविले आणि कनेक्टिकटच्या काळसर टेकड्यांकडे नजर टाकून ती मनाशी म्हणाली, "त्याच्यापेक्षां आपला अभ्यास हेच महत्त्वाचें आहे." आणि पुन्हा एकदा भूगोलाचा पाठ वाचूं लागली.

नऊ वाजायला आले होते. पुस्तके मिटून ती घरांत परतली. तिच्या वहिणीच्या मैत्रिणी केव्हांच निघून गेल्या होत्या. वडील सॅम्युअल हार्ट आणि आई लिडिया स्वैपाकघरांत शेकोटीपाशीं बसले होते.

"अग एमा थंडीने किती गारठलीस ?" आपल्या हातातल्या विणकामा-वरून नजर वर करीत आई म्हणाली, "अग घरांत शेकोटीपाशी बसून नाहीं का अभ्यास करायचा ?"

एमाने मानेनेच नकार दिला आणि म्हणाली, "लिडियाकडे तिच्या मैत्रिणी आल्या होत्या आणि मी घरांत बसले असते तर त्यांच्यांत मलाही खेळावे लागले असते नाही का ?"

सॅम्युअल हार्टनी तिच्याकडे पाहून म्हटले, "म्हणजे तुला पार्टीपेक्षां भूगोल अधिक आवडतो तर ?" जरा आश्चर्यानें आणि मिस्किल आवाजांत म्हणतात कसे, "मला वाटतं शिक्षण न घेण्याचा तूं निश्चय केला होतास."

ती चिमुरडी पोर हासत म्हणाली, "मी माझे मत वदललें आहे. सर्वांत उच्च शिक्षण घेतल्याशिवाय मी आतां थांबणार नाही. कनेक्टिकटमधील सर्वांत मोठी विदुषी मी होणार आहे."

डॉ. मायनरच्या वर्गांत प्रवेश केल्यानंतर तीनच दिवसात ती वर्गाच्या वरोबर आली आणि लवकरच तिनें सर्वांपुढें मजल मारली. तिची बुद्धिमत्ता ओळखून डॉ. मायनरनी तिला स्वच्छ विचार करण्याला तसेच लिहिण्याला उत्तेजन दिले. बर्लिनच्या शिक्षणसंस्थेत व्यतीत केलेल्या दोन वर्षांचा उल्लेख ती नंतरच्या आयुष्यांत वारंवार करीत असे. ती म्हणे, "त्या काळी आपल्या देशाइतके उत्कृष्ट शिक्षण दुसऱ्या कुठेही उपलब्ध नसेल असे मला वाटतं !"

वयाच्या १७ व्या वर्षी वर्दिंगटनसेंटरमधील डॉ. मायनरची शाळा तिनें सोडली आणि त्याच खेड्यांत एका शाळेत शिक्षिकेचा पेशा पत्करला.

तिनें असेही एकदा उद्गार काढले कीं, "पहिल्यानेच जेव्हां मी हा पेशा पत्करला त्यावेळेस मला अशी कल्पनाही नव्हती कीं मधला थोडासा काळ सोडला तर मी हा मार्ग चाळीस वर्षे आक्रमण करीन."

शिक्षिका म्हणून पहिल्या दिवशीची तिची सुरवात अगदी निराशेची झाली. एका वर्गावर तिला नेमले. पूर्वीच्या शिक्षिकेने त्या वर्गाला शिस्त लावण्याचा प्रयत्न कधीच केला नव्हता. शाळा अगदी हमरस्त्यावर हार्टफर्ड आणि न्यू हेव्हनकडे जाणारे रस्ते फुटतात तिथे होती. आणि विद्यार्थांचे लक्ष शाळेंतील अभ्यासापेक्षा रस्त्यावरील रहदारीकडेच अधिक ओढलें जात असे. कांहीं मुलें तर इतकी उनाड होती कीं त्यांचे समाधान खिडकीतून दिसणाऱ्या

देखाव्यानें होत नव्हते. ती शाळा चालू असतानासुद्धा वर्गाबाहेर भटकत असत. कांही विद्यार्थी शाळेभोवती असलेल्या तुतीच्या बागेत खेळण्यात दंग असत.

वर्गांत प्रवेश करून खुर्चीवर बसतांच एमाच्या लक्षांत आलें कीं, आजची सकाळ आपल्या आयुष्यांत अविस्मरणीय ठरणार.

तिनें विचार केला, "यांतून मी कशी पार पडणार ?" पण ती मोठ्याने मुलांना म्हणाली, "बाळांनो ! आतां आपण आपल्या कित्त्यांना सुरवात करूं या !"

तीन किंवा चार मुलांनीच पुस्तके उघडली. बाकीच्या सर्व वर्गाने तिच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केले आणि आपापल्या पाटयांवर चित्रें काढीत बसली. एक मुलगा तर उठून थेट दरवाजापर्यंत गेला आणि रस्त्यावरील घोडागाडीची गंमत पाहूं लागला. दुसऱ्याने वर्गातील बाकावरून उडी मारली आणि खिडकींतून तुतीच्या उद्यानात पलायन केले.

"बाळांनो ! शांत रहा." टाळ्या वाजवून तिनें इशारा केला पण व्यर्थ.

अखेर मधल्या सुटीची वेळ आली आणि ही नवशिक्षिका खुर्चीवर मान टाकून दमून भागून स्वस्थ बसली. ती इतकी थकली होती की, मिसेस पेक दरवाजांत दिसल्या तरी त्यांचे स्वागत ती करू शकली नाहीं. मिसेस पेकनीच तिची शिक्षिका म्हणून शिफारस केली होती. तिची विचारपूस करण्याकरिता तिच्या वर्गाकडे त्या येत होत्या.

ती कण्हत म्हणाली, "काय दारुण प्रसंग आजचा ? या मुलांना कसं वळण लावावं आणि काय शिकवावं हेच कळत नाहीं. मुलं मुली ऐकतच नाहीत. उपदेश व युक्तिवाद यापलीकडची आहेत ती."

"या मुलांना छडीचीच जरुरी आहे. चांगला मार बसला कीं मग त्यांना कळेल कीं हा वर्ग कोणाच्या ताब्यांत आहे." मिसेस पेकनी तिला कानमंत्र दिला.

एमा घाबरली. "छेः छेः तें नाही जमणार. कधीही आजतागायत कोणत्याही मुलाला मी मारलें नाहीं." ती म्हणाली.

मिसेस पेकनी स्पष्ट शब्दांत बजावले, "हाच एक मार्ग आहे. चोपच पाहिजे त्यांना."

दुसऱ्या दिवशी सकाळी त्या वात्रट मुलांच्या वर्गावर ती गेली. मिसेस पेकचा मुलगा जेस हातांत पांच छड्यांचा जुडगा घेऊन आला व म्हणाला, "आईने या तुमच्याकरतां पाठवल्या आहेत."

उद्विग्न मनःस्थितीत तिनें त्यांतली एक छडी उचलली आणि मुलांना दाखवून म्हणाली, "हे पहा, जरूर पडली तर हिचा उपयोग केल्याशिवाय मी राहणार नाही."

क्षणभर वर्गांत शांतता पसरली. एक तरुण मुलगा आपल्या जागेवरून वेडरपणें उठला. एमाने त्याला तात्काळ पकडला. हातातील छडीनें त्याच्या पाठीवर सपासप फटके मारून त्याला जागेवर परत पाठविले.

"बाळानों! मी येथे तुमच्या कल्याणाकरतां आले आहे हे तुम्हाला समजत नाही?" एमाने त्यांना आर्जवून सांगितले, "ज्ञानार्जनाने तुमचा जसा फायदा होईल तसेच तुम्ही या देशाचे सुखी नागरिक पण व्हाल. तुम्ही लक्ष दिले नाहीं, तर मी तुम्हाला कांहीच शिकवू शकणार नाहीं."

कांही विद्यार्थ्यांनी तिच्या उपदेशाचे मर्म लक्षांत घेतले. पण कांहीं मात्र अडेलतट्टूच होतीं. त्यांनीं जणूं कांहीं नव्या शिक्षिकेची परीक्षाच घ्यावयाचें ठरविले होते. एमा पण आंता चांगली सावरली होती. तिनें छडीचा उपयोग भरपूर केला. थोडीसुद्धा शिस्त बिघडू दिली नाही. दुसरे दिवशी वर्ग शांततेने व शिस्तीने सुरू झाला. सगळे विद्यार्थी तिची आज्ञा निमूटपणें पाळू लागले.

लवकरच एमाने वर्ग आपल्या कह्यांत घेतला व सर्व मुलामुलींना नेटाने अभ्यासाला लावले. थोड्याच दिवसांत तिची शाळा तेथील लोकांचा कौतुकाचा विषय बनली. छडीचा उपयोग वर्गाला शिस्त लावण्याकरिता परत कधीही तिला करावा लागला नाही. याचा त्या तरुण शिक्षिकेला झालेला आनंद अवर्णनीय होता.

त्या शाळेतील एमा हार्टचे यश सर्वांच्या तोंडीं झालें. डॉ. टॉमस मायनरचे हाताखाली ज्या बर्लिनच्या संस्थेत तिनें शिक्षण घेतले होतें त्या शाळेंत प्रमुख म्हणून तिला बोलावणें आले. कनेक्टिकटमधील सर्वोच्च शिक्षण घेण्याचा तिचा विचार होता. त्याप्रमाणें शाळेला सुटी असतांना ती स्वतः शाळेत जाऊं लागली. एक वर्ष तिनें हार्टफर्ड येथें मिसेस पॅटनच्या हाताखाली चित्रकलेचा अभ्यास केला आणि मिसेस रॉइसच्या शाळेत नांव दाखल केले. त्या ठिकाणी तिनें लेखन, वाचन, गणित, भूगोल, फ्रेंच आदि विषयांचा अभ्यास केला. तसेच स्त्रियांना योग्य असें भरतकाम, शिवणकला, नक्षीकाम, रंगकाम व नृत्यकला हेही विषय आत्मसात केले.

आजकालच्या कॉलेजकन्यकांना हे विषय हास्यास्पद वाटतील. पण १८०६ साली मात्र या विषयांचा अभ्यास तरुण स्त्रीला योग्य असाच मानला जात असे. पुष्कळ मुलींच्या बाबतीत तर स्थानिक सरकारी शाळेत शिक्षण मिळणें ही सुद्धां भाग्याची गोष्ट मानली जात असे.

एमाच्या विसाव्या वाढदिवसानंतर, थोडयाच दिवसांत तिला कळलें कीं, व्हरमाँट संस्थानांत मिडलबरी येथे स्त्रियांच्या शाळेत एक जागा रिकामी आहे. तिनें अर्ज केला व तिला चटकन ती नोकरी मिळाली.

मिडलबरी शहर तिला खूप आवडले. दिवसभरच्या श्रमानंतर आणि वर्गांतले काम पूर्ण केल्यानंतर, दररोज आपला संध्याकाळचा वेळ ती संगीत-सभा, व्याख्याने आणि मनोरंजन ह्यांत घालवीत असे. आईवडिलांना लिहिलेल्या पत्रांत ती म्हणते, "मी सकाळी नऊच्या सुमारास शाळेत जाते. तिथे एक-पर्यंत थांबते. घरी परत येऊन घाईघाईनें जेवतें. पुन्हा शाळेत संध्याकाळपर्यंत थांबते. संध्याकाळी घरी आल्यावर घाईघाईनें कपडे करून बाहेर पडते. रात्री दहाला घरी परततें ती इतकी दमून कीं केव्हां झोपेच्या आधीन होते ते कळत नाहीं. सकाळी सातपर्यंत अंथरुणातच असते. मग फाटलले मोजे दुरुस्त करायला जेमतेम वेळ मिळतो."

कनेक्टिकटपेक्षा व्हरमाँट हे रमणीय असले तरी तितकेच थंड ! पुष्कळ वेळेला एमाला बर्फाच्या वर्षावातून शाळेला जावे लागे आणि त्या शाळेच्या

इमारतीत सुद्धा तपमान पुष्कळच थंड असे. कोपऱ्यांत एका टोकाला उबेची शेगडी होती ! आणि थंडी जेव्हां अगदी असह्य होत असे तेव्हां एमा आपल्या विद्यार्थिनींनां प्रादेशिक नृत्यांत गुंतवीत असे.

तिनें आपल्या आईवडिलांना लिहिले, "गोठून टाकणाऱ्या थंडीपासून रक्षण करण्याचा हा एकच मार्ग आहे. वर्गातील पाठ कांहीं काळ बंद ठेवले तरी चालतें."

कांहीं मुली गाणी गात असत. कांहीं टाळ्या वाजवून हातात ऊब निर्माण करण्याचा प्रयत्न करीत. कांहीं उड्या मारीत. अशा तऱ्हेने अंगात ऊब आणून मग आपल्या अभ्यासाला लागत.

वीस वर्षें वयाच्या कोणत्याही आकर्षक तरुणीप्रमाणेंच एमाला नृत्य व पार्ट्या ह्यांमध्यें भाग घेणें अतिशय आवडे. मिड्लबरीमधील तरुणांच्या सहवासांत ती रंगून जात असे. "येथील तरुण पुष्कळसे महाविद्यालयीन शिक्षण घेतलेले आहेत." असें तिनें आपल्या आईला लिहिले.

हुषार, सुशिक्षित आणि वयोमानाने अधिक प्रौढ असलेल्या एमाला साहजिकच आपल्यापेक्षां वयाने थोड्या अधिक असलेल्या पुरुषाचा सहवास प्रिय असे. विधुर असलेले डॉ. जॉन विलर्ड हे तिच्या स्नेह्यांपैकी एक होते. त्यांना चार मुलें होती. त्यांचा वैद्यकीय व्यवसाय चांगलाच चालू होता. पण व्हरमाँटच्या राजकारणांत मुक्तपणें भाग घेता यावा म्हणून त्यांनी तो व्यवसाय सोडून दिला होता.

डॉ. विलर्ड वारंवार तरुण एमाला भेटायला येऊं लागले. आणि लवकरच त्यांनी तिला विवाहाची मागणी घातली. १० ऑगस्ट १८०९ रोजी त्यांचा विवाह झाला. एमाने आपली शिक्षिकेची नोकरी सोडली व मिडलबरीमधील मेन स्ट्रीटवरील डॉ. विलर्डच्या घरांत त्यांची पत्नी म्हणून प्रवेश केला. एका वर्षानंतर तिला पुत्ररत्न झालें. त्याचें नांव तिने जॉन हार्ट विलर्ड असें ठेवले.

मुलांच्या संगोपनात आणि घरच्या कामात तिचा वेळ खर्च होत असला तरी शिक्षणासंबंधीची तिची आस्था कधीच कमी झाली नाहीं. ती स्वतंत्रपणें वाचन व अभ्यास करीत असे. डॉ. विलर्डचा पुतण्या मिडलबरी

कॉलेजांत असताना त्यांच्याच घरी राहात असे. त्याची सर्व पुस्तके तिनें वाचून काढली व आपल्या शंकांनी व उपशंकांनी त्याला बेजार केलें.

मुलांच्या शाळा कशा चालत याची तिला जशी जास्त जास्त माहिती झाली तसे स्त्रियांनासुद्धा शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून दिली पाहिजे याची तिला खात्री पटली.

स्त्रीशिक्षणसंस्था म्हणजे सर्वसाधारण उपयोगाचें जुजबी शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. तिनें आपल्या नवऱ्याला सांगितले, "या देशांतल्या स्त्रियांना खरंखुरं चांगलं शिक्षण घेण्याचा हक्क आहे असं मला वाटतं."

एक दिवस जॉन विलर्ड घाईघाईने घरी आले ते एक भयंकर बातमी घेऊनच. ते संकट विलर्ड घराण्यावर आलें नसतें तर अमेरिकेतल्या स्त्रियांच्या शिक्षणाची आबाळ अनेक वर्षें तशीच चालू राहिली असती.

"स्टेट बँक फोडली गेली आहे आणि चोरट्यांनी अठ्ठावीस हजार डॉलर्स लांबविले आहेत." जॉननी सांगितले.

अनेक लोकांची अशी समजूत होती कीं या चोरीला डायरेक्टर बोर्डच जबाबदार आहे. डॉ. विलर्ड त्या बँकेचे एक डायरेक्टर होते. कालांतरानें डायरेक्टर्स जरी निर्दोषी ठरून सुटले तरी चोरीस गेलेल्या पैशांची भरपाई करावीच लागली. डॉ. विलर्ड यांच्यापाशी असलेली बहुतेक मिळकत तर गेलीच, पण शिवाय त्यांना आपली इस्टेटही गहाण टाकावी लागली.

बदललेल्या परिस्थितीशी एमा आनंदानें समरस झाली. इतकेच नव्हे तर पतीला आर्थिक संकटांत मदत करावयास पुढे सरसावली.

"मी या घरांत एक मुलींची शाळा उघडण्याच्या विचारांत आहे." तिनें पतीला आपला विचार बोलून दाखविला.

"बायकोच्या पैशावर मी मुळीच अवलंबून रहाणार नाहीं." डॉ. विलर्डनें साफ नकार दिला.

"मला अध्यापनाचें कार्य किती आवडते हें तुम्हाला माहीत आहेच. शिक्षणाविषयीची माझी कांहीं विशिष्ट मतं आहेत. ती प्रत्यक्षांत आणण्याची आतां संधीही आली आहे." एमा म्हणाली.

डॉ. जॉनना तिच्या नजरेतील करारीपणा जाणवला असावा. "त्यापासून तुला आनंद मिळत असेल तर माझी कांहीच हरकत नाही." त्यांनीं सरतेशेवटी आपली संमती दिली.

नवीन शाळेची सुरवात १८१४ सालच्या वसंत ऋतूंत झाली. गायन, चित्रकला आणि लेखन या विषयांबरोबर एमाच्या विद्यार्थिनी उच्च गणित, भाषा, तत्त्वज्ञान व इतिहास यांचाही अभ्यास करीत. सुरुवातीला ७० विद्यार्थिनी होत्या. मिड्लबरी कॉलेजच्या कांहीं वर्गांत आपल्या विद्यार्थिनींची सोय व्हावी म्हणून तिनें परवानगी मागितली तेव्हां कॉलेजच्या अधिकाऱ्यांना धक्काच बसला.

कॉलेजच्या प्रमुखांची परवानगी आली नाही. "मुली जर कॉलेजमध्ये जाऊं लागल्या तर ती एक गंभीर घटना घडेल." असें उत्तर आले.

तिचें धैर्य खचले नाही. तिनें स्वतःच कॉलेजचे वर्ग सुरू केले. मुलींची वार्षिक परीक्षा घेतली आणि त्यावेळेस कॉलेजमधील सर्व प्राध्यापकांना हजर राहण्याची विनंती केली.

"माझ्या विद्यार्थिनी कोणताही अवघड विषय विद्यार्थ्यांइतकाच आत्मसात करूं शकतात." तिनें कॉलेजच्या प्राध्यापकांना उद्देशून उद्गार काढले.

उल्हसित झालेली एमा आपल्या मिड्लबरीमधल्या शाळेची प्रगति पाहून स्त्रीशिक्षणाच्या सुधारणेचा आराखडा आखू लागली.

"कदाचित् आता लोकांची खात्री पटेल कीं मुलींना हायस्कुलांत व कॉलेजमध्ये प्रवेश द्यायला हरकत नाहीं." तिनें नवऱ्याला सांगितलें.

तिनें आपल्या हस्तलिखिताची प्रत १८१८ मध्ये न्यूयॉर्कचे गव्हर्नर ड्वाईट क्लिंटन यांचेकडे पाठविली. तिनें आखलेल्या रूपरेषेचा त्यांच्यावर प्रभाव पडला. अॅल्बनी येथें न्यूयॉर्क राज्याच्या कायदेमंडळासमोर आपलें निवेदन सादर करण्यासाठी त्यांनी तिला पाचारण केलें.

कायदेमंडळासमोर झालेलें तिचें भाषण अतिशय प्रभावी होते. वाटरफर्डच्या नागरिकांनी आपल्या गांवामध्ये एक स्त्रीशिक्षण संस्था सुरू करण्याची तिला आग्रहाची विनंती केली. एमाने ती मान्य केली. कायदेमंडळाने त्या संस्थेला

एक जाहीर परवाना दिला. अशा तऱ्हेने स्त्री–शिक्षणाला सरकारी मान्यता दिल्याचें ते पहिलें उदाहरण. इतकेच नव्हे तर कायदेमंडळाने तिच्या शिक्षणसंस्थेला सरकारी मदत देण्याचा कायदाही पास केला. आतापर्यंत मदत फक्त मुलांच्या शाळांकरितांच दिली जात असे.

स्त्रियांच्या समान शिक्षणाच्या हक्काबद्दलचा एमाचा झगडा एवढ्यानेच संपला नव्हता. अनेक प्रमुख नागरिकांनी तिच्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली असली तरी कांहींनी मात्र तिच्या नांवाने बोटे मोडण्यास सुरवात केली. "स्त्रिया जर पुस्तकें वाचूं लागल्या, आणि गणिताचा अभ्यास करूं लागल्या तर स्वैपाकघराचा ताबा कोण घेणार ? कपडे कोण शिवणार ?" असें लोक विचारूं लागले.

"आतां हे लोक गाईवासरांना देखील शिक्षण देतील." एक खाष्ट वृद्ध शेतकरी म्हणाला.

वॉटरफर्ड स्त्री–शिक्षणसंस्थेतील एक मुलगी मेरी क्रेमर हिनें परीक्षेच्या वेळी भूमितीचा सिद्धांत पाठ म्हणून दाखविला तेव्हां प्रेक्षकांच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही.

"तिनें घोकंपट्टी केली असेल" कांहीं लोक कुजबुजले, "स्त्रियांना भूमिती पेलणं शक्यच नाहीं."

ज्यांनीं एमाच्या शाळेला परवाना दिला होता त्या कायदेमंडळाच्या कांही सभासदांनीदेखील नापसंती व्यक्त केली. कायदेमंडळाच्या पुढील बैठकीत एमाच्या शाळेची मदत बंद करण्याचा निर्णय घेण्यांत आला.

हा निर्णय एमाला निश्चितच धक्का देणारा होता. पण तिनें मुलींवर फीचा अधिक बोजा लादावयाचें नाकारलें. पण आर्थिक मदतीच्या अभावी शाळा पुढे चालविणेंही शक्य नव्हतें.

"मी हे कार्य मधेंच सोडणार नाही." तिनें जाहीर केले, "हे कार्य चालू ठेवण्याचा कांहीतरी मार्ग निश्चितच सापडेल."

आठवड्याच्या आंतच न्यूयॉर्क संस्थानांतल्या ट्रॉयशहरांतील कांही जबाबदार नागरिकांकडून तिला पत्र आले. "तुम्ही आपली शाळा आमच्या

शहरांत कां आणीत नाही ?" त्यांनीं विचारणा केली, "तुमच्या शाळेला पाहिजे ती मदत देण्यास आम्ही तयार आहोंत."

"माझ्या योजनेप्रमाणें मी आतां कायम स्वरूपाची शाळा निर्माण करू शकेन असे मला वाटते. परमेश्वरानेंच मला ही संधि दिली आहे." तिनें आपल्या आईला लिहिलेल्या पत्रांत म्हटलें.

एमा विलर्डची स्त्रीशिक्षण-संस्था १८२१ च्या वसंत ऋतूंतच ट्रॉयमध्यें सुरू झाली. शाळेंत सुरवातीला ९० तरुणीनी आपली नावें दाखल केली; २१ तरुणी खुद्द ट्रॉयमधल्या होत्या. बाकीच्या व्हरमाँट, मॅसॅच्यूसेट्स्, कनेक्टिकट येथील होत्या आणि कांही तर ओहाओ, साउथ कॅरोलायना व जॉर्जिया इतक्या लांबून आल्या होत्या.

डॉ. विलर्ड यांची शाळेला खूप मदत झाली. शाळेच्या आर्थिक व्यवहाराचें काम ते संपूर्णपणें पहात असत. त्यामुळें एमाला विद्यार्थिनींकडे आणि त्यांच्या अभ्यासाकडे लक्ष देण्यास भरपूर वेळ मिळत असे.

वसतिगृह नीटनेटके ठेवण्याकडे तिचे विशेष लक्ष असे. तेथे राहाणाऱ्या विद्यार्थिनीना ती याबद्दल अत्यंत दक्ष राहण्यास बजावीत असे. पोशाखाकडे तिनें दुर्लक्ष केलें नाहीं.

"शाळेच्या वेळांत आपल्या विद्यार्थिनींचा वेश साध्या कापडाचा असावा असें मिसेस् विलर्डचे मत आहे." हे वाक्य शाळेच्या माहिती पुस्तकात लिहिलेलें असे. त्याच पुस्तकांत पालकांना सूचना असत. "आईवडिलांनीं व पालकांनीं मुलींना–त्यांच्या पाल्यांना भारी कपडे देऊ नयेत, अंगावर मौल्यवान जिन्नस घालू नयेत व विद्यार्थिनींपाशीं पैसे नसावेत."

पण एमाला सगळ्यांत जास्त आस्था जर कशाबद्दल असेल तर ती विद्यार्थिनींच्या शिक्षणाबद्दल. प्रचलित पाठ्य-पुस्तकाबाबत तिला मुळीच समाधान वाटत नसे. त्यातली विषयाची मांडणी अगदी कंटाळवाणी होती आणि त्यांत विषयाचें प्रतिपादन थोडें आणि पाठांतर मात्र खूप असा प्रकार असे. मुली पुष्कळदां आपल्या पुस्तकांच्या पहिल्या पानावर खालील वचन लिहीत—

कांही पुस्तकांचे करावें वाचन।
अन्यांचे मनन आणि परिशीलन।
बाकी त्यागावी केवळ। अवलोकने ॥

पाठ्यपुस्तकामध्ये सुधारणा घडविण्याचा तिनें निश्चय केला. १८२२ मध्यें विल्यम कॅनिंग वुडब्रिज ह्या लेखकाशीं संपर्क साधून त्याच्या सहकार्याने तिनें भूगोलाचे पुस्तक तयार केलें. ते पुस्तक लवकरच सबंध देशभर वापरलें जाऊं लागलें. पुढें तिनें आणखी पुस्तकें लिहिलीं. या पुस्तकांच्या उत्पन्नातून तिचा बराच फायदा झाला. पुढें तो तिचा एक मोठा आधार होता.

शालेय जीवनांत चांगल्या पाठ्यपुस्तकाइतकेच चांगल्या शिक्षिकेचेही महत्त्व असते.

"शिक्षणसंस्थेतून बाहेर पडल्यावर तुम्ही आपला वेळ व्यर्थ घालवणार नाही अशी माझी खात्री आहे." ती आपल्या विद्यार्थिनींना उपदेश करीत असे, "आज समाजाला चांगल्या शिक्षकांची अत्यंत जरूरी आहे. सुशिक्षित तरुण-स्त्रियांना योग्य असा हा व्यवसाय आहे. या संस्थेने अशा तऱ्हेचे शिक्षण तुम्हाला दिले आहे. अध्यापनाची कला तुम्हाला अवगत झाली आहे."

शैक्षणिकक्षेत्रांत एमाच्या प्रमाणपत्राला खूप महत्त्व प्राप्त झाले. तिच्या शिक्षणसंस्थेतून २०० स्त्रिया शिक्षण घेऊन बाहेर पडल्या. तोपर्यंत सरकारी कॉलेजमधून एकीनेही पदवी प्राप्त करून घेतली नव्हती.

एमाने आपले कार्यक्षेत्र वरच्या वर्गापुरतेच मर्यादित ठेविलें नाहीं. ज्या मुलीला शिक्षिकेच्या पेशाची आवड असेल तिला ट्रॉयच्या शिक्षण-संस्थेत विनाशुल्क प्रवेश असे. अनेकींना कपडयांची व दैनंदिन खर्चाचीही मदत मिळत असे. राष्ट्राला उत्कृष्ट शिक्षिका पुरविण्याचा तिनें ध्यास घेतला होता. तिनें दिलेल्या शिष्यवृत्त्यांची रक्कम ८५००० डॉलर्सपर्यंत गेली.

१८२५ मध्यें डॉ. विलर्ड निवर्तले. एमाने आपले कार्य एकाकी चालूच ठेवले. ट्रॉयची शिक्षणसंस्था उत्कृष्ट कार्याबद्दल प्रसिद्धी पावली. स्त्रियांना उच्चशिक्षण मिळत होते. त्याचा पाया एमा विलर्डनें घातला, हें आता सर्व-मान्य झाले होते. तिनें देशभर प्रवास केला. आपल्या कार्याची माहिती

लोकांना दिली आणि अशाच आणखी स्त्रीशिक्षणसंस्था देशभर स्थापन व्हाव्यात म्हणून तिनें उत्तेजन दिले.

१८३८ साली ती निवृत्त झाली. त्यावेळीं ती मुख्याध्यापिका होती. आपल्या संस्थेचा सर्व भार आपला मुलगा जॉन व त्याची पत्नी सेअरा यांच्यावर तिनें सोपवला. सेअरा ही त्याच शिक्षणसंस्थेतील एकेकाळची हुषार विद्यार्थिनी होती.

निवृत्त झाल्यावरहि शिक्षणाचा दर्जा सुधारण्याचे काम तिनें चालूच ठेवले होते. ती कॅनेक्टिकटमध्यें परत आली. तेथील सरकारी शाळेचे प्रमुख हेन्री बर्नर्ड होते. ते ध्येयवादाने प्रेरित झालेले गृहस्थ होते. त्यांना एमाने खूप मदत केली. आजच्या शालेय जीवनांत पाठ्यपुस्तकें, शालेय ग्रंथालयें आणि शिक्षक या गोष्टी गृहित मानल्या जातात. पण त्याकरिता झगडली मात्र एमा विलर्ड.

आपल्या जीवनाचे अखेरचे दिवस तिनें ट्रॉयमध्ये आपल्याच संस्थेंत घालवले. आपली जीवनयात्रा १८७० मध्ये तिनें शांतपणें संपविली. त्यावेळी तिचे वय ८३ च्या वर होते. १९१० मध्ये या संस्थेचे नामकरण 'एमा विलर्ड स्कूल' असें जाहीर करण्यांत आले. पण ज्या करारी स्त्रीनें त्या संस्थेचा पाया घातला तिला स्त्रियांना समान शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे व आपलें स्वप्न सत्यसृष्टीत उतरले आहे ह्याचें अधिक समाधान झालें असते.

## २ : मेरी लायन

मॅसॅच्यूसेट्स संस्थानांतील साउथ हॅडली ह्या गांवांतल्या माउंट होलिओक कॉलेजच्या आवाराच्या एका शांत कोपऱ्यांत एक साधे थडगे आहे. "मेरी लायन, माउंट होलिओक या शिक्षणसंस्थेची संस्थापिका, व १२ वर्षे त्या संस्थेची मुख्याध्यापिका; तिच्या ३५ वर्षांच्या कारकिर्दीत तिच्या हाताखालून तीन हजारांहून अधिक विद्यार्थिनी गेल्या. जन्म २८ फेब्रुवारी १७९७. मृत्यु ५ मार्च १८४९."

ज्या शिल्पकारानें तिच्या थडग्यावर वरील अक्षरे कोरली, त्याला तिच्याबद्दल फारशी माहिती असण्याच्या संभव नव्हता. ही तिची स्त्री-शिक्षणसंस्था अमेरिकेतल्या अग्रगण्य स्त्री शिक्षणसंस्थांत गणली जाईल आणि ती स्वतः अमेरिकेंतील नामांकित शिक्षणतज्ज्ञ समजली जाईल ह्याची तर त्याला मुळीच कल्पना नसेल.

बकलँडमधील वडिलांच्या शेतात बालपण घालवीत असताना आपला भविष्यकाळ उज्ज्वल असेल याची तिला कल्पनाही नव्हती. तिच्या वडिलांची शेती फारशी मोठी नव्हती तरी त्यांची बाग बऱ्यापैकी होती. बागेची काळजी व्यवस्थशीर घेतली जात असे. त्या बागेतील झाडे फळाफुलांनी समृद्ध असत.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४४६९३ वि: विज्ञान
क्रमांक ... नों. दि. २३/३/६५

ती सात भावंडें होती. "आमच्याकडे जेमतेम खाण्यापुरतें अन्न असे अधिक कधीच नसे." मेरी अभिमानाने वारंवार सांगत असे. मेरीचे वडील वारले तेव्हां ती फक्त सहा वर्षांची होती. मेरीच्या आईने आपल्या मुलांच्या मदतीने शेती चालू ठेवली. प्रत्येकाला त्याच्या वाटणीचे काम करावे लागे. मुले शेतांत राबत आणि जनावरे सांभाळीत, मुली सूत कातीत, कपडे शिवीत, साफसफाई व स्वैपाक करीत. हिवाळ्यात कडक थंडीत सुद्धां ती सर्वजणे चर्चमध्ये प्रार्थनेला जात. बर्फ पडलेल्या रस्त्यावरून जुन्या पद्धतीची घसरगाडी नेहेमी धावण्यास सज्ज असे.

उन्हाळ्यांत संध्याकाळच्या वेळी मेरी आपला चरका टाकून घराशेजारच्या खडकाळ टेकडीवर जाऊन बसे. त्या ठिकाणी बसण्याची तिची आवडती जागा ठरलेली होती. ते ठिकाण फारसे कुणाला माहीत नव्हते. टेकडीचे शिखर खूपच उंच होते. तिच्या बालबुद्धीला ते जंगातील सर्वांत उंच शिखर वाटे. तेथून बक-लॅण्डमधील खूप लांबचा देखावा दिसत असे. पद्धतशीर आखलेली हिरवी शेतें, सुंदर पाढरी घरें, आणि वृक्षराजीमधून चर्चला जाणारा नागमोडी रस्ता या सर्व गोष्टी तिचें मन वेधून घेत असत.

"शरीराची व मनाची दोन्ही कामें आपण शिकली पाहिजेत." तिची आई मिसेस् लायन नेहेमी आपल्या मुलांना उपदेश करीत असे. मेरी लहान असताना आईनें तिला शाळेत घालावयाचे ठरविलें.

लवकरच ती शाळेत एक हुशार विद्यार्थिनी म्हणून चमकू लागली. थोडयाच दिवसांत लेखन, वाचन तिनें आत्मसात केले. जेव्हां व्याकरण शिकण्याची वेळ आली तेव्हां चारच दिवसांत तिनें सर्व पुस्तक वाचून टाकलें. "हे पुस्तक वर्षाकरिता नेमलें आहे." तिचे शिक्षक आश्चर्यचकित होऊन म्हणाले, "इतक्या लवकर तू अभ्यास संपविलास तर तूं शिक्षक होशील व मला विद्यार्थीच्या बाकावर बसावें लागेल."

बारावे वर्ष लगेतों मेरीनें शिक्षिका व्हायचें ठरवून टाकलें. आपला विचार तिनें आईला एक दिवस संध्याकाळी जेवतांना बोलून दाखविला. "मला वाटते ही एक रम्य कल्पना आहे." आईने आपले मत दिले.

"काय शिक्षिका ?" त्यांच्या कुटुंबातील एक तरुण मुलगा विचित्र आवाज काढीत म्हणाला, "स्त्री ! आणि शिक्षिका ! आपण कधी ऐकलं नाही बुवा. सगळे शिक्षक पुरुषच असतात नाही का ?"

"सध्या आहेत, म्हणून नेहमीं पुरुषच असावेत असें थोडेंच आहे ?" मिसेस् लायन म्हणाल्या, "मेरी हुषार आहे आणि ती एक नामांकीत शिक्षिका होईल."

तिने आयुष्याचा मार्ग आपणच ठरवला आहे हें इतरांना कळल्याबरोबर ती इतर मुलींच्या मधून बाजूला पडली. "आपण आयुष्यांत काय ध्येय गाठायचे हे फक्त मुलगे ठरवितात." वर्गांतल्या मुलीनें स्वतःचे मत शिष्ट-पणाने बोलून दाखविले.

"मुलगे आपला जीवन-मार्ग निरनिराळा आखतात–कोणी सुतार, कोणी वकील, कोणी धर्मगुरु, कोणी शेतकरी, पण मुलींना मात्र एकाच चाकोरीची सक्ती असे कां असावे ? हें रास्त वाटत नाहीं." मेरी म्हणाली.

"माझी आई म्हणते, मुलींचा जन्म पत्नी आणि माता होण्यासाठींच आहे," ती मुलगी म्हणाली, "त्यांनी दुसरं कांहीं करावं अशी परमेश्वराची इच्छा असती तर त्यानें स्त्रियांना निश्चितच अधिक बुद्धि दिली असती."

त्यावर मेरी खूप जोरांत हसली. "मुलींना पुष्कळ बुद्धि असते." ती म्हणाली, "म्हणूनच मी शिक्षिका व्हायचें ठरविलें आहे. आपल्या बुद्धीचा कसा उपयोग करावयाचा हे मी दाखवून देईन."

टेकडीवर आपल्या उंच आवडत्या जागी बसली असतांना मात्र केव्हां केव्हां तिला वाटे, "माझें ध्येय साध्य होईल का ? उत्कृष्ट शिक्षकाला त्याच दर्जाचें शिक्षण लागते. आणि त्या शिक्षणाला तर पैसा हवा !"

लहान वयांतच मेरी सरकारी शाळेत सहाय्यक शिक्षिका म्हणून काम करूं लागली. तिचा पगार आठवड्याला पंच्याहत्तर सेंटस् होता. ती मनाशी विचार करीत असे, "थोड्या काळानंतर माझ्याजवळ पैसा साठेल, मग मी आपलें शिक्षण पुढे चालू करीन."

तिची शिक्षिकेची पहिली नोकरी चालू असतांनाच तिला दुसरी संधी मिळाली. मिसेस् लायनने पुनर्विवाह केला. आपल्या लहान मुलासह त्या नवीन घरी गेल्या. मेरीचा मोठा भाऊ बकलॅण्डमध्यें राहून तेथील जमिनीची व्यवस्था पाहूं लागला. "या घरांत राहून तूं इथली व्यवस्था पाहशील तर मला आनंद वाटेल." त्याने बहिणीला सांगितले, "मी तुला आठवड्याला फक्त एक डॉलर देत जाईन."

"काय ! एक डॉलर ?" मेरीने आपल्या भावाच्या गळ्याला मिठी मारीत विचारलें, "फारच छान ! तुझें लग्न होऊन वहिनी घरांत येईपर्यंत मी या घरांत राहीन."

पगाराचे पैसे साठवून ठेवण्याकरिता तिच्याजवळ एक कातड्याची पिशवी होती. आठवड्याचा पगार ती नेमाने तींत टाकीत असे. "हळू हळू पण खात्रीने" आपल्या पिशवीला गोंजारीत ती म्हणे, "आपले ध्येय साध्य होणार तर !"

एका वर्षाचे आंतच अॅशफिल्डमधल्या सॅण्डरसन विद्यालयांत दाखल व्हायचे तिनें ठरविलें. त्यासाठी लागणारा पैसा तिच्याजवळ साठला होता. तिच्या भावाने वधूची निवड केली होती. ती आतां कोठेही जायला मोकळी होती. "पण लक्षांत ठेव हे घर तुझें आहे." भावाने सांगितले, "जेव्हां जेव्हां शक्य असेल तेव्हां तुला येथे मोकळेपणानें राहायला हरकत नाही."

सॅण्डरसन विद्यालयांतल्या इतर विद्यार्थिनी सुखवस्तु कुटुंबांतल्या होत्या. नवीन वर्गमैत्रीण पाहून त्यांच्या चेहेऱ्यावर छद्‌मी हास्य उमटलें. घरकामामुळें तिचे हात राठ बनले होते. तिच्या काळ्याभोर केसांचें वळण साधेंच होते आणि तिचा घरगुती कापडाचा पोशाख नीटनेटका नव्हता. कृश शरीराच्या ह्या मुलीच्या पोशाखाकडे पाहून एक विद्यार्थिनी निर्दयपणें म्हणाली, "पिठाच्या गोणपाटाचे कपडे केलेले दिसतात."

पण तिनें आपल्या अभ्यासाला सुरवात केल्यावर मात्र तिला अपमान सहन करावा लागला नाहीं. पहिल्या दिवशींच तिनें लॅटिन भाषेचं सबंध व्याकरण तोंडपाठ केलें. लवकरच इतर विषयांतही प्राविण्य मिळवून ती वर्गाच्या अग्रभागी राहिली. तिची प्रगती पाहून शिक्षिकांनीं आश्चर्यानें तोंडांत बोटे घातली.

"ह्यांत आश्चर्य मुळीच नाहीं. या विद्यालयांतील माझें वास्तव्य फारच थोड्या काळापुरते आहे. मिळालेल्या संधीचा जास्तीजास्त फायदा मला करून घेतला पाहिजे." ती म्हणाली, "कारण माझी परिस्थिती मला फार काळ येथें टिकूं देणार नाहीं."

पहिल्या टर्मच्या शेवटी मुख्याध्यापकांनी तिला ऑफिसमध्ये बोलावले. "मिस् लायन !" ते म्हणाले, "तूं अतिशय हुशार विद्यार्थिनी आहेस. मला त्यांत आनंद आहे. आणखी एक टर्म तूं येथे राहावेंस अशी माझी इच्छा आहे."

"मला खूप वाईट वाटतें सर !" तिनें उत्तर दिलें, "पण मला अधिक काळ येथे राहाणं शक्य नाहीं."

"मिस् लायन !" मुख्याध्यापक तिची समजूत काढीत म्हणाले, "तुम्ही आरुच्या पाहुण्या म्हणून रहा."

मेरी लायन आणखी एक टर्म सॅण्डरसन विद्यालयांत राहिली. तिची तीक्ष्ण बुद्धिमत्ता आणि अभ्यासांतील लक्ष यामुळें ती शिक्षकांच्या कौतुकाचा विषय होऊन बसली.

"ती कॉलेजमध्यें कशी चमकते हेच मला पाहायचें आहे." एकजण आपल्या सहकाऱ्याला म्हणाला.

"ज्या कॉलेजला अशी विद्यार्थिनी मिळेल तें भाग्यवानच म्हणावे लागेल." त्यानें उत्तर दिले, "पण ती मुलगा नाही, ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे."

सॅण्डरसन विद्यालयांतलें आपले शिक्षण मेरीने संपविले आणि शेलबर्न या बकलँडपासून जवळ असलेल्या गावांत शिक्षिकेची नोकरी पत्करली. सुट्टीच्या काळांत बायफील्ड विद्यालयांत जोझेफ इमर्सन यांच्या हाताखाली ती शिक्षण घेत असे. सुप्रसिद्ध राल्फ वॉल्डो इमर्सन यांचे ते चुलत बंधू होत. तरी पण त्या महत्त्वाकांक्षी स्त्रीचें समाधान होत नव्हतें.

एक दिवस ती इमर्सनना म्हणाली, "मला रसायन व पदार्थविज्ञानशास्त्र शिकण्याची इच्छा आहे."

"तुला शिकण्याची इच्छा नसलेलें असें या जगांत कांहीं आहे का ?" मिस्टर इमर्सन कौतुकानें म्हणाले.

"तसें कांहीं असेल असें मला वाटत नाहीं." मेरीने कबुली दिली.

"रसायन व पदार्थविज्ञानशास्त्र येथे शिकविले जात नाहीं." आपल्या उत्साही विद्यार्थिनीला इमर्सननें सांगितलें, "हे विषय कॉलेजांत शिकवले जातात."

"मग मला कॉलेजांत जावें लागेल." मेरीने उत्तर दिले.

"तें शक्य नाही हें तुला माहीत आहे." जोझेफ इमर्सनने तितक्याच खंबीरपणें सांगितलें.

"तुम्हाला त्याची नको काळजी इमर्सन !" तिनें हसत ग्वाही दिली. "मी कॉलेजचे शिक्षण खाजगी शिक्षक ठेवून पुरें करीन. स्त्रियांकरितां लवकरच एखादें कॉलेज उघडण्याला मला हातभार लावता येईल अशी मला आशा वाटते. तोपर्यंत तरी आम्हा मुलींना न्याय्य हक्काकरितां झगडावें लागणार असें दिसतें."

त्या तरुण स्त्रीने आपला मोर्चा ॲमहर्स्टकडे वळविला. कॉलेजमध्ये प्रवेश मिळणार नाहीं, असें तेथे तिला सांगण्यांत आले. पण विज्ञानशास्त्राचा अभ्यास रेव्हरण्ड हम्फ्री यांच्या हाताखाली करता येईल असें तिला कळलें. मिसेस हम्फ्री ह्या एक बुद्धिमान् चित्रकार आहेत, असें मेरीला दिसून आलें तेव्हां तिनें चित्रकलाही शिकण्याचें ठरवलें.

मि. हम्फ्री यांच्या साहाय्याने मेरीनें आपला अभ्यासक्रम पुरा केला. मॅसॅच्यूसेटस् संस्थानची एक अत्यंत सुसंस्कृत तरुण स्त्री म्हणून ती प्रसिद्धीस आली. एक उत्कृष्ट शिक्षिका म्हणून तिने आधींच इतका नावलौकिक संपादन केला होता कीं, न्यू इंग्लंडमधल्या अनेक स्त्रीशिक्षणसंस्थांनी तिनें आपल्याकडे शिक्षिका म्हणन यावे अशी याचना केली.

"मला असें वाटतें कीं, आपण आपली स्वतःचीच शाळा सुरू करावी." मेरी आपल्या भावाला व वहिनीला म्हणाली.

"अलीकडे स्त्रियांकरिता कितीतरी शाळा निघत आहेत." तिचा भाऊ म्हणाला, "लवकरच पुरुषांपेक्षा स्त्रिया अधिक सुशिक्षित होतील अशी मला भीति वाटते."

"हे कसें शक्य आहे ? बायका पुरुषांसारख्या अॅमहर्स्ट, हॉरवर्ड, येल वगैरे ठिकाणी थोड्याच जाणार आहेत ?" मेरीने आपल्या भावाला सांगितलें.

"मुलींना कॉलेजांत पाठवावं असं तर नाहींना म्हणायचं तुला ?" भावाने विचारले.

"एवढं घाबरायला नको कांहीं. तुला वाटतं त्यापेक्षा आम्ही स्त्रिया खूपच हुषार आहोंत." मेरीने त्याला उत्तर दिलें.

१८२१ मध्यें एमा विलर्डने न्यूयॉर्क संस्थानांत ट्रॉयमध्ये एक मुलींची शाळा सुरू केली. त्या शाळेचा लवकरच खूप बोलबाला झाला. मेरी लायन त्यावेळी २४ वर्षांची होती. मिसेस् विलर्ड त्या शाळेत आपल्या विद्यार्थिनींना तत्वज्ञान व उच्च गणित शिकवीत. हे विषय त्याकाळी फक्त पुरुषांकरितांच असत. "मुलींची बुद्धिमत्ता मुलांइतकीच तीक्ष्ण असते हे उशीरा कां होईना पण मान्य झाले आहे." मेरीनें समाधानानें उद्गार काढले.

मॅसॅच्यूसेट्स संस्थानांतील इपसिचमधील मिस् ग्रांटच्या शाळेत मेरीनें नोकरी मिळविली होती. तथापि मुलींकरिता कॉलेज सुरू करण्याचे स्वप्न तिने कधीच नजरेआड होऊ दिलें नव्हतें.

"त्यास मला कॉलेज म्हणतां येणार नाही." तिने मिस् ग्रांटला सांगितलें, ''कॉलेजं फक्त मुलांकरतांच असतात. माझ्या मते त्याला "स्त्री-शिक्षणसंस्थाच नांव देणें योग्य होईल."

"म्हणजे मिसेस् विलर्डच्या शिक्षणसंस्थेसारखीच तर ?" मिस् ग्रांटनी जाणून घेण्याची इच्छा प्रदर्शित केली.

"मिसेस् विलर्डने मुलींकरता दुय्यम शाळा काढली." मेरी म्हणाली, "पण मी त्याच्या एक पायरी वर जाणार आहे. हॉरवर्ड किंवा येल यांसारखं मुलींकरतां कॉलेजच काढण्याचा विचार आहे माझा."

"ही एक भव्य कल्पना आहे." मिस् ग्रांट म्हणाल्या, "पण त्याकरितां तुला जमीन, इमारती व पाठ्यपुस्तकें हे सगळे लागेल. मोठे विद्वन्मंडळ लागेल. मला ही एक अशक्य कोटीतली गोष्ट वाटते."

"अति कठीण गोष्ट व अशक्य गोष्ट यांतील फरक जाणणं यांत खरी बुद्धिमत्तेची कसोटी असते." तिनें एक दीर्घ श्वास सोडीत म्हटले, "मला तर ही गोष्ट फक्त अति कठिण वाटते."

इपसिचमधील स्त्रियांकडून पैसा गोळा करण्याची मोहीम उघडण्याचे तिनें ठरविलें. हसतमुखाने आपल्या कार्याच्या प्रसाराकरतां ती दुपारी बाहेर पडत असे. शहरांतील प्रत्येक घराला भेट देण्याचे तिनें ठरविले. हाती घेतलेल्या आपल्या कार्याला लोकांचा कितपत पाठिंबा आहे हे जाणून घेण्याला ती उत्सुक होती.

मिसेस् अॅटवूडना ती एके दिवशी म्हणाली, "मी एक योजना मनाशीं योजलेली आहे तिच्याबद्दल मला तुमच्याशीं जरा बोलायचं आहे."

इपसिच्मधील स्त्रियांची प्रतिक्रिया त्यांच्या पोशाखाइतकीच विविध होती. कांहींनी तिच्या योजनेचे स्वागत केलें तर कांहीनी तिला सक्त विरोध दर्शविला.

"छान कल्पना आहे." मिसेस् अॅटवूड म्हणाल्या, "स्त्री-शिक्षणाला माझा नेहेमीच पाठिंबा असतो. जितकें अधिक तितके अधिक चांगलं !"

त्याच्या उलट मिसेस् अॅटवूडच्या शेजारी राहात असलेल्या मिसेस् रेनॉल्डस् म्हणाल्या, "ख्रिस्तीधर्माविरुद्ध आणि स्त्रीजातीविरुद्ध इतकी भयंकर गोष्ट आतापर्यंत मी कधीच ऐकली नाही." मग मात्र मेरीला त्या घरांतून सरळ बाहेर पडावें लागले.

कितीही विघ्ने आली तरी मेरीने धीर सोडला नाही. आपल्या कार्याकरितां ती अविश्रांत श्रम करीत असे. रोज दुपारी ती घरोघरी जाई. कांही महिन्यांच्या अवधीतच तिचे श्रम सफल झाले. तिच्या नियोजित स्त्री-शिक्षण संस्थेकरता जमलेली मदत जवळ जवळ एक हजार डॉलर्सपर्यंत गेली.

तिनें मिस् ग्रांटला सांगितले, "अखेर माझ्या कार्याला चालना मिळाली."

शिक्षिकेच्या नोकरीचा तिनें राजीनामा दिला. शाळेच्या मदतीकरता भिक्षा मागत ती मॅसॅच्यूसेट व कनेक्टिकटमध्ये वणवण भटकली. "केवढीहि मदत कमी लेखूं नका." ती लोकांना सांगू लागली, "तुमच्याकडून दहा–

वीस, सेण्ट्स् मिळाले तरी मला हवेच आहेत. पण अर्धा डॉलर, डॉलर मिळाला, आणि तुमची सहभावना मिळाली तरी माझं खूप काम होईल.

केव्हां केव्हां एखादी अंडी विकणारी बाई तिच्या हातांत कांहीं नाणी कोंबी. तर केव्हां एखाद्या श्रीमंत वकिलाची बायको आपल्या नवऱ्याला मेरीच्या शाळेच्या मदतीकरता शेकडों डॉलर्सचा चेक देण्यास भाग पाडी.

"तुमची मदत वाया जाणार नाही." मेरी त्यांना आश्वासनें देत असे, "मुलींना अधिक चांगलं शिक्षण मिळालं तर चांगल्या गृहिणी, अधिक चांगल्या स्त्रिया निर्माण होतील. अधिक चांगल्या शिक्षिका मिळतील."

त्यावेळी प्रवासाची साधने यथातथाच होती. बॉस्टन आणि न्यू हेवन यांच्या दरम्यान ती नेहेमी प्रवास करीत असे. अनेक प्रवासी तिला चांगले ओळखीत. तिच्या कार्याची आस्थेने चौकशी करीत. "तुमची संस्था कधी सुरू होणार ?" कनेक्टिकटच्या एका व्यापाऱ्याने एकदां तिला विचारले.

"मला सांगण्यास आनंद वाटतो." तिनें उत्तर दिले, "कोनशिलासमारंभ तीन ऑक्टोबरला ठरला आहे."

"एक अभूतपूर्व घटना आहे." एक व्यापारी आपल्या सहप्रवाशांना म्हणाला, "कदाचित् या बाईंना तुम्ही ओळखत नसाल पण माझे शब्द लक्षांत ठेवा. ही स्त्री लवकरच मोठी कीर्ति मिळविणार आहे."

"कीर्ति की अपकीर्ति ?" गाडीत कोपऱ्यांत बसलेला एक म्हातारा फुरफुरला.

"मला दोहोपैकी कांहींच नको." मेरी म्हणाली, "एक उत्कृष्ट शिक्षिका व्हावं एवढीच माझी इच्छा आहे !"

मॅसॅच्यूसेटस्‌मधील साउथ हॅडली या ठिकाणी तिनें शाळेकरिता जागा पसंत केली. कनेक्टिकट नदीच्या खोऱ्यांत वसलेलें ते एक लहान शहर होतें. तिची जन्मभूमि जें बकलॅण्ड ते येथून जवळच होतें. संस्थेचें नांव माऊंट होली-ओक स्त्रीशिक्षणसंस्था असें ठेवण्यांत आलें.

माउंट होलीओकचे पहिले अध्यक्ष, ऑक्टोबर १८३६ मधल्या त्या

दिवसाचा "एक तेजस्वी दिवस" म्हणून उल्लेख करीत असत. त्या दिवशी कोनशिलासमारंभ साजरा करण्यांत आला. "एक नवलाईचा दिवस," ती उद्गारली, "एका स्त्रीसंस्थेच्या इमारतीची कोनशिला पुरुषमंडळींनीं एकत्र येऊन बसविली. इमारतीची किंमतही कमी नाही. १५ हजार डॉलर्स. हा दिवस पाहाण्याचे भाग्य मला लाभले आहे."

पहिली इमारत चार मजली होती. तीमध्यें ऐशीं विद्यार्थिनींची सोय केली होती. इमारत पूर्ण होईपर्यंत तिच्या प्रत्येक भागावर मेरीचा प्रभाव पडला होता. सुतार, गवंडी, रंगारी ह्या सर्वांच्या कामात तिनें लक्ष घातले. आर्जवून त्या सर्वांना ती सल्ला देत असे. इमारतीच्या जमिनीवर घालायच्या फळ्या, तिच्या खिडक्यादरवाजे आणि बिजागऱ्यासुद्धा त्या सर्वांची तिनें तपासणी केली. "इमारत मजबूत होणार आहे" ती म्हणाली.

आठ नोव्हेंबर १८३७ रोजी "माउंट होलीओक" संस्थेचे उद्घाटन झाले. प्रथमप्रवेश मिळविलेल्या विद्यार्थिनी न्यूइंग्लंड आणि इतर चार राज्यांमधून आल्या होत्या. त्यांची संख्या शंभर होती.

इमारतीच्या दगडी पायऱ्या करड्या रंगाच्या होत्या. वरच्या पायरीवर उभे राहून तिनें विद्यार्थिनींचे स्वागत केले. काहीं विद्यार्थिनी भाड्याच्या गाडीतून आल्या होत्या, कांहींच्या गाड्या छोट्या पण टुमदार होत्या. शेतकऱ्यांच्या मुली तर खटाऱ्यातून आल्या. पुस्तके व कपडे ब्राऊन पेपरमध्यें गुंडाळून दोऱ्यानें घट्ट बांधली होती.

त्या मुलींचे स्वागत करताना मेरी म्हणाली, "मी तुमचे 'माउंट होलीओक' मध्ये स्वागत करते. तुमचा येथील काळ सुखाचा जावो !"

सामानसुमान लवकरच नीटनेटके लावण्यांत आले आणि नवीन विद्यार्थिनी आपल्या कार्याला लागल्या.

"आपलें बस्तान येथे अजून व्यवस्थित बसलें नाहीं. जरा हें बांक ठेवायला हात लाव बघू." ती विद्यार्थिनीनां सूचना देत होती, "मग ते गृहस्थ तिकडे सतरंजी बसवताहेत ना त्यांना मदत कर. ते आपल्या संस्थेचे एक विश्वस्त आहेत."

सुरवातीची गडबड शांत झाली. तरीदेखील विद्यार्थिनी आणि शिक्षिका घरगुती कामांत लक्ष घालीतच होत्या. "तुम्ही पुढें गृहिणी व्हाल. त्या दृष्टीने हे शिक्षण अतिशय महत्त्वाचे आहे." मेरी आपल्या विद्यार्थिनींना उद्देशून म्हणाली, "त्यामुळें आपली संस्था काटकसरीनें कार्य करू शकेल."

लुइझा-मे-टॉरी ही कांहीं काळ संस्थेची विद्यार्थिनी होती. तिचा मुलगा विल्यम हॉवर्ड टॅफ्ट हा पुढे अमेरिकेचा अध्यक्ष झाला. तिनें आपल्या आई-वडिलांना लिहिले, "माझ्याकडे येथे पाव बनवण्याचें काम आहे. मी रोज येथे असे दहा पाव बनवते."

पुष्कळांनी या घरगुती शिक्षणाची प्रशंसा केली. परंतु त्याचा उपयोग कांहींनी संपूर्णपणें निंदा करण्याकडे केला. मेरी एकदा एका सधन गृहस्थास भेटायास गेली. त्यांच्याकडून संस्थेस बरीच मोठी मदत मिळेल अशी तिची अपेक्षा होती. त्याने आपल्या मुलींकडे वळून म्हटले, "ज्या शाळेत तुम्हाला स्वैंपाक घरांत जाऊन काम करावें लागेल तिथें जाणें तुम्हाला आवडेल का?" मुलीनी नाके मुरडली व मानेने आपली नापसंती दर्शविली. अर्थातच बोलणें खुंटले आणि मदतही मिळाली नाही.

माउंट होलीओकच्या अभ्यासक्रमांत गृहकाम हें फक्त आनुषंगिक होते. तेथील मुली गणित, इंग्रजी, शास्त्र, तत्त्वज्ञान, राजकारण, अर्थशास्त्र, आधुनिक भाषा, इतिहास शिकत असत. प्रत्येक टर्मच्या शेवटी त्यांची कडक परीक्षा घेतली जात असे. "आमची परीक्षा किती कडक घेतली जाते याची तुम्हांला कधी कल्पना येणार नाही." एमिली डिकिन्सन या कवयत्रीने आपल्या घरी पाठवलेल्या पत्रांत कळविले होते, "आम्ही ठराविक काळांत कसोटीला उतरलों नाही तर आमची घरी रवानगी होई. परीक्षेच्या तीन दिवसांत आम्हांला ज्या दिव्यातून पार पडावे लागे तें दिव्य करायला मी सगळ्या जगांतील द्रव्य देऊं केलें तरी तयार होणार नाहीं."

अनेक पालक गायन व चित्रकला या विषयांबद्दल अधिक चौकशी करीत. त्याकाळी या दोन कला सुसंस्कृत स्त्रीच्या बाबतीत आवश्यक गणल्या जात. "या विषयांचा अंतर्भाव आम्ही अभ्यासक्रमांत जरूर करूं." मेरी

त्यांना आश्वासन देत असे, "परंतु मूलभूत शिक्षणाच्या अभावी या शोभेच्या कलांचे शिक्षण निरुपयोगी आहे. तसं करणं म्हणजे आरसपानाऐवजीं ब्रूच किंवा स्पंज ह्यांना पॉलिश करण्यासारखं आहे."

माउंट होलीओकमधील विद्यार्थिनी मुख्याध्यापिकेने आखून दिलेल्या श्रमसाध्य अभ्यासक्रमाशीं तन्मय झाल्या. वर्गातील अनेक तासांच्या बौद्धिक शिक्षणानंतर मुलींना शारीरिक व धार्मिक शिक्षणही घ्यावे लागे. त्याकाळी विजेचे दिवे वा घासलेट उपलब्ध नव्हते. व्हेल माशाच्या तेलावर दिवे जाळावे लागत. शिवाय अनेक पाठ त्यांना लिहून घ्यावे लागत आणि गृहकृत्यें असतच. एका तरुण स्त्रीनें लिहून ठेवलें आहे, "मी रोज पहाटे साडे तीन वाजता उठते. कारण सकाळचा विस्तव पेटवायचा असतो. मैत्रिणी-बरोबर अनेक कामे करावी लगतात. भटारखान्यांत अकरा वाजता हजर राहावे लागते व जेवणास दोन वाजतात."

नोव्हेंबरमधील शेवटचा गुरुवार हा विशेष दिवस असे. त्या दिवशी अमेरिकन लोक परमेश्वराचे आभार मानतात. संस्थेत त्या दिवशी मेजवानी असे. एका विद्यार्थिनीने आपल्या आईला पत्रांत लिहिले, "आजचा दिवस आमच्या झोपेवर बंधन नसतें. फक्त आठला न्याहारीला हजर राहिले म्हणजे झालें."

वर्तणूक व अभ्यासक्रम यांबाबतचे संस्थेचे नियम कडक असत. तथापि पूर्वेकडील सागरी प्रांतांतील स्त्रिया या संस्थेत प्रवेश मिळविण्याची धडपड करीत. लवकरच विद्यार्थिनींची संख्या दोनशेंपन्नास वर गेली आणि तित-क्याच प्रवेशाभावी परत गेल्या.

मेरी लायन मुख्याध्यापिका असली तरी ती आपले रम्य बालपण कधीच विसरली नाहीं. लहानपणी शेतात हसत खेळत केलेले काम, भावंडांचा सहवास आणि उंच टेकडीवरील तिचे आवडते विश्रांतीचें ठिकाण वगैरे गोष्टींची स्मृती तिच्या मनात कायम घर करून होती.

आपल्या विद्यार्थिनींना उपदेश करतांना ती म्हणे, "आठवड्यांतील कांहीं काळ आपले काम शिथिल करून तुम्ही मजा करीत जा. त्यात अनमान करूं नका."

संस्थेतील उत्साही मुलींना ह्याबाबतींत सक्ती करावी लागत नसे. बदल म्हणून अधूनमधून सहली व वनभोजने यांचे कार्यक्रम वारंवार आखले जात.

मेरी लायन १२ वर्षे त्या संस्थेची मुख्याध्यापिका होती. त्याकाळांत जवळजवळ दोन हजार विद्यार्थिनींनी आपला शिक्षणक्रम पुरा केला. त्यापैकी कांहीं मिशनरी झाल्या. कितीतरी मुलींनी शिक्षिकेचा पेशा पत्करला व पुष्कळजणींनी लग्न करून संसार थाटले. मेरी लायनचे स्वप्न साकार झालें. चांगल्या शिक्षणाने मुलींची बुद्धिमत्ता प्रगल्भ झाली, दृष्टिकोन विशाल झाला. जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रांत पाउल टाकले तरी निर्भेळ आनंद प्राप्त करून घेण्याची कुवत त्यांच्या अंगात आली.

ज्या शाळेशी मेरी एकरूप झाली होती तिच्या सेवेतच तिला मृत्यु आला. माउंट होलीओकमध्ये तापाच्या साथीत ती मरण पावली. मेरी स्वत: आजारीच होती तरी तिनें मृत्यु पावलेल्या एका मुलीबद्दल शोक प्रदर्शित करण्यासाठी बाकीच्या मुलींना एकत्र केले आणि आपले आयुष्य अनुकरणीय ठेवण्याबद्दल उपदेश केला. दुसरे दिवशी ती अंथरुणाला खिळली. तिच्या अंगांत खूप ताप भरला होता. दोन आठवड्यांत तिची जीवनज्योत मालवली.

१८८८ मध्ये तिची शिक्षणसंस्था कायदेशीररीत्या नोंदवण्यांत आली. तिचे रूपांतर अखेर कॉलेजांत झालें. न्यूयॉर्क विद्यापीठाच्या कीर्तिमंदिरांत तिचा पुतळा बसविला आहे. त्याखाली तिचे शेवटचे वचन कोरले आहे. तेच मेरीच्या आयुष्याचे यथार्थ दर्शन होय. "माझ्या संपूर्ण कर्तव्याची मला जाणीव होणार नाहीं, किंवा मी कर्तव्य पार पाडू शकणार नाहीं एवढे सोडलें तर या विश्वांत मला भय वाटणारी दुसरी कोणतीही गोष्ट नाहीं."

# ३ : एलिझबेथ पामर पीबॉडी

मॅसॅच्यूसेटस् संस्थानातील सालेम शहरांत एक दंतवैद्य होते. कुटुंब-पोषणाला पुरेसा पैसा त्यांना मिळला असता तर अमेरिका एका थोर शिक्षण-तज्ञाला मुकली असती.

या दंतवैद्याचे नांव होते. नथेनियल पीबॉडी. त्याकाळीं दातांच्या दुखण्या-साठी लोक सहसा दंतवैद्याकडे जात नसत. दांत उपटण्याचा प्रसंग आला तरच दंतवैद्याच्या घराची पायरी चढावयाची. त्या दृष्टीनें डॉ. पीबॉडी जरा कमनशिबीच होते. त्यांची बायको आणि मुली कुटुंबाच्या मदतीकरिता शाळेत शिक्षिकेची नोकरी करीत. त्यांच्या एका मुलीचे नांव एलिझबेथ पामर पीबॉडी असें होते. तिनें अमेरिकेत पहिली किंडरगार्टन शाळा सुरू केली.

ती आपल्या आयुष्याचे वर्णन 'दरिद्री पण स्वाभिमानी' असें करीत असे. पण असें असले तरी न्यू इंग्लंडमधल्या दोन प्रसिद्ध कुटुंबांच्या मीलनातून तिचा जन्म झाला होता. अनेक प्रतिष्ठित लोकांच्या घरी तिला व तिच्या बहिणींना नेहेमी चहापानाचे अमंत्रण असे.

चहापानानंतर एके दिवशीं घरी परतत असता सोफिया स्वतःशीच म्हणाली, "इतक्या सुंदर घरांत आपल्याला कधी राहायला मिळेल का ?" चहा पीत असतां सोफिया त्या घरांतील सुंदर संदर गालीचे व चकाकणारें महॉगनी फर्निचर पाहून मोहून गेली होती.

"कदाचित् एके दिवशी आपण अशा घरांत राहाण्यास जाऊ सुद्धा." मेरी तिच्या कानांत कुजबुजली.

एलिझबेथ त्या दोघींना म्हणे, "मला नाहीं ह्याचं महत्त्व वाटत. चांगलं शिक्षण घ्यावं व स्वावलंबी व्हावें हें सगळ्यांत चांगलं. स्टॅफर्डशायर कपांतून आरामांत घरी चहा पीत बसण्यापेक्षा व सुंदरतेचा तोरा मिरवण्यापेक्षां असं कांहीं करणं मला अधिक आवडेल."

मधून मधून त्या तिघीना नृत्यांनाही आमंत्रण असे. बहुधा त्या अशी आमंत्रणें सखेद नाकारीत असत.

"तीन-तीन मुलींना नाचाचे झगे, साटिनीचे जोडे आणि बकरीच्या चामडयाचे हातमोजे असे पोशाख करणें आम्हांला परवडत नाहीं." असें मिसेस पीबॉडी म्हणत.

मेरी व सोफिया आईच्या म्हणण्याला सहजासहजी मान्यता देत नसत. प्रसंगी त्यांचे डोळे पाण्यानें भरत. एलिझबेथ मात्र शेक्सपियरची नाटके वाचण्यांत आपला वेळ खर्च करी. पार्टीसारख्या क्षुल्लक गोष्टीचा विचार करण्याला तिला वेळ नसे.

विवाहाच्या आधी मिसेस पीबॉडी नॉर्थ अॅण्डोव्हरमधील एका संस्थेत शिक्षिका होत्या. तीन मुलांच्या खर्चाचा भार कुटुंबाला असह्य होतो असे वाटल्यावरून त्यांनी आपल्या घरांतच स्वता शाळेची स्थापना केली.

स्वाभाविकच पीबॉडी कुटुंबातील स्त्रियांना दुपारच्या वेळीं पाहुण्यांचे स्वागत करण्यास जागा शिल्लक राहात नसे. मिसेस पीबॉडीने आपला स्वाभिमान गिळला. ती आपल्या सधन शेजाऱ्यांकडे जाऊन, "मी नवीन शाळा सुरू केली आहे. आपण आपल्या मुलांना माझ्या शाळेत पाठवा." असे विनवीत असे.

मेरी व सोफिया स्वभावतःच खेळकर होत्या. फुले गोळा करण्यांत आणि भटकण्यांत त्यांचा वेळ जात असे. एलिझबेथ मात्र वयाच्या मानाने प्रौढ होती. तिला बालपण माहीत नव्हते. तिच्या आईची शाळा लवकरच मान्यता पावली. एलिझबेथ वयाच्या सोळाव्या वर्षीच आईच्या शाळेंत शिक्षिका म्हणून काम करूं लागली. शिक्षिकेला साजेशा पोषाखाबरोबरच तिला त्या वयांत गंभीरतेचा मुखवटा धारण करावा लागला.

एवढया लहान वयांत तिला अंगी मोठेपणा घ्यावा लागला, पण त्याचा उल्लेख तिनें कधीही कोणापाशीं केला नाहीं. उलट शिक्षिकेच्या पेशांत ती रमून जात असे. शाळा सुटल्यावर फावल्या वेळांत ती लॅटिन भाषेचा अभ्यास करू लागली. त्यांत तिला वडिलांचे साहाय्य होत असे. कांहीं काळ फिलिप्स अॅण्डोव्हर शिक्षणसंस्थेत लॅटिन भाषा शिकवीत असत. लॅटिननंतर ती ग्रीक भाषा शिकण्याचा विचार करूं लागली.

एके दिवशी एलिझबेथ आपल्या आईला म्हणाली, "माझ्या मते आतां मेरी आणि सोफिया मोठ्या झाल्या आहेत. शाळेत त्यांना माझें काम करायला कांहीं हरकत नाही. बॉस्टनला जाण्याची माझी इच्छा आहे."

तें १८२२ साल होतें. एलिझबेथने १९ व्या वर्षांत पदार्पण केले होते. इतर अनेक कुटुंबांना या कल्पनेने धक्का बसला असता. पण डॉ. पीबॉडी आणि मिसेस पीबॉडी ह्यांनीं नेहमीं मुलांना स्वावलंबी होण्याला प्रोत्साहन दिलें होतें. "तूं बॉस्टनला जा. तिथे ग्रीक भाषा शिकवणारें तुला कोणी तरी भेटेल." डॉ. पीबॉडी म्हणाले.

ती बॉस्टनला गेली. कांहीं शिकवण्या मिळवून तिनें आपली राहण्या-जेवण्याची सोय केली. नंतर ग्रीक भाषेचे धडे कोणाकडून मिळतील याची तिने चौकशी सुरू केली. एकोणीस वर्षांचा एक पाद्री तिला 'ग्रीक' भाषा शिकविण्यास तयार झाला. ती त्याला वॉल्डो म्हणे पण त्याचे संपूर्ण नांव राल्फ वॉल्डो इमर्सन असें होते.

अभ्यासाला सुरवात होते न होते तोंच अर्ध्याहून अधिक पुस्तक तिनें आत्मसात् केले. पुस्तक संपले तेव्हा इमर्सननें तिच्याकडून कांहींही फी घेण्याचे नाकारले.

"आपण सुरवात करण्याच्या आधीच तुला ग्रीक भाषा येत होती." तो म्हणाला, "तुझ्याकडून कांहींहि फी घेणें अप्रामाणिकपणाचें ठरेल."

बॉस्टनमधील वास्तव्यामुळें तिची प्रवासाची भूक अधिकच वाढली. मेन शहरांतील एका कुटुंबातील मुलांना शिकवण्याची नोकरी तिला सांगून आली. तिने ती तात्काळ पत्करली. पण केनेबेक वाफोरावर ती उभी असतांना मात्र तिला वाटूं लागलें ही नवी नोकरी आपल्याला सुखाची वाटेल का ? पण तिला काळजी करण्याचें कांहीं कारण नव्हते. डॉ. बेंजामिन वॉन हे त्या कुटुंबाचे प्रमुख होते. डॉक्टरसाहेबांच्या बंगल्यात दहा हजार पुस्तके होती. त्या काळीं हॉरवर्ड विद्यापीठांत देखील ह्यापेक्षा फार अधिक पुस्तके नव्हती. ग्रंथांच्या सान्निध्यांत एलिझबेथ भान विसरून जात असे.

ती नवीन नोकरीवर हजर झाली. पहिल्या दिवशी न्याहारीला जाण्या-पूर्वींच ती हलक्या पावलांनीं खाली गेली. बहुतेक सर्वच खोल्यांत चामड्याच्या बांधणीचे अनेक ग्रंथ हारीनें लावलेले होते.

"तुम्हांला माझें ग्रंथालय आवडलेले दिसते."

एलिझबेथच्या हातांतलें "हॅम्लेट" नाटकाचे पुस्तक जवळ जवळ गळून पडलें. पुरुषी आवाजाने ती एकदम दचकली.

"डॉ. वॉन तुम्ही !" एक सुटकेचा श्वास सोडीत मालकाकडे पहात ती म्हणाली, "किती घाबरवलेत मला ?"

"मिस् पीबॉडी, मी खरोखरच दिलगीर आहे." बेंजामीन म्हणाले, "तुम्ही इतक्या लवकर उठलेल्या असाल अशी मला कल्पनाच नव्हती."

"या तुमच्या ग्रंथालयाने मी मोहून गेलें आहे." तिच्या आवाजांत कंप होता, "पुस्तकांची मला फार आवड आहे."

बेंजामिन वॉननी स्मित केलें आणि म्हणाले, "माझ्या ग्रंथालयाचा तुम्ही वाटेल तेवढा उपयोग करा. त्यांत मला आनंदच वाटेल."

एलिझबेथचा आनंद गगनांत मावेना. व्हॉल्टेअरचे ग्रंथ वाचून आपलें फ्रेंच भाषेचें ज्ञान पुरें करण्याची संधि तिला प्राप्त झाली. सॉफोक्लीस् आणि युरीपिडीस् यांची नाटकेंही ती वाचणार होती. सीसेरोच्या भाषणांची तिला आवड असे. तेथील वास्तव्यात शक्य तेवढे वाचन तिने केले. मेन राज्याच्या कायद्याची पुस्तकेंही तिने वगळलीं नाहींत.

वॉनच्या घराच्या आसपास अनेक तरुण लोक राहात होते. लवकरच त्यांनी साप्ताहिक अभ्यासमंडळें व चर्चामंडळें काढलीं. त्या मंडळाच्या एका बैठकीहून परतल्यावर एलिझबेथला वाटलें आपण पुस्तकांत फार लक्ष घालतों. अनेक होतकरू तरुण त्या ठिकाणी जमत. त्यांचे लक्ष आपल्याकडे वेधावें अशी प्रबल इच्छा तिच्या मनांत निर्माण झाली.

"केशभूषा व वेशभूषा यांच्याकडे मी जास्त लक्ष द्यावे असे मेरी व सोफिया मला वारंवार सांगतात." एलिझबेथ आपल्या मनाशी म्हणाली, "थोडें अधिक लक्ष दिलें तर माझें सौंदर्य अधिक खुलून दिसेल, असें त्या म्हणतात."

कपड्यांच्या कपाटाचा कप्पा मेरीनें धाडकन् उघडला. शिक्षिकेचे बेढब पोषाख सगळे दूर सारले आणि बॉस्टनहून आणलेला रविवारचा पोशाख तिनें

शोधून काढला. तो तिने केव्हांच घातला नव्हता. गडद काळ्या रंगाच्या झग्याच्या बाह्यांवर आणि किनारीवर रुंद किरमिजी पट्टे होते. तिनें आरशांत पाहिले; आणि आपल्यासमोर एक सुंदर मुलगी उभी आहे असें तिला आढळले.

"आपला सहवास इतरांना हवाहवासा वाटेल असंच वागायचं." तिनें स्वतःशीच ठरविले. चर्चामंडळाच्या पुढल्या बैठकीला ती गेली ते असें ठरवूनच. "या तरुणांनी एक सुंदर मुलगी म्हणूनच माझ्याकडे पाहिले पाहिजे. लॅटिन, ग्रीक भाषेची, साहित्याची व इतिहासाची शिक्षिका म्हणून नव्हे !"

तिच्या श्रमाचें चीज झालें इतकें कीं त्या दिवशी सर्व तरुणांचा प्रयत्न तिचे लक्ष आपल्याकडे खेचून घेण्यासाठीं चालला होता. त्यापैकी एकजण तिच्यावर खूपच खूष झाला. तो तिच्याकडे रोज येऊं लागला. कांहीं काळ आपण त्या तरुणाच्या प्रेमांत पडलो आहो अशी तिची कल्पना झाली. पण त्यानें जेव्हा लग्नाची मागणी घातली तेंव्हां मात्र तिनें त्याला नकार दिला.

"मी लग्नाला तयार नाही." तिनें त्याची समजूत काढली, "आतां तर नाहीच; पण कदाचित् कधीही नाही. संसाराला सुरवात करण्याच्या आधी मला अनेक कामं पार पाडावयाचीं आहेत."

आपल्या बहिणीनें लग्नाच्या मागणीला नकार दिल्याचें मेरीला समजलें. ती बहिणीला म्हणाली, "लिझी आधींच तुझें दोन गोष्टीवर प्रेम बसलं आहे. एक अध्ययन आणि दुसरे अध्यापन. या दोन गोष्टी सोडून प्रेम करण्यालायक असें तुला दुसरं कोणी भेटेल असं मला वाटत नाही."

कालांतराने मेरीचे लग्न हॉरेस मॅन ह्या शिक्षकाशीं झालें. सोफाया सौ. नथेनियल हॉथॉर्न झाली पण एलिझबेथ मात्र आपल्या ध्येयाशीं एकनिष्ठ राहिली. अध्यापन हेच तिचे ध्येय होते.

मेनहून परतल्यावर लवकरच ब्रुकलिनमध्ये तिनें एक शाळा काढली. ब्रुकलिन हे बॉस्टनपासून फार लांब नव्हतें. मिस् पीबॉडी विद्यार्थ्यांमध्यें

लवकरच प्रिय झाली. स्पेलिंग व वळणदार लेखन यांबरोबर ती मुलांच्या चारित्र्याकडे लक्ष देत असे. त्याकरिता तिनें खूपच कष्ट केले. एका "पुरुषी" मुलीला तिनें चांगलें शासन केलें. सोनेरी कुरळ्या केसांची एक मुलगी फारच गर्विष्ट होती. तिला तिनें चांगला उपदेश केला. नाही तर ती मुलगी वाया गेली असती. एलिझबेथला वाटे आपण फार कठोर वागतो. पण तिच्या विद्यार्थांना मात्र तसे कधीच वाटले नाही. तिच्यावर फुलांचा व फळांचा देणगीरूपाने वर्षाव होई. तिच्या दयाळूपणाबद्दल आभार मानले जात.

तिचें विद्यार्थांकडे खूपच लक्ष असे. त्या मानाने हिशोबांच्या वह्यांकडे नसे. त्यामुळें शाळा तोटयांत आली. आणि लवकरच बंद करावी लागली.

नाउमेद न होता ती धैर्यानें वागली. फावल्या वेळांत नवीन इतिहासाची पुस्तके लिहिण्याचें तिने ठरवले.

"पुष्कळ वर्षं हा विचार माझ्या मनांत घोळत आहे." तिनें आपल्या प्रकाशकांना सांगितले, "आतां योग्य संधी आली आहे."

लहानपणापासून ती आईच्या शाळेंत काम करीत असे. तेव्हांपासून आई, वडील व धाकटे भाऊ यांना तिची मदत होत असे. ती मदत अव्याहत चालू होती. इतिहासाच्या पुस्तकांत तिला अपेक्षेप्रमाणें कमाई झाली नाही. म्हणन तिनें आपले लक्ष व्याख्यानांकडे वळविले.

"भयंकरच आहे !" मॅसॅच्यूसेटस्मधील पोक्त स्त्रिया धापा टाकीत म्हणाल्या.

"बायकांनी सार्वजनिक ठिकाणी उभे राहून व्याख्यान दिल्याचं कधीं कुणी ऐकलंय ?" कोंबडयासारखा कचकचाट करीत त्यांनी आपला विरोध दर्शविला.

आतापर्यंत स्त्रीने व्याख्याने दिल्याचे कोणाच्या ऐकिवांत नव्हते हे खरेंच पण एलिझबेथ मात्र त्यापासून परावृत्त झाली नाही. स्त्रियांच्या सभांमध्ये ती इतिहासावर व सामाजिक प्रश्नांवर बोलत असे. तिच्या धीट-पणाने स्त्रियांना लाज आणली असें ज्यांना वाटे त्याही तिच्या व्याख्यानाला हजर रहात.

"फारच छान" व्याख्यान ऐकल्यावर बायका कबुली देत. मग मात्र पीबॉडीला व्याख्यानांच्या आमंत्रणाची रीघ लागली.

ही व्याख्याने बोधप्रद ठरली. तिला खूपच अनुभव मिळाले. पण शिक्षिकेचा पेशा तिला अजुनही आकर्षक वाटे. ब्रॉन्सन ऑलकॉट लवकरच एक शाळा सुरू करणार असल्याचे तिला कळले. तात्काळ त्यांच्या शाळेत शिक्षिका म्हणून जाण्याचे तिनें ठरविले.

या तरुण स्त्रीचा ऑलकॉटवर एवढा प्रभाव पडला कीं त्यानें तिची ताबडतोब नेमणूक केली. पुढे तर आपल्या एका मुलीचे नांव त्यांनी एलिझ-बेथच ठेवलें. या मुलीचे जीवन ऑलकॉटची कन्या लुईझा मे हिने लिटल विमेने या पुस्तकांत रेखाटले आहे. त्या पुस्तकांतल्या सौम्य बेथचें नांव ह्या धीट एलिझबेथवरून ठेवलें होतें ह्याचा विचार मनांत आला म्हणजे गंमत वाटते.

लवकरच ऑलकॉटने सुरू केलेली शाळा बंद पडली. त्यांच्या शिकविण्या-च्या पद्धतीला आई-बापांचा विरोध झाला. त्यांच्याविरुद्ध जणू काही वादळच उठले. पुन्हां एकदा एलिझबेथ संकटांत पडली.

न डगमगता तिनें एक पुस्तकाचें दुकान उघडण्याचें ठरविले. "हें दुकान साधेंसुधे असणार नाहीं." तिने आपल्या मित्रांना सांगितलें, "साहित्याची आवड असणाऱ्या लोकांना येथे जमता येईल. ग्रंथवाचनाबरोबर त्यांना त्यावर चर्चाहि करतां येईल."

बॉस्टनच्या नागरिकांना हें एक नवलच वाटलें. स्त्रीने दुकान चालविणें ही कल्पनाच लोकांना पटेना. तिच्या दुकानांत फ्रेंच व जर्मन भाषेतलेही ग्रंथ होते. "मिस् पीबॉडीचे परदेशी पुस्तकांचें दुकान" असें लोकांनी त्याचें नांव पाडले.

"लोकांना खुशाल कांहींहीं म्हणू देत." एलिझबेथ आनंदाने म्हणाली, "मला खात्री आहे आपणाला ग्राहकांची वाण पडणार नाहीं."

न्यू इंग्लंडमधल्या कांहीं वैशिष्टयपूर्ण लोकांचें १३ वेस्ट स्ट्रीटमधलें हे दुकान एकत्र जमण्याचें ठिकाण झालें होतें. त्यांत राल्फ वॉल्डो इमर्सन, हेन्री थोरो, मार्गारेट फुलर आणि जेम्स रसेल लोवेल हे प्रामुख्याने होते. त्यां-

च्याच प्रोत्साहनाने तिनें मागील बाजूस एक छापखाना पण उघडला व ती प्रकाशक म्हणून काम करूं लागली. तिचें प्रारंभीचें एक प्रकाशन गुलामगिरीचा निषेध करणारें होते. नथेनिअल हॉथॉन यांचें Twice Told Tales हें पुस्तक तिनें प्रकाशित केलें. तसेंच The Dial हें एक मासिकही प्रकाशित होत असे. त्यांत न्यू इंग्लंडमधील कांहीं लोकांच्या कविता व निबंध छापले जात. हे लोक स्वतःला Transcendentalists म्हणवीत. हा धार्मिक विचारसरणीचा द्योतक शब्द आहे.

साहित्यविषयक व्यासंग जरी उत्साहवर्धक असला तरी दुर्दैवाने अर्थवर्धक नव्हता. पैशाची कमाई फारशी होत नसे.

"व्यापारांत माझं डोकंच चालत नाहीं" तिने आपले जुने स्नेही राल्फ वॉल्डो इमर्सन यांचेकडे तक्रार केली.

आलेल्या नुकसानीने ती अनेक वेळां त्रासली होती. पण वयाच्या ५६ व्या वर्षी तिने जेव्हां नवीन उद्योग आरंभिला, तेव्हां इतर कोणापेक्षा तिला स्वतःलाच त्याचे अधिक नवल वाटलें. ह्या नवीन उद्योगामुळे ती एक शिक्षणतज्ञ म्हणून पुढे आली.

ती जीं अनेक पुस्तकें वाचीत असे त्यांत जर्मन शिक्षक फ्रेडेरिक फ्रअबेल याचें लेखन तिच्या वाचनांत आलें.

शिक्षणक्षेत्रांत फ्रअबेलनी क्रांतिकारक सिद्धांत मांडले होते. वर्गात मुलांनी खिन्नमनाने बसणें त्यांना पसंत नव्हते. मुलें नेहेमी आनंदी राहावी असें त्याला वाटे. ५ ते ६ वर्षांच्या मुलांकरिता किंडरगार्टन अथवा "बालोद्यान" सुरू करण्याची त्याची योजना होती.

फ्रअबेलबद्दल शक्य ती सर्व माहिती तिनें करून घेतली. फ्रअबेल हा लहानपणी अतिशय दुःखी होता, हे तिला कळून आले. म्हणूनच मुलामुलींच्या जीवनामध्ये आनंद निर्माण करण्याचा त्याचा मानस होता.

"बालकांना कांहीं काळ खेळूं द्यावें" हा त्याचा पहिला सिद्धांत होता. "शिपायासारखें त्यांना एके जागी सर्वकाळ ताठ बसायला लावणें योग्य नाही."

मुलांना संगीत, चित्रकला व निरनिराळ्या आकृति यांची माहिती देण्यावर त्यांचा भर असे. वर्गाबाहेर निसर्गाच्या सानिध्यांत त्यांनी असावें, असे त्यांचे विचार होते.

"शाळा नेहमी आनंदी वातावरणांत भरावी. तिला तुरुंगाचे स्वरूप येऊं नये" फ्रअबेल म्हणे.

"फ्रेअबेल हे एक अतिशय विलक्षण गृहस्थ आहेत." ती आपली बहीण मेरी हिच्याजवळ बोलताना म्हणाली, "त्यांच्या मताशी मी संपूर्ण सहमत आहे."

प्रत्येक शाळेत एक "बालोद्यान" असलेंच पाहिजे हे आपलें मत अमेरिकन लोकांना पटवून द्यावयाचे तिनें ठरविलें. ही गोष्ट सोपी नव्हती. तिनें एक स्वतःचे आदर्श बालोद्यान स्थापन करायचें ठरवले. त्याकरितां लागणारा पैसा उभारण्यास खूप कष्ट पडले.

मिस् पीबॉडी संकटानें खचली नाहीं. उलट तिनें संकटावर मातच केली. शक्य असेल तेव्हां तिनें शिक्षिकांच्या महाविद्यालयांना व शाळांना भेटी दिल्या. आपल्या श्रीमंत मित्रांना भेटून त्यांच्या मदतीची याचना केली.

एक दिवस ऱ्होड बेटांतील न्यूपोर्ट शहरांत ती मैत्रिणीला भेटावयास गेली. हातात फक्त एक पिशवीच होती.

"तुझे सामान कोठे आहे?" मैत्रिणीनें आश्चर्याने विचारले.

"माझा टूथ-ब्रश माझ्या खिशांत आहे आणि माझ्या नाईट गाऊनवर मी कपडे घातले आहेत." एलिझबेथने आपल्या मैत्रिणीला सांगितलें, "आधी मला तुझ्याशी फ्रेडरिक फ्रअबेलबद्दल आणि त्यांच्या "बालोद्यान" बद्दल बोलायचे आहे. एक क्षणही वाया घालविता कामा नये."

१८६१ मध्यें एलिझबेथने पुरेसे पैसे जमविले. बॉस्टनमध्ये इंग्रजी बोलणाऱ्यांकरितां बालोद्यान उघडलें. ते अमेरिकेतील पहिलें इंग्रजी शिशु-विहार होय. [ मिसेस् कार्ल शूरस हिनें विसकॉन्सीन येथे कांहीं वर्षांपूर्वी एक जर्मनभाषिकांचे शिशुविहार उघडले होते. तिचे पति अमेरिकेच्या राज-

कारणांत प्रसिद्ध होते. ] एलिझबेथची पहिली विद्यार्थिनी मॉड हो ही होती. तिच्या न्यूपोर्ट येथील मैत्रिणीची ती मुलगी होती.

तिची नवीन शाळा लवकरच भरभराटीस आली. पण तिला मात्र त्याचे समाधान वाटत नव्हते. "जर्मनींत जाऊन फ्रअबेल यांनी काढलेलें 'बालोद्यान' प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय बरें वाटणार नाहीं." तिनें बोलून दाखविले.

पिबॉडीची सांपत्तिक स्थिति नेहेमींप्रमाणेंच होती. तिच्या अनेक मित्रांनी तिला मदत केली. "मिस् पीबॉडीला जर्मनीला पाठवा." सगळीकडून मागणी आली. त्याचबरोबर मदतीचा ओघही पूर्व किनाऱ्याकडल्या सर्व प्रदेशांकडून वाढू लागला.

"अकराशे डॉलर्स मदत जमली." एलिझबेथ आश्चर्याने म्हणाली, "लोकांना माझ्या कार्याबद्दल एवढी आस्था आहे असें मला कधीच वाटले नव्हते."

एलिझबेथने पुष्कळ वेळा युरोपचा प्रवास केला. तेथील संग्रहालयें, चर्चेस, चित्रालयें आणि किल्ले यांना भेटी दिल्या पण जर्मन "बालोद्याना" इतकें तिचें मन कोठेंच रमेना.

रंगीत खुंटचा, लाकडी ठोकळे, रंग आणि शाडू या सर्वांचा तिनें काळजीपूर्वक अभ्यास केला. त्यांचा उपयोग अमेरिकेतील शाळेत करण्याचे तिनें ठरविलें. "बालोद्याना" साठीं शिक्षक तयार करणाऱ्या शाळांना तिनें भेटी दिल्या.

अमेरिकेत परत जाण्यास ती अगदीं अधीर झाली होती. "मी येथे अधिक काळ थांबू शकत नाहीं. अमेरिकन मुलांकरिता आधी "बालोद्यानें" सुरू करण्याची मोहीम मला उघडलीच पाहिजे." ती आपल्या जर्मन मित्रांना म्हणाली.

एलिझबेथ बोटीतून उतरली आणि लगेच तिच्या व्याख्यानांचे सत्र सुरू झाले. ती चारी दिशांना फिरली. आपल्या "बालोद्याना"च्या कल्पना तिने लोकांना समजावून सांगितल्या. एका जेवणाच्या प्रसंगी तिला जेवणाचेंही भान राहिले नाहीं. सारखी बोलतच राहिली. शेवटी वाढपिणीनें तिला मध्येच जेवणाची आठवण करून दिली.

मिस् पीबॉडीच्या प्रोत्साहनाने सेंट लुई आणि न्यूयॉर्क येथे बालोद्याने निघाली. Rebecca of Sunnybrooh Farm ह्या पुस्तकाचा लेखक डग्लस विगिन ह्याने सॅनफ्रान्सिको येथे पण एक बालोद्यान सुरू केले.

"प्रशिक्षित शिक्षकांची आपल्याला जरूरी आहे." एलिझबेथ आपले विचार बोलून दाखवीत असे.

तिने स्वत: फ्एवेलच्या दोन शिष्यांना गळ घातली. त्यांनी बॉस्टनमध्ये प्रशिक्षणाचे कार्य सुरू केले. एलिझबेथ नेहेमी विद्यार्थींच्या शोधांत असे. एखादी होतकरू मुलगी दृष्टीस पडली की ती विचारी, "बालोद्यानांत शिक्षिका होणें तुला आवडेल का ? त्याचा तूं कधी विचार केला आहेस का ?"

अशा तऱ्हेने तिला अनेक शिक्षिका मिळाल्या. तरुण ल्यूसी व्हीलॉक ही त्यांपैकी एक होती. तिनें बॉस्टनमध्यें शिक्षिकांकरिता एक शाळा सुरू केली. नंतर ती शाळा बरीच प्रसिद्धीला आली.

फ्एबेल युनिअन काढण्यांत तिनें बराच पुढाकार घेतला. १८७८ मध्यें त्या युनिअनची एक सभा न्यूयॉर्क येथे भरावयाची होती. एलिझबेथ सभेला हजर राहाण्यास निघाली. मेरी पीबॉडी मॅननें ल्यूसी व्हीलॉकलाच तिच्या-बरोबर आग्रहानें पाठविले.

"एलिझबेथ" मेरी आपल्या बहिणीला म्हणाली, "तुझे वय ७० चे वर आहे, तुझी दृष्टि अधु झाली आहे. नुकतीच आजारातून उठली आहेस. तूं गेली नाहीस तर सभा थोडीच अडून राहाणार आहे ?"

त्या करारी बाईबरोबर वाद घालणें कठिण होते. ल्यूसी व्हीलॉक तिच्या-बरोबर न्यूयॉर्कला गेली.

"तिला एकटीला बाहेर जाऊ देऊ नकोस." मेरीने बजावले.

दुसऱ्या दिवशी हॉटेलच्या खोलीतून एलिझबेथ एकटीच बाहेर पडली. व्हीलॉकला झोप लागली होती. जागी झाल्यावर एलिझबेथ तिला दिसली नाही. ती फारच घाबरली. आठ वाजता मिस् पीबॉडी परत आली आणि सभेची व्यवस्था ठीक असल्याचे तिने सांगितलें.

"व्यासपीठ योग्य जागी असून खुर्चा व्यवस्थित ठेवल्या आहेत." ती म्हणाली, "रखवालदाराला उठवूनच मला आंत जावें लागलें. कदाचित त्याला रागही आला असेल."

"पण, मिस् पीबॉडी तुम्ही तेथे एकट्याने जायला नको होतं. तुम्ही आजारी आहांत. मला तुमची काळजी वाटते." ल्यूसीनें आपला विरोध दर्शविला.

एलिझबेथ म्हणाली, "माझी काळजी घेण्याइतकी मी आतां मोठी आहे."

एलिझबेथ पीबॉडी १८०४ पासून १८९४ पर्यंत ९० वर्षे जगली. सबंध १९ वें शतक तिनें पाहिलें. देशांतील विचारवंत लोक व प्रतिभावान् लेखक यांना ती ओळखीत असे. कोणत्याही सत्कार्याला तिची सक्रिय मदत असे. मग ते गुलामगिरी नष्ट करण्याचे असो वा स्त्रीसुधारणेचें असो.

तिच्या मृत्यूनंतर तिच्या मित्रांनीं तिच्या कार्याला साजेसे तिचे स्मारक उभारण्याचे ठरविलें. किंडरगार्टन (बालोद्यान) शिक्षण पद्धतीला वाहिलेले "एलिझबेथ पीबॉडी" गृह उभारण्यांत आलें. लहान वयांतच प्रौढ झालेल्या मुलीचें तें योग्य स्मारक होतें.

# ४ : ॲलिस फ्रीमन पामर

एक अमेरिकन स्त्री १९०२ मध्ये फ्रान्स देशांत परलोकवासी झाली. तिची शुश्रूषा एक नर्स करीत असे. तिला इंग्रजी येत नव्हते व रोग्याबद्दल कांहींच माहिती नव्हती. तरी तिच्या दुःखी पतीकडे पाहून हळुवारपणें फ्रेंच भाषेत म्हणाली, "महाराज ती एक विलक्षण स्त्री होती."

आपण जिची शुश्रूषा करीत होतों ती केवढी अलौकिक स्त्री होती हे त्या नर्सला कदाचित् केव्हांच कळले नसेल. पण कांही वर्षांनंतर जॉर्ज हर्बर्ट पामरनीं आपल्या पत्नीचें चरित्र प्रसिद्ध केले, तेव्हां साऱ्या देशांतून त्यांच्यावर पत्रांचा वर्षाव झाला. राजकारणी पुरुष आणि विद्यार्थिनी, श्रीमंत व गरीब, ऑफिसमधील कारकून आणि खेडयांतील स्त्रिया या सर्वांनी त्यांची स्तुति केली. ॲलिस फ्रीमन पामर या लोकविलक्षण स्त्रीचे चरित्र लोकांना फार आवडले.

ॲलिस पामरच्या कार्याची यादी लांबलचक नाहीं. ती वेलस्ली कॉलेजची सहा वर्षें मुख्याध्यापिका व शिकागो महिला विद्यापीठाची तीन वर्षें डीन होती. ज्यांच्या ज्यांच्याशीं तिचा संबंध आला त्यांचें त्यांचें आयुष्य तिने 'सुखी' केलें हें तिचें सगळ्यात मोठें यश होतें.

१८५५ साली ॲलिस फ्रीमनचा जन्म न्यूयॉर्क संस्थानातील कोलसव्हिल येथील एका शेतांत झाला. बालपण खेडयांत गेलें. साहजीकच झाडांझुडपांवर व गाईवासरांवर तिचे प्रेम होते. वसंत ऋतूंत दुपारच्यावेळीं शेतांत मनसोक्त भटकणें तिला आवडे. त्यांच्या जमिनीमधून वाहात जाणाऱ्या ओढयांत पाय सोडून बसण्याचा तिला छंद होता.

शेतकरीजीवन नेहमींच असें निष्काळजी नसे. अंडी गोळा करणें, शेत लावणें, घरगुती कामें करणें व धाकटया भावंडाना सांभाळणें यांत ती दंग

असे. फ्रीमन कुटुंबाजवळ पुस्तके वा वर्तमानपत्रें फारशी नव्हती आणि जेमतेम खाण्यापुरतेंच अन्न असे, "आमच्या जेवणांत मांस कधींच नसे." ॲलिस आपल्या आठवणी सांगे, "अधूनमधून खारवलेले मासे मिळाले तर तें मोठें पक्वान्न वाटे.

ह्याहून अधिक कठिण दिवस ते काय असणार असें वाटे. पण तेवढ्यांत ॲलिसचे वडील जेम्स वॉरन फ्रीमन यांनी डॉक्टर होण्याचे ठरविलें. "आपलं आयुष्य जरा अधिक वर जाईल." त्यांनी आपल्या पत्नीला सांगितले, "पण माझा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत तुला व मुलांना घर सांभाळावे लागेल."

"आम्ही करूं कसेंही." बायको धीरानें म्हणाली. पण त्याचा अर्थ एवढाच कीं काम वाढणार आणि अन्न आणखी कमी होणार. ॲल्बनी मेडिकल स्कूलमधून जेम्स फ्रीमननीं डॉक्टरची पदवी मिळवीपर्यंत सबंध कुटुंबानें कष्टांत दिवस काढले.

"अतिशय कठिण काळ होता." त्यांची मोठी मुलगी आपल्या आठवणी सांगत असे, "पण ध्येयप्राप्तीकरिता सुखाचा त्याग करण्याची किंमत आम्हाला कळली."

आपली पत्नी आणि चार मुलें ह्यांच्यासह डॉ. फ्रीमन विन्डसर या खेड्यांत राहाण्यास गेले. खेड्यांतील डॉक्टरांना मोठी कमाई अशी कधींच होत नाहीं. परंतु शेतीच्या उत्पन्नापेक्षां या व्यवसायांत त्यांना जास्त फायदा होत असे. साहजिकच कुटुंब अधिक सुखांत राहूं लागले.

विन्डसरमध्यें एक विद्यालय होते. तेथील लोकांना त्याचा मोठा अभिमान वाटे. त्यांत वयाच्या सतराव्या वर्षापर्यंत ॲलिसनें शिक्षण घेतले. आयुष्यांत पुढे काय करावे याबद्दलची मतें तिनें तोपावेतों निश्चित केली होती.

"मला कॉलेजांत जायचें आहे," तिनें आपल्या आईवडिलांना सांगितलें.

"कॉलेज!" आपल्या फिरत्या खुर्चीची गिरकी मारून डॉ. फ्रीमन एकदम ताठ बसले. "हे वेड तुझ्या डोक्यांत कोणी भरविलें?"

अनुक्रम ५४६९३ दि: [illegible]
वर्ग २०९८ नों दि. २३।३।४६

"त्यावर बराच काळ विचार केला आहे मी." ॲलिसने शांतपणे उत्तर दिलें.

"पण जवळपास तर कॉलेज नाहीं."

"मग जिथें कॉलेज असेल तिथें मला गेलें पाहिजे."

१५९२९

"त्याला खर्च काय येईल याची तुला कल्पना आहे का ?" वडिलांनी विचारलें, "या कुटुंबातील जर कोणी कॉलेजांत जाणार असेल तर तो तुझा भाऊ फ्रेडच."

पण ॲलिस फ्रीमनचा निर्धार कायम होता. "मी कॉलेजची पदवी घ्यायचे निश्चित केलें आहे. त्याकरता माझ्या वयाची पन्नाशी झाली तरी हरकत नाहीं. मला तुम्ही आता पैसे दिलेत तर फ्रेडचं व धाकटया बहिणीचं शिक्षण मी करीन. वचन देते."

आपला पराभव झाला हें डॉ. फ्रीमनना दिसून आलें. हात वर करीत ते एकदम ओरडले, "तूं जिंकलेंस, जा तूं कॉलेजांत पण कोणत्या ते मी सांगूं शकत नाही."

"मला मिशिगन विद्यापीठांत जावेसे वाटतें." ॲलिस म्हणाली, "ती शाळा फारच चांगली आहे आणि तिथें आंता मुलींनाही प्रवेश मिळूं लागला आहे."

सप्टेंबर महिन्यांत डॉक्टर फ्रीमन आपल्या मुलीबरोबर ॲन आर्बर येथे गेले आणि ऑफिसच्या मुलाखतीच्या वेळीं बसून राहिले. मुलाखतीनंतर विद्यापीठाचे अध्यक्ष म्हणाले, "तुमच्या मुलीनें आमच्यावर चांगली छाप पाडली आहे. तिची तयारी पाहिजे तेवढी नाहीं. पण सहा आठवड्यांकरता आम्ही तिला उमेदवार म्हणून प्रवेश देणार आहोंत."

तिनें वडिलांचा निरोप घेतला व ताबडतोब वाचनालयांत जाऊन कामाला सुरवात केली. इतिहास, ग्रीक व इंग्रजी साहित्य ह्यांबरोबरच गणित व लॅटिन भाषेचे धडे तिनें घेतले. सहा आठवड्यांची मुदत संपली. आपण अभ्यास करूं शकतों हे तिनें सिद्ध केलें होतें. टर्मच्या शेवटीं एका तरुण

विद्यार्थ्यानें आपल्या आईवडिलांना लिहिलें, "माझ्या वर्गांत एक मुलगी आहे. ती सर्वज्ञ आहे. अगदीं सर्वज्ञ."

१८७६ मध्ये तिला मिशिगन विद्यापीठाची पदवी मिळाली. नंतर तिनें आपल्या कष्टाळू आयुष्याला सुरवात केली.

डॉ. फ्रीमनचे आधींच तुटपुजें असलेलें उत्पन्न अधिकच घटलें. धाकटचा मुलाचें शिक्षण व्हायचे होतें. त्यांनी ॲलिसला तिच्या वचनाची आठवण करून दिली. "दिलेला शब्द मी जरूर पाळीन." तिनें वडिलांना आश्वासन दिलें. मिळालेल्या पहिल्याच नोकरीला तिनें सुरवात केली. विस्कॉनसिन् येथील शिक्षणसंस्थेत ती ग्रीक व लॅटिन भाषा शिकवूं लागली.

थोडचाच दिवसांत तिच्या दोन्ही बहिणींना क्षय झाला. सबंध कुटुंब मिशिगन संस्थानांतील सॅगीना येथे हलवायचे तिनें ठरविलें. ती तेथें एका हायस्कूलची मुख्याध्यापिका झाली होती. एवढ्या तरुण वयांत एकाहि स्त्रीला हा मान कधींच मिळाला नव्हता. कुटुंबाची मोठी जबाबदारी तिच्यावर होती. तिचे वय कोवळे होतें. मॅसॅच्यूसेट्स संस्थानातील वेलस्ली येथे हेन्री फाउल ड्यूरन्ट मुलींचे कॉलेज काढणार होते. एवढ्या मोठ्या कुटुंबाचा भार तिच्यावर असल्यानें ॲलिसनें तिकडे लक्ष दिले नाहीं. वेलस्ली बॉस्टन-पासून पंधराच मैलांवर होते. पण ड्यूरन्टकडून तिला एक पत्र आलें आणि त्यांत कॉलेजमध्यें ग्रीक भाषेची प्राध्यापिका म्हणून तिनें यावें अशी त्यांनी विनंती केली होती. तिला तें पाहून जरा आश्चर्यच वाटलें.

एक क्षणभर तिनें विचार केला. तिच्या कल्पनेला भरारी आली. देशांत मुलींची कॉलेजे बोटावर मोजण्याइतकींच होती. मुलींच्या कॉलेजांत शिक्षिका होणें तिला फार आवडलें असते. मुलींच्या मनावर संस्कार घड-विणें, त्यांना नव्या जगाची माहिती करून देणें, या गोष्टी तिला प्रिय होत्या. पण ते तिला शक्य नव्हतें.

"माझा नाइलाज आहे." तिनें ड्यूरन्टना कळवलें, "माझ्यावरच्या कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळें आपलें आमंत्रण मी स्वीकारूं शकत नाहीं."

ॲलिसला आपल्या संस्थेत ओढण्याचा ड्यूरन्टचा निश्चय होता. दोन महिन्यांनीं त्यांनी तिला दुसरे पत्र लिहिले. "आपण गणिताची शिक्षिका म्हणून याल का ?" त्यांनीं विचारणा केली.

याही वेळेस तिनें नकार दिला. डयरन्ट तिचा नाद सोडावयाच्या विचारांत होते. पण तेवढ्यांत त्यांचे स्नेही मिशिगन विद्यापीठाचे प्रो. एंजल त्यांच्या मदतीला धांवून आले. ॲलिस त्यांची विद्यार्थिनी होती. हायस्कूलमध्यें इंग्रजी शिकवतांना ॲलिसला त्यांनीं पाहिलें होतें. मच्छीमारी किंवा शिकार ह्यांच्यासंबंधी बोलावे तितक्या उत्साहानें मुलें कादंबरी, नाटक आणि काव्य ह्यासंबंधी चर्चा करीत होती तें पाहून प्रा. एंजल अगदीं स्तिमित झाले.

प्रो. एंजल ह्यांनीं हेन्‌री ड्यूरन्टना एक तातडीचे पत्र लिहिलें, "ॲलिसला तुम्ही आपल्या कॉलेजांत घेतलेंच पाहिजे."

ड्यूरन्टकडून तिसरे बोलावणें आलें. अर्थातच ॲलिस ते नाकारू शकली नाही. तिच्या बहुतेक कौटुंबिक जबाबदाऱ्या संपल्या होत्या. उरलेल्यां-करितां आपल्या पगारातून दरमहा कांहीं रक्कम तिनें घरी पाठवावयाचे ठरविलें.

"हा अनुभव माझ्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे," ती म्हणाली व तिनें घराचा निरोप घेतला. "आजच्या इतका आनंद मला कधीच झाला नव्हता."

नवीन कॉलेजांत ॲलिसला इतिहास विभागाचे प्रमुख नेमिले होतें. पण तिची भेट होताक्षणीच हेन्री फाउल ड्यूरन्टच्या मनांत तिच्याविषयीं मोठीं मनोराज्यें उभी राहिली. ते आपल्या शाळेच्या एका विश्वस्ताला म्हणाले, "ही काळ्याभोर डोळ्यांची मुलगी वेलस्लीची लवकरच प्रमुख होणार आहे."

कॉलेज नुकतेच सुरू झाले होतें. कामेंही बरीच होती. वसतिगृह, शाळेचे वर्ग, अभ्यासक्रम वगैरे अनेक गोष्टींची व्यवस्था करावयाची होती. ॲलिसची जिवापाड मेहनत चाले. भावी प्रमुखपदाला तिला मुकावे लागेल अशी परिस्थिति निर्माण झाली. आनुवंशिक क्षयरोगाची तिच्यांत चिन्हे दिसूं

लागली. जात्याच ती सशक्त नव्हती. तिच्या फुफ्फुसांतून रक्तस्राव होऊं लागला. "सहा महिन्यांची सोबतीण आहे." डॉक्टरांनीं तिच्या रोगाचें निदान केलें.

मनानें खंगलेली व घाबरलेली ॲलिस तात्काळ मरणाची इच्छा करू लागली. "आयुष्यांत मला कितीतरी गोष्टी करावयाच्या आहेत. माझ्या हातून निम्म्यासुद्धां पार पडल्या नाहींत." दु:खी अंत:करणाने ती विचार करीत असे, "पण आतां काय उपयोग ? वेळ संपली."

दुसऱ्या दिवशी ती जागी झाली. सूर्याचे किरण खोलींत पसरले होते. बाहेरील बाजूस एक पक्षाचे जोडपे चिवचिव करीत होतें. "मी मरणाची वाट पहात येथे पडणार नाहीं." ॲलिसचा आत्मविश्वास जागृत झाला, "मला दुसरा डॉक्टर शोधलाच पाहिजे."

पुढल्याच आठवड्यांत ती न्यूयॉर्कला गेली. सुप्रसिद्ध क्षयरोगतज्ञ डॉ. विलर्ड पार्कर यांना भेटली. "मी फक्त सहाच महिने जगणार आहे हे खरे का ? " तिने विचारले.

डॉ. पार्करने तिला तपासले. सर्व गोष्टींची चौकशी केली. "तुझ्यापाशीं चारित्र्य व धारिष्टय असेल तर तूं जगशील." त्यांनी सांगितलें, "भरपूर मोकळी हवा, विश्रांति व पौष्टिक अन्न यांची तुला जरूरी आहे. माझ्या मतें अजून तुला खूप आयुष्य आहे."

ॲलिस फ्रीमन वेल्स्ली येथे परत आली. डॉक्टरी सल्ल्यानुसार वागूं लागली. परत तिला कधीं क्षयरोगाचा त्रास झाला नाहीं. बऱ्याच वर्षांनी पुन्हा तिला डॉक्टरांनी तपासले. तिच्या फुफ्फुसाची जखम संपूर्णपणें भरून आली होती.

वेलस्ली कॉलेजचे संस्थापक हेन्री ड्यूरंट हे १८८१ मध्यें वारले. तेव्हां ॲलीस फ्रीमनला कॉलेजच्या प्रमुखाची जागा देऊं केली. पण कॉलेजांतल्या प्राध्यापकांत वयानें ती सगळ्यांत लहान होती. विश्वस्तांनीं तिला तीन तासांची मुदत दिली. आपली घोडागाडी जोडून ती शहराबाहेर

मोकळ्या हवेंत गेली. त्या ठिकाणी तिला महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठीं आवश्यक ती शांतता मिळाली.

भोवतालच्या टेकड्यांकडे आणि हिरव्यागार शेतांकडे तिनें नजर टाकली. तेव्हां तिला आपलें बालपण आठवलें. तो काळ एवढा गुंतागुंतीचा नव्हता. पण त्याबरोबरच तिला दुसऱ्याही गोष्टी आठवल्या. विहिरीतून पाणी काढून बादल्या भरून घरांत आणणे, स्वैपाकघराची फरशी घासून स्वच्छ करणें, भावंडांचे स्नान कपडे करणें आणि त्यांच्याबरोबर शाळेत जाणें या सर्व गोष्टींचे चित्र तिच्या मनःश्चक्षूंसमोर उभे राहिलें.

"आयुष्यातली कोणतीच गोष्ट संपूर्णपणें निर्दोष नसते." तिनें दुःखाचा सुस्कारा सोडला, "पण जगरहाटी ही अशीच चालायची."

नवीन क्षेत्रांतील जबाबदाऱ्या आणि संकटे न संपणारी होती. पण मुख्य प्रश्न होता तो तिच्या वयाचा. तिचे वय सव्वीस वर्षांचें होते. कॉलेजमधील कांही मुली जवळ जवळ तिच्या बरोबरीच्या होत्या.

वरच्या वर्गांतल्या मुलींची तिनें एक बैठक बोलावली. "तुमच्यापैकी कांहींजणींना माहीतच असेल," ती म्हणाली, "प्रिन्सिपल ड्यूरंटच्या जागीं मला नेमायचा विचार चालला आहे. तुमच्या मदतीशिवाय हे काम पार पडणें अवघड आहे."

"पण आम्ही काय करावें ?" एकीनें विचारलें.

"तुम्ही शिस्तीनें वागाल तर प्रमुख म्हणून मला माझ्या इतर जबाबदाऱ्या पार पाडायला अधिक मोकळीक मिळेल."

नवीन प्रमुखांनी मुलींना बरोबरीच्या नात्याने वागवायचें ठरवलें. त्यामुळे मुलीपण शिस्तीनें वागू लागल्या. आपल्या पुरतेचे नव्हे तर इतर वर्गांनाही त्यांनी तसेंच वागायला लावलें.

अभ्यासाच्या बाबतींत ॲलिस कडक होती. पण संस्थेतील मुलींना तिथें घरच्यासारखे वाटावे ह्याबद्दलही ती दक्ष असे. कांहीं दिवस ती वसतीगृहांत राहिली. नंतर आपल्या बंगलींत राहायला गेली. तरी सुद्धा रोज ती वसती-

गृहांतील मुलींबरोबर जेवण घेत असे. त्यांच्या अडचणी जाणून घेण्यास ती नेहमीच तयार असे.

प्रत्येक विद्यार्थिनीचे नांव तिला माहीत होते. विद्यार्थिनींच्या व्यक्तिगत जीवनाशीं ती खूप समरस होत असे. कांहीं वर्षांनंतर ती ठिकठिकाणीं माजी विद्यार्थिनींच्या संमेलनांना हजर राहूं लागली. शाळा सोडून गेलेल्या विद्यार्थिनींची ती आस्थापूर्वक चवकशी करी.

ॲलिसनें आपल्यासमोर उच्च आदर्श ठेवले होते. आणि विद्यार्थिनीनीहि तसेंच वागावें अशी तिची अपेक्षा असे. "इच्छित कार्य आपण नक्कीच पार पाडूं शकूं" ती वारंवार म्हणे. कठिण अभ्यासक्रमाबद्दल क्वचित् एखादी मुलगी तक्रार करी. त्यावर ॲलिस सांगे, "ते कठिण आहे हें खरे, पण माझी खात्री आहे तें तूं करू शकशील."

"माझ्या हातून अभ्यास पार पडेल याची तिला खात्री होती, म्हणूनच यशस्वी होण्याचा मी निर्धार केला." कांहीं काळानंतर ती मुलगी म्हणे.

वेलस्ली येथील चार वर्षांच्या शिक्षणाचा मुलींना भरपूर फायदा व्हायला हवा असेल तर त्यांची पूर्वतयारी चांगली झाली पाहिजे हे ॲलिस फ्रीमनने ओळखलें. मिशिगन विद्यापीठांतील आपले पहिले दिवस किती त्रासाचे गेले हे तिला आठवलें. इतर तरुण मुलींना तशाच तऱ्हेचा होत असलेला त्रास तिनें पाहिला. त्यावर मात करण्यासाठीं वेलस्लीजवळच डॅना हॉल येथें तिनें एक माध्यमिक विद्यालय सुरू केलें. आणखीही शाळा अन्य ठिकाणी उघडल्या. तिथें तिच्याच कॉलेजच्या विद्यार्थिनी शिक्षिका झाल्या.

ॲलिस फ्रीमनची शिस्त प्रसंगी फार कडक असे. पण ती तितकीच विनोदप्रिय होती. कॉलेजमध्ये एकदा विषयप्रमुखांची सभा चालू होती. प्रत्येकजण आपापली मतें तावातावानें मांडीत होता. एवढ्यांत डॅना हॉल-मधून तिला बोलावणें आलें. "मुलींच्या एका फ्रेंच प्रहसनाची रंगीत तालीम आहे. मुली तुमचीच वाट पहात आहेत. बाहेर गाडी उभी आहे."

"एक क्षणभर थांबा." ॲलीस कुजबुजली. तिच्या डोळ्यांत आनंदाचे तेज चमकू लागले.

सभागृहांत परत येऊन ती म्हणाली, "जरूरीच्या कामाकरितां मला जरा जाऊन यायचंय्" असें सांगून ती गेली. रंगीत तालीम चालू होती. ॲलिस पुढच्या रांगेत बसली. नाटक संपेपर्यंत ती मनसोक्त हसली. प्रहसन खूपच विनोदी होतें. अर्ध्या तासानंतर ती परतली. विरोधकांचा समेट झाला होता. आणि सभेचे कामकाज सुरळीत चालू होऊन लवकरच संपले.

वेलस्ली येथील विद्यालयाचा नांवलौकिक वाढावा म्हणून तिनें खटपट केली. जवळपासच्या विद्यापीठांतील निरनिराळ्या विषयांच्या प्राध्यापकांची व्याख्यानें ठेवली. हारवर्डमधील एका देखण्या इंग्रजी प्राध्यापकाचें मन तिनें आकर्षून घेतलें. जॉर्ज हरबर्ट पामर हे त्याचें नांव. केंब्रिज येथे त्याची एका मित्राच्या घरीं पुन्हा गांठ पडली. त्या दोघांची मैत्री वाढत गेली. २१ फेब्रुआरी १८८७ रोजी तिचा विवाह ठरला. त्यावेळी ॲलिस बत्तीस वर्षांची होती.

आपल्या विवाहाची बातमी गुप्त ठेवण्याचें वचन तिनें दिले होते. पण हातांतल्या आंगठीनें तिला दगा दिला. तिच्या वाङ्‌गनिश्चयाची बातमी सर्व वेलस्लीभर पसरली. "प्रेमाकरितां ती आपला आयुष्यक्रम बदलत आहे." अनेकांनी नापसंती व्यक्त केली. स्त्रीनें एक नवऱ्याशीं तरी एकनिष्ठ राहावे किंवा आपल्या अंगीकृत कार्याशी अशी त्याकाळी वृत्ती असे. दोन्ही गोष्टी एकाच वेळी शक्य नसत.

ॲलिसने टीकेला भीक घातली नाही. आयुष्याची आठ वर्षे तिनें वेलस्ली येथे खर्च केली होती. हेन्री ड्यूरन्टला आपल्या शाळेला जसें स्वरूप यावे असें वाटत होतें तसे आले होतें. दुसरें कोणीही तिच्या इतकेच तें काम योग्य तऱ्हेने पार पाडू शकले असते. पण विश्वस्तांनीं विनंती केल्यावरून तिनें जमेल तितके दिवस तेथें राहण्याचे ठरविले. लग्नाच्या आदल्या दिवशींच आपली खुर्ची तिनें खाली केली.

लग्नानंतर तिनें आपलें शिक्षणविषयक कार्य अधिक नेटानें चालू ठेविलें. ती आता मिसेस पामर झाली होती. तरीही वेलस्लीच्या विश्वस्त मंडळावर

कायम राहिली. मॅसॅच्यूसेटस् संस्थानाच्या शिक्षणमंडळावर तिला घेण्यांत आलें. तेथेही चांगल्या शाळा, हायस्कूलचे मोफत शिक्षण, आणि शिक्षिकां-करिता सनदपरीक्षा यांकरितां तिनें खूप कष्ट केले.

मुलींच्या कॉलेजासाठीं तिनें व्याख्यानांचे दौरे काढले. शिकलेल्या बायका म्हणजे अनाकर्षक आणि आग्रहीपणाच्या मूर्ति असे लोक समजत. ते तिच्या देखण्या व्यक्तिमत्वामुळें भारावून जात. व्याख्यान संपल्यावर आपल्या मुली वेलस्ली येथें पाठविण्याचा निश्चय करीत लोक घरीं परतत. त्यांच्या-समोर मिसेस् पामरचे सुंदर चित्र उभें राही.

ती नेहेमी कामांत मग्न असे. गृहिणीच्या कर्तव्यांत तिनें कसूर केली नाहीं. प्रो. पामर एकदा आजारी पडले. त्यांना बॉस्टनच्या हॉस्पिटलमध्यें ठेवण्यांत आले. तेथें त्यांना मिळालेली उशी अतिशय टणक होती. त्यांना झोप लागल्यावर ॲलिस चार मैल चालत गेली व घरून पतीकरितां मऊ उशी घेऊन आली.

कांही दिवसांनी तिच्यावर एक लहानशी शस्त्रक्रिया करावयाची ठरली. त्याच वेळी जॉर्ज पामर एक महत्त्वाचा प्रबंध लिहिण्यांत गुंतले होते. त्यांत व्यत्यय आणण्याची तिची इच्छा नव्हती. ती एकटीच दवाखान्यांत गेली व शस्त्रक्रियेनंतर तिनें घरी निरोप पाठविला.

१८९२ मध्ये ॲलिस पामरला नवीनच स्थापन झालेल्या शिकागो विद्यापीठाच्या महिला विभागाचे प्रमुख नेमण्यांत आलें. तिच्या पतीला इतिहासप्रमुखाची जागा देऊं करण्यांत आली. डॉ. पामर यांना हारवर्ड विद्यापीठ सोडणें योग्य वाटले नाहीं. कारण त्यांचे संबंध फार जुने होते. मात्र नवीन जागा पत्करण्याबद्दल तिचे मन वळविण्यांत आले. शिकागो येथें वर्षांतून तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ राहावें लागणार नाहीं या अटींवर तिनें जागा स्वीकरली.

गरीब मुलांच्या शिक्षणाबद्दल तिला विशेष आस्था होती. ज्यांच्या जीवनांत आनंद नाही, त्याना तो थोडा तरी प्राप्त करू द्यावा म्हणून ती

झगडली. बॉस्टन शहरांतील गलिच्छ वस्तीमध्यें उन्हाळ्याच्या सुटींत चालणाऱ्या शाळांत काम करण्यास ती तयार असे.

"आनंदी जीवन कसें जगावें ?" एका विद्यार्थ्यानें विचारलें. "रोज कांहीं तरी चांगले पाठांतर करा." अॅलिसने त्यांना सांगितले, "सुंदर गोष्टींवर नजर ठेवा व दुसऱ्याकरिता कांहीं तरी करा."

पुढील आठवड्यांत या तीन नियमांचे पालन कसे केले गेलें हे तिला समजले. "एक चिमणी नाल्यांत आंघोळ करीत होती. तिच्या गाळ्याभोंवती काळा पट्टा होता. छान दिसायचा तो." एका लहान मुलीनें पाहिलेल्या देखाव्याचे वर्णन केलें. ती मुलगी एकटीच घरी राहून लहान भावाला सांभाळीत असे. मित्रांमध्यें बाहेर खेळावयास जातां येत नसे, याचे तिला दुःखही होई. "त्या दिवशीं सूर्याचे कोवळे किरण खिडकींतून आंत आले. बाळाचे केस चमकूं लागले. मी त्यात रमले व माझा एकाकीपणा नाहीसा झाला."

बऱ्याच वर्षांनंतर जेव्हां पामरनें आपल्या बायकोचे चरित्र प्रसिद्ध केले, तेव्हां एका तरुण वकिलानें तें आपल्या बायकोला दाखविले. "या चरित्रांतली ती गरीब लहान मुलगी मीच होतें." वकिलाची बायको म्हणाली, "ती शिक्षिका मला चांगली आठवते. तिचें नांव मला कधीच माहीत नव्हतें. पण आम्ही तिला सुंदर स्त्री म्हणत असूं. काव्य, संगीत आणि रम्य कल्पना ह्यांचें एक नवें जगच तिनें आमच्यापुढे उभे केले होते."

अॅलिस पामरला या गोष्टीची माहिती झाली असती तर जीवन कृतार्थ झाल्याचे समाधान तिला वाटले असते. एका गृहस्थानें तिला शिक्षणावर पुस्तक लिहिण्याचा आग्रह केला. ती कल्पनाच तिनें धुडकावून लावली. "मुलींना जीवनांत शाहाण्या आणि सुखी करण्याचा मी प्रयत्न करतें." ती म्हणाली, "पुस्तकांचा त्याकरितां उपयोग होत नाहीं. पुस्तकें उपयुक्त असतात पण ती निर्जीव. मग अधिक पुस्तकें मी कशाला निर्माण करू ? खरें महत्त्व लोकांना असतें. तुम्ही लोकांच्या जीवनांत प्रवेश करा. ते दुसऱ्यांच्या करतील. ते आणखी दुसऱ्यांच्या. असे तुमचे कार्य एकसारखे चालूं राहील.

पतीबरोबर ती युरोपच्या प्रवासाला गेली. तेव्हां एकाएकी तिच्या पोटांत दुखूं लागले. तात्काळ शस्त्रक्रिया करणें आवश्यक होतें, व त्यांत धोकाही होता. डॉक्टरांना फारशी आशा नव्हती. ॲलिसला आपल्या परिस्थितीची पूर्ण कल्पना होती. शस्त्रक्रियेच्या आदल्या रात्री आपल्या ठरलेल्या कार्यक्रमांची यादी तिनें डॉ. पामरना दिली. "या लोकांची निराशा टाळण्यासाठीं तुम्हीं ह्या सर्वांना जरूर पत्रे लिहा." तिनें सांगितले.

थोडयाच दिवसांनंतर फ्रान्समधील एका दवाखान्यांत ॲलिस शांतपणें निधन पावली. "ती खरोखरीच एक विलक्षण स्त्री होती." एका नर्सने उद्गार काढले पण ह्याचें रहस्य डॉ. पामरनींच फार चांगल्या प्रकारें सांगितलें. "ज्या ज्या लोकांनी तिला पाहिले त्यांनीं तिला 'धन्य' म्हटलें." डॉ. पामर लिहितात, "ज्या कानांनी तिचे शब्द ऐकले त्यांना कृतार्थ वाटलें."

## ५ : मेरी मॅक्लिऑड बीटन

सॅम्युअल आणि त्यांची पत्नी पॅटसी मॅक्लिऑड मेनव्हिल शहराच्या उपनगरांत राहात होते. त्यांचे घर म्हणजे देवदाराच्या फळ्यांची खचलेली झोपडी होती. मागिलदारी ठेवलेले एक लाकडी घंगाळ म्हणजे त्यांची स्वैपाकघराची मोरी. क्वचित प्रसंगी डुकराचे मांस मिळे. ती त्यांना एक मोठी मेजवानीच वाटे. पण त्याबद्दल कधी तक्रार करायचे त्या जोडप्याच्या मनांतही आले नाही. १८६३ मध्ये निग्रो लोकांची गुलामगिरीतून मुक्तता झाली. त्यांना स्वातंत्र्य मिळाले. त्यांचे कापसाचे एक छोटेसे शेत होते. तसेच त्यांच्या मुलांची गुलाम म्हणून होणारी विक्रीही थांबली. त्यांत ते धन्यता मानीत.

१८७५ मध्ये मेरीचा जन्म झाला. श्वेतवर्णी लोक चांगल्या घरात राहात आणि त्यांना भरपूर अन्नही मिळे. मेरीला त्याचा विषाद वाटे. ते श्वेतवर्णीय होते म्हणूनच त्यांचे जीवनमान उच्च होते का ? कां त्यांना लिहितावाचता येत असे व नीग्रोसारखे ते अशिक्षित नव्हते म्हणून ?

एक दिवस मेरी शेतातून काम करून घरी आली आणि वडिलांना म्हणाली, "मला शिकायचे आहे."

सॅम्युएल खिन्नपणे मान हालवीत म्हणाले, "नीग्रो मुलांकरिता शाळा कुठे आहेत ?"

मेरीची प्रतिक्रिया रागाची होती. नीग्रो मुलांना सापत्न वागणूक कां मिळावी ? तिचे एक मन त्वेषाने विचारी. दुसरे मन म्हणे, दक्षिणेकडील नीग्रोंना अनेक गोष्टी मिळत नाहीत. त्यांतलीच शिक्षण ही एक.

त्या दिवसापासून ती देवाची प्रार्थना करू लागली. मेरीला या गोष्टीची पुढील आयुष्यात नेहमी आठवण होत असे.

एक दिवस मिस एमा विल्सन त्यांच्याकडे आली. तिला वाटले आपण केलेल्या प्रार्थनेचे हे फळ. नाहीतर मॅक्लिऑडच्या झोपडीची चौकशी करीत ती कां आली असती ? शिक्षणाकरिता लहान मुलांच्या शोधार्थ ती फिरत होती. शेतावर काम करण्याऐवजी शिक्षण घेणारी मुले तिला पाहिजे होती.

साहाजिकच सर्व कुटुंबाचे लक्ष मेरीकडे गेले. सर्वात हुषार व महत्त्वाकांक्षी तीच होती. "या मुलीला आम्ही पाठवू शकूं" मॅक्लिऑडने मेरीला पुढे करीत सांगितले.

"खरंच तुम्ही मला वाचायला शिकवणार ?" विस्मयाने डोळे विस्फारित मेरीने एका दमात विचारलें.

"अगदी बरोबर" मिस विल्सनने तिला आश्वासन दिले, "तूं एक हुषार विद्यार्थिनी निघालीस तर मला मुळींच आश्चर्य वाटणार नाही."

"निघेनच-नाही म्हणजे-मी खूप खटपट करीन" मेरी चाचरत म्हणाली. आपली प्रार्थना मान्य केल्याबद्दल तिने मनात परमेश्वराचे आभार मानले.

मिस् विल्सनच्या शाळेत ती जाऊं लागली. लिहिण्यावाचण्यास शिकली. मॅक्लिऑड कुटुंबातील स्वतःचे नांव लिहू शकणारी ती पहिलीच व्यक्ति; इतकेच नव्हे तर स्वतःचे बूट असणारी पहिली व्यक्तीही तीच. जड आणि पत्र्याचे टांके असलेले बूट होते ते. शेतांत अनवाणी हिंडण्याची संवय असलेल्या मुलीला बूट मुळीच सोयिस्कर नव्हते. पण आपल्याला शिकायला मिळते ह्या आनंदापुढे तिला जोडे चावून होणाऱ्या फोडांचे कांही वाटत नव्हते.

शाळा एकाच खोलीत भरे. मेरीने शाळा कधीच चुकवली नाही. मिस् विल्सनने शाळेला "मेव्हिल इन्स्टिटयूट" असे मोठे भव्य नाव दिले होते. पण अभ्यासक्रम संपत आला तशी मेरी अभ्यासाची हेळसांड करू लागली.

एके काळी मेरी अभ्यासाविषयी उत्सुक असे. "तुला शाळेचा कंटाळा आला आहे का ?" मिस विल्सनने आश्चर्याने विचारले.

"कंटाळा ?" मेरी आश्चर्याने उद्‌गारली, "शिक्षणाचा कोणाला कधी कंटाळा येईल का ?"

मिस् विल्सन तिच्या गळयात हात घालून स्मित करीत म्हणाली, "शिक्षण संपल्यावर तूं काय करणार ?"

मेरी हुंदके देत म्हणाली, "तोच तर प्रश्न आहे. परत शेतावर जाऊन कापूस वेचण्याशिवाय अन्य मार्ग नाही."

मेरीची भीति साधार ठरणार असे दिसू लागले. तिचे शिक्षण संपले. तिला डिप्लोमा मिळाला. त्या समारंभाला तिच्या घरची सगळी माणसे गेली होती. पण शेवटी तिला आपल्या त्या चंद्रमौळी झोपडींत कापूस वेचण्याच्या उद्योगालाच जावे लागले.

"परमेश्वरा मला आणखी शिक्षण मिळू दे." मेरीने प्रार्थना केली. पण यावेळी त्या नीग्रो मुलीची प्रार्थना ऐकण्यास परमेश्वरास वेळ नव्हता असें दिसले.

नंतर एके दिवशी एक परिचित व्यक्ती त्यांच्या दारात आली. आपल्या पूर्वीच्या बाईंना पाहून मेरीने आनंदाने धावत जाऊन त्यांना मिठी मारली. "तुझ्याकरिता एक चांगली बातमी आणली आहे" मिस विल्सनने तिला सांगितले, "कॉलराडो संस्थानांतल्या डेनव्हरच्या मेरी क्रिसमन नावाच्या बाईनी आपली आयुष्यातली सगळी कमाई एका नीग्रो मुलीच्या शिक्षणासाठी खर्च करण्याचे ठरविले आहे. माझ्या मते तूंच त्याकरिता योग्य आहेस."

प्रेस्बिटरिअन चर्चच्या मंडळीनी मिस विल्सनला मेनव्हिलेला पाठविले होते. त्याच लोकांनी नॉर्थ कॅरोलायनामधील ककॉर्ड येथे एक स्कोशिया सेमीनरी नावाची एक संस्था चालवली होती. मिस् क्रिसमनच्या देणगीतून मेरीची फी भागवली जाणार होती.

स्कोशिया सेमीनरीमध्ये ती शेतकऱ्याची मुलगी प्रथम अगदी गोंधळली. आंत शिरल्याबरोबर दोन मोठाले जिने होते. श्वास रोखीत ती कठडयाला

लोंबकळली. पूर्वायुष्यात तिने जिना कधीच पाहिला नव्हता. जेवणाच्या टेबलावर ठेवलेली सुरी-काटे पाहिले. संवयीने ती त्याचा उपयोग करावयास शिकली.

त्या संस्थेत श्वेतवर्णीय लोक होते. त्यांनी कोणाच्याही रंगाकडे लक्ष दिले नाही. अडाणी मुलांना शिक्षण देणे व त्यांना उपयुक्त नागरिक बनविणे याकडेच त्यांचे लक्ष होते ही गोष्ट मेरीच्या प्रामुख्याने लक्षात आली.

शिक्षणक्रमात लॅटिन, इंग्रजी निबंधलेखन, इतिहास आणि बीजगणित ह्यांचा समावेश असे. वादविवाद मंडळात मेरीने आपले नांव घातले. ती सामुदायिक गीतगायनाला हजर राहात असे. त्यातच माहीत नसलेल्या एका गोष्टीचा तिला उलगडा झाला. एक दिवस कंकोर्डच्या रस्त्याने ती दुपारी चालली होती. तिला वाटेत एक गिरणी दिसली. आंतील साच्यांचा मोठा आवाज तिच्या कानी आला. मोठाले कापडाचे तागे, चादरी, टॉवेल्स तयार होत होते.

"शेतांत मी कापूस गोळा करते. त्याचें पुढे काय होते हे मला आता कळले." तिचे शेतातले काम संपले होते. पण तिचे कष्ट मात्र संपले नव्हते. स्कोशियामधला शिक्षणक्रम सात वर्षांचा होता. प्रत्येक उन्हाळ्याच्या सुट्टीत ती कामे करी व पुढील वर्षाच्या पुस्तकांची सोय करी.

शिक्षण संपत आले व तिने आफ्रिकेत मिशनरी म्हणून जाण्याचे ठरविले.

"शिकागोमधल्या मुडी बायबल संस्थेत तूं अर्ज कां करीत नाहीस ?" स्कोशिया संस्थेचे संचालक डॉ. सॅटरफिल्ड यांनी सुचविले, "प्रेसबिटीरियन मिशनकडे तुला कांही स्कॉलरशीप मिळेल का याची मी चौकशी करीन."

कांही आठवड्यांनंतर दोन्हीकडून उत्तरे आली. मुडी बायबल संस्थेत तिला प्रवेश मिळाला व मेरी क्रिसमनच्या कृपेने स्कॉलरशिपही मिळाली.

एका भावी मिशनरी बाईने-मेरी मॅक्लिऑडने–परमेश्वराचे आभार मानले.

पांच मैल लांब शाळेत जाणे तिला एके काळी साहसाचे वाटे. आज ती शिकागोच्या लांबच्या प्रवासास निघाली होती. बायबल इन्स्टिटयूटमध्ये तिला प्रवासाची खूपच संधी मिळणार होती. त्या संस्थेचा गॉस्पेल कार नावाचा रेल्वेचा एक खास डबाही होता. गरीब वस्तीतून चर्चेस व शाळा उघडण्याकरिता विद्यार्थी त्यांतून प्रवास करीत.

एकदा डाकोटा संस्थानांत प्रवास करीत असतांना ती एका पाद्र्याच्या घरी उतरली. त्याच्या पांच वर्षाच्या मुलीने नीग्रो माणसे कधींच पाहिली नव्हती.

मेरीला पाहिल्यावर ती मुलगी म्हणाली, "आई या बाईने हात तोंड स्वच्छ धुतले नाही. ती अतिशय गलिच्छ आहे."

आईने थोडेसे भीतीनेच पाहुण्याकडे पाहिले. तिच्या नजरेत दयेची याचना होती.

मेरीला हासूं आले. मुलीच्या आईवडिलांकडे पाहात ती म्हणाली, "बोलूं दे तिला."

नंतर मुलीला मांडीवर घेऊन तिने तिचे चिमुकले हात आपल्या गालां-वरून फिरवले, "बाळ बघ हा रंग पुसून जात नाही. तो देवाने जसा केला तसाच राहतो."

लवकरच त्या मुलीची व पाहुणीची गट्टी जमली. "या फुलांकडे पाहा." मेरी टेबलावरील फुलांकडे बोट दाखवीत म्हणाली, "माणसांप्रमाणे फुलेही देवाने निरनिराळ्या रंगाची निर्माण केली आहेत. ही फुलें एकत्र केली की एक सुंदर गुच्छ तयार होतो."

त्या छोटया मुलीने मेरीला मिठीच मारली. नंतर ती मांडीवरून खाली उतरली. मुलीच्या आईने मेरीचा ह त धरून म्हटले, "माझ्या मुलीला धडा तुम्ही शिकविलात फार मोठे उपकार झाले माझ्यावर." तिचे डोळे पाणावले, "तुमच्या या प्रवासात एवढीच गोष्ट जरी तुमच्या हातून झाली तरी तुमचा प्रवास सत्कारणी लागला असे म्हणावे लागेल."

बायबल इन्स्टिटयूटमधले तिचे शिक्षण संपले. आफ्रिकेतील मिशनरी जागेकरिता तिने तात्काळ अर्ज केला.

मिशनच्या संचालकांनी तिला कांही वर्षे थांबण्याची विनंती केली. अभ्यास, कठीण परिश्रम, प्रार्थना यांचे चीज झाले नाही. तिला अतोनात वाईट वाटले. तिने कसेबसे अश्रु आवरले.

डॉ. सॅटरफिल्डनी तिला जॉर्जिया संस्थानातल्या ऑगस्टा येथे शिक्षिका म्हणून जाण्याची विनंती केली. मेरीला त्याबद्दल जास्त औत्सुक्य वाटले नाही.

"मला वाटते पत्करावी ती नोकरी." तिच्या आवाजात अनिश्चितता होती, "नाही नाही कोठलेही काम मला आता सारखेच."

हेन्स नॉर्मल इन्स्टिटयूटमध्ये आल्याबरोबर मेरीची सगळी उदासीनता गेली. मिस् ल्यूसी लेनीशी तिची गांठ पडली. मिस् लेनीचा जन्म गुलामगिरीत झाला होता. तिच्या मालकाने तिला लिहिण्यावाचण्यास शिकवून आपल्या ग्रंथालयाचा भरपूर उपयोग करण्याची संधी दिली होती. यादवी युद्धानंतर भेटेल त्या नीग्रो तरुणाला ज्ञान देण्याचे सत्र तिने सुरू केले. मेरीवर एकदम तिचा प्रभाव पडला. "आफ्रिकेतील नीग्रोंइतकीच अमेरिकेतील नीग्रो लोकांनाही शाळेची जरूरी आहे याची मला आतां जाणीव झाली आहे" मेरी म्हणाली. मिशनरी होण्याचे तिचे स्वप्न भंगलें होते. पण आपल्या लोकांच्या शिक्षणाकरिता वाहून घेण्याचे तिने आता ठरविले.

चर्चच्या गायक संघातला तरुण व देखणा बीटन हा सुद्धा तिचे मन चळवूं शकला नाही. "मी शिक्षिका आहे." तिने निग्रहाने सांगितले, "आणि आता जन्मभर मी शिक्षिकाच राहाणार."

अलबर्टस् बीटन तिला भेटायला येतच राहिला. लवकरच ती दोघे विवाहबद्ध झाली. एका वर्षानंतर त्यांना मुलगा झाला. त्याचे नांव अलबर्ट मॅक्लिऑड बीटन असे ठेवण्यात आले. त्यांना तेवढाच मुलगा होता.

मुलाच्या जन्मानंतर आपला शिक्षिकेचा पेशा अधिक नेटाने चालू ठेवण्याचे तिने ठरविले.

झोपलेल्या मुलाकडे बघून तिच्या मनांत विचार येई, "या जगांत आपल्या बाळाला फार थोडी संधी मिळेल. त्याच्याकरिता आपणच झगडले पाहिजे. चांगल्या शाळेवाचून कांही करता यायचं नाही" तिने मनाशी ठरविले, "त्याकरिता मला उद्योगाला लागून शाळा सुरु केली पाहिजे."

अलबर्ट पांच वर्षांचा झाला. त्याच सुमाराला फ्लोरिडा ईस्ट कोस्ट रेल्वे-मार्गाचे काम सुरू झाले. बहुतेक सर्व मजूर नीग्रोच होते. श्वेतवर्णीय मजुरांच्या मानाने फारच थोडया मजुरीवर ते काम करीत. नीग्रो लोक रेल्वे रस्त्याच्या दुतर्फा गरीब वस्त्यांत झोपडया बांधून राहात. त्यांची मुलें घाणेरडया पाण्याच्या नाल्यात खेळत.

"नीग्रो लोकांची स्थिती इतकी वाईट असेल याच्यावर माझा विश्वास बसत नाही." तिच्या एका मित्राने ह्यासंबंधी सांगितले तेव्हा ती म्हणाली, "मला स्वतःच त्यांत लक्ष घातले पाहिजे."

अलबर्टचा हात धरून ती डेरोना बीचकडे निघाली. अर्धनग्न हाडकुळया अशा त्या मुलांकडे बघून तिने मनाशी विचार केला "याच ठिकाणी मी आपली शाळा सुरू करणार."

तिने स्थापन केलेल्या संस्थेला पुढे "डेरोना एज्युकेशन अ‍ॅण्ड इंडस्ट्रियल ट्रेनिंग फॉर नीग्रो गर्ल्स" असे नांव मिळाले. पण सुरवात करतांना तिच्या-जवळ फक्त दीड डॉलर एवढीच रक्कम होती. तरीपण न डगमगता तिने आपले कार्य चालू ठेवले. एका सच्छील गृहस्थाकडून तिने ओक स्ट्रीटवर एक झोपडी भाडयाने घेतली. "पैशाची व्यवस्था झाल्यावर मी तुमचे भाडे देईन" असे तिने वचन दिले.

जुने सामान, मोडकेतोडके पत्रे, लाकडी पेटया, फळया, खोकी व टोपल्या या सर्व गोष्टींचा शाळेकरिता उपयोग करण्यात आला. खुर्च्या व बांकें नव्हतीच. शाई घरीच तयार केली जात असे. लाकडी कोळशाचा उपयोग पेन्सीलीसाठी करावा लागे. तीन ऑक्टोबर १९०४ रोजी तिच्या शाळेचे उद्घाटन झाले. "ही फक्त सुरवात आहे" तिने प्रतिज्ञा केली.

दोन वर्षांच्या आंतच विद्यार्थिनींची संख्या सहावरून अडीचशेंवर गेली. मेरीचा उत्साह वाढत गेला. डेटन शहराच्या नीग्रो भागांत शाळेसाठी अधिक मोठी इमारत बांधण्याकरिता जागा मिळविण्याचा कसोशीने प्रयत्न सुरू झाला. अखेर तिने योग्यशी जागा शोधून काढली. किंमतीची चौकशी करण्याकरिता ती मालकाकडे गेली. "ही जागा तुम्हाला कशासाठी विकत पाहिजे?" तो तिरस्काराने म्हणाला, जागा दलदलीची आहे. डासांचा तिथे फार उपद्रव आहे. भोवतालचे लोक त्या ठिकाणी कचरा आणून टाकतात."

"खरंच ?" ती म्हणाली, "ही गोष्ट माझ्या कधीच लक्षात आली नाही. मुलामुलींच्या शाळेकरितां मला ती जागा पाहिजे होती. श्रद्धा, आणि प्रीति ह्यांनी युक्त अशा अंतःकरणाने जीवन जगण्यासाठी त्यांना इथे तयार करावें असा माझा बेत आहे."

जमीन मालकाला नवलच वाटले. आपली जमीन दोनशे डॉलर्संना विकण्यास तो तयार झाला. "पांच डॉलर्स आता द्यावे लागतील" तो म्हणाला, "आणि दोन वर्षांच्या आत उरलेले."

उधारउसनवारी करून, आणि प्रसंगी भीकही मागून मेरीने पांच डॉलर्स जमविले. त्याकरिता तिला खूप कष्ट पडले. पण सरतेशेवटी हातरुमालात जमविलेल्या नाण्यांची पुरचुंडी बांधून घरमालकाला कबूल केल्याप्रमाणे पैसे दिले. कचरपट्टीची ती जागा अखेर तिच्या मालकीची झाली. तिचे नंदनवन बनविण्याचे तिने ठरविले.

मुलींच्या गायनवादनाच्या पथकाचे कार्यक्रम करून तिने मदत मिळविली. आठवड्यांतून एक दिवस ती स्वतः सायकलवरून घरोघर फिरे. प्रचाराच्या सरळ साध्या पद्धतीमुळे तिला खूपच मित्र मिळाले.

जेम्स एन्. गॅम्बल हा एक साबणाचा लक्षाधीश व्यापारी होता. सुरवातीला त्याने १५० डॉलर्स दिले. पुढे पुढे त्याने केलेली मदत त्यांच्या कितीतरी पटीने होती तिचा दुसरा मित्र टॉमस एच्. व्हाईट शिवणाच्या यंत्राचा कारखानदार होता. त्याने मरतेसमयी शाळेकरिता ६७००० डॉलर्सचा विश्वस्तनिधी ठेवीला.

त्या कचरपट्टीवर दोन वर्षांत चार मजली इमारत उभी राहिली. तिच्या प्रवेशद्वारावर "शिकण्याकरिता आंत या" व त्याच दरवाज्यांतील आंतील बाजूस "सेवेकरिता बाहेर जा." अशी वाक्यें लिहिली होती. दहा वर्षांनंतर त्या संस्थेत ४०० विद्यार्थी होते. संपूर्ण हायस्कूल शिक्षणाशिवाय गृहशास्त्र, अध्यापन, शुश्रूषा हेहि विषय शिकविले जात.

विद्यार्थिनींच्या मदतीने तिने आणखी उपक्रम सुरू केले. उत्तर फ्लॉरिडाच्या जंगलात नीग्रो लोकांना पाइन वृक्षाचा रस गोळा करण्याच्या कामाला लावलेले होते. त्यांना मजूरी कमी पण प्यायला दारू पाहिजे तेवढी मिळत असे. झाडाच्या डिकापासून टरपेंटाईन तेल गाळले जाई. कामगार तात्पुरत्या वसाहतीत राहात. त्याला टरपेंटाईन कॅम्प म्हणत. ते जीवन अतिशय निकृष्ट होतें. जीवन अति कष्टाचे असे. त्यामुळे नीग्रो लोक दारू पीत. त्यामुळें क्षयरोग आणि साहजिकच उपासमारही सार्वत्रिक होती.

त्या कॅम्पमधील नीग्रो लोकांचे तिने पुनर्वसन करण्याचे ठरविले. पाच वर्षांत सबंध उत्तर भागात तिने मिशनच्या शाळा अनेक ठिकाणी सुरू केल्या. तिच्या करडया शिस्तीखाली कॅम्पमधील मुलांना लिहितावाचता येऊ लागले. त्यांच्या आईबापांना तिने स्वच्छतेचे धडे दिले. पौष्टिक आहार कसा बनवावा हे शिकविले आणि मिळणाऱ्या मजुरीत खर्च भागवण्याचा कानमंत्र दिला.

मिसेस बिटनचे पुढचे महत्त्वाचे कार्य म्हणजे इस्पितळाची उभारणी. १९११ मध्ये तिच्या एका विद्यार्थिनीला अपेंडिससायटीस झाला. तिची स्थिती गंभीर झाली. घाबरलेल्या मेरीने स्थानिक दवाखान्याकडे मदतीची याचना केली.

"नीग्रोंना प्रवेश नाही" एका परिचारिकेने उद्दामपणें उत्तर दिले.

"रोग्याची स्थिती गंभीर आहे." तिने सांगितले.

"असेल !" परिचारिका गुरगुरली.

शुभ्र पोषाखांतल्या एका डॉक्टरला व्हरांड्यांतून जाताना तिने पाहिले आणि धावत जाऊन त्याला परिस्थिती समजावून सांगितली. त्या दयाळू

डॉक्टरने शस्त्रक्रिया केली. पण इस्पितळांतल्या अधिकाऱ्यांनी त्या मुलीला स्वैपाकघराच्या मागील गॅलरीत झोपविले.

"माझ्या तळपायाची आग मस्तकाला गेली होती." त्या प्रसंगाची आठवण झाल्यावर मेरी बीटन चिडत असे.

दवाखान्यातून ती शाळेत परत आली. आपल्या मित्रांना व हितचिंतकांना तिने भराभर पत्रे पाठविली. ५००० डॉलर्स जमविण्यात तिला यश आले. त्या पैशांतून २० कॉटस् असलेल्या दवाखान्याचा उदय झाला. तेथे गोरे व नीग्रो असे दोन्हीही डॉक्टर होते. तिच्या शाळेंतील विद्यार्थिनी परिचारिकांचे काम करीत. डेटोना शहरांतील गोरे नागरिक वारंवार त्या दवाखान्याचा आश्रय घेत. थोर अंतःकरणाच्या त्या संस्थापिकेने सर्वांना समान लेखले. कुणालाही परत पाठविले नाही.

१९२३ मध्ये डेटोना एज्युकेशनल आणि इंडस्ट्रियल स्कूल जवळच्या एका पुरुषांच्या संस्थेत विलीन झाली. बिटन कुकमन कॉलेज असे त्याचे रूपांतर झाले. त्यांत मुलामुलीना सहशिक्षण घेता येत असे. दरम्यानच्या काळांत त्याची संचालिका मेरी बीटन नामांकित शिक्षणतज्ज्ञ म्हणून प्रसिद्धीस आली.

लॉस एंजिलिस येथे नीग्रो स्त्रियांचा एक राष्ट्रीय मेळावा भरला होता. अध्यक्षपदावरून भाषण करताना नीग्रो मुलींना अधिक शिष्यवृत्त्या मिळण्याची आवश्यकता तिने प्रतिपादन केली. तिच्या शेजारी एक वृद्ध स्त्री बसली होती. भाषणाच्या शेवटी मिसेस बीटनला मोठा पुष्पगुच्छ अर्पण करण्यात आला. तिने तो गुच्छ तात्काळ त्या वृद्ध स्त्रीच्या पुढें केला.

"ह्यांचे नांव" त्यांची लोकांना ओळख करून देतांना मिसेस बीटन म्हणाली, "मेरी क्रिमन. त्यांनी दिलेल्या शिष्यवृत्तीमुळेंच मला शिक्षणाचा लाभ घेता आला."

साऊथ कॅरोलायनाच्या कपाशीच्या शेतामधून सुरू झालेला तिचा जीवन-मार्ग अखेर वॉशिंग्टनला पोचला. १९३० मध्ये प्रेसिडेंट हर्बर्ट हूवरनी मिसेस बीटनला आमंत्रण दिले आणि मुलांचे आरोग्य व संरक्षक या विषयावरील

परिषदेत भाग घेण्याची तिला विनंती केली. हुवरनंतरचे अध्यक्ष फ्रँकलिन डी रूझवेल्ट यांचाही तिच्या सेवावृत्तीवर विश्वास होता. नीग्रो तरुणांच्या नोकरीविषयक समितीवर तिची प्रथम नेमणूक करण्यात आली. नंतर राष्ट्रीय युवक संघटनेच्या अल्पसंख्याकांच्या विभागाचे तिला प्रमुख नेमण्यात आले.

मेरी बीटनने प्रथम याबाबत निर्णय घेतला नाही. "माझ्या कॉलेजचे मला काम आहे." ती म्हणाली.

"नीग्रो स्त्रियांकरिता प्रथमच अमेरिकेत अशा प्रकारची जागा निर्माण केली जात आहे याची तुला कल्पना आहे का?" त्या जागेचे महत्त्व एका मित्राने तिच्या नजरेस आणले.

मग तिच्या मनात त्यासंबंधी कांही शंका राहिली नाही. जागा स्वीकारण्याचे पत्र तिच्याकडून आल्यावर अध्यक्ष रूझवेल्टना अतिशय आनंद झाला.

"मिसेस बीटन एक थोर स्त्री आहे." ते म्हणाले, "तिचे पाय वस्तुस्थितीवर रोवलेले आहेत. इतकेच नव्हे तर ते त्याहूनही खोल गेलेले आहेत."

तिचं कर्तव्य इतकें थोर होते तरी पण अनेक लोक तिला अमेरिकेची दुय्यम दर्जाची नागरिक मानीत याची तिला जाणीव होती. हॉटेलमध्ये तिला प्रवेश मिळत नसे. रेल्वेच्या वेटिंग रूममध्ये तिला स्वतंत्र खोलीत बसावे लागे. पण तरीही एका गोष्टीची तिला वारंवार आठवण होई. व्हाईटहाऊसमध्ये तिला मेजवानीचे आमंत्रण होते. त्या ठिकाणी तो प्रसंग घडला.

"दक्षिणेकडील अनेक स्त्रिया त्या ठिकाणी जमल्या होत्या. नीग्रोबद्दल त्यांचीं काय मते होती याची मला पूर्ण कल्पना होती. म्हणून मी बाजूबाजूलाच होते." ती म्हणाली.

त्या प्रसंगी अध्यक्षांची आई मिसेस जेम्स रूझवेल्ट यांनी मेरीला पाहिले. तिचा हात धरून त्यांनी तिला एलिनॉर रूझवेल्टच्या उजव्या बाजूच्या खुर्चीवर बसविले.

मिसेस बिटननी आपल्या पत्रांत लिहिले, "केवढा मान होता तो. सबंध अमेरिकेतील मोठमोठ्या स्त्रिया तेथे जमल्या होत्या. माझी खुर्ची त्या सर्वांच्या मध्यभागी होती. तें पाहून तिथल्या नीग्रो नोकरांचे चेहरे उजळून निघाले. त्यांची छाती अभिमानाने फुलून आली."

दुसऱ्या एका प्रसंगी, दुसरे महायुद्ध चालू असतांना एका पोलिसाने तिला तेथून उठण्यास सांगितले. पण ऐनवेळी एका लष्करी शिपायाने तिला मदत केली.

"त्या स्त्रीला तेथेच वसूं दे" तो ओरडून म्हणाला, "त्याकरितांच तर आपण लढतो आहोत."

स्त्रियांच्या लष्करी पथकावर मिसेस बीटन हिला दुय्यम अधिकारी नेमण्यात आले. लढाई संपल्यावर वंशभेदाच्या प्रश्नावर सॅन्फ्रॅन्सिस्को येथे परिषद भरली होती. त्या परिषदेने युनोची सनद तयार केली. त्यावेळी आंतरराष्ट्रीय सद्भावनेसंबंधीच्या प्रश्नावर मिसेस बीटनला सल्लागार नेमण्यात आले.

तिला अनेक मानसन्मानाची पदके मिळाली. त्यांत स्पिगार्न मेडल हे सर्वश्रेष्ठ होते. नीग्रोंच्या प्रगतीकरिता झटण्याबद्दल ते तिला देण्यात आले. "अमेरिकन नीग्रो लोकांसाठी प्रगतीकरिता आदल्या वर्षी किंवा त्या पूर्वीच्या वर्षात केलेल्या कार्याबद्दल बहुमानाचे प्रतीक म्हणून हे पदक देण्यात येते." अशा तऱ्हेचा सन्मान मिळविणाऱ्या शास्त्रज्ञ जॉर्ज वाशिंग्टन कार्व्हर, गायक मेरियन अॅण्डरसन, मजूर पुढारी ए. फिलिप रॅन्डॉल्फ आणि युनोंतील शांतिदूत डॉ. राल्फ बंच यांच्या श्रेणीत बसण्याचा मान मिसेस बीटनला मिळाला.

वयाच्या ७५ व्या वर्षी १९५० साली मेरी आपल्या मेव्हील गांवाला गेली. ह्यामागे तिची एक भावना होती. तेथे पूर्वीसारखीच कापसाची शेते होती. तसेच मिस विल्सनची शाळा पण होती. शाळा पूर्वीपेक्षां अधिक खालावली होती. आणि विशेष म्हणजे ६० वर्षांहून अधिक काळ लोटला तरी त्या भागांत नीग्रोंसाठी तेवढी एकच शाळा होती.

“आणखी कितीतरी कार्य शिल्लक आहे.” मेरी बीटनने श्वास सोडला, “पण मी आता फार थकले आहे. हे कार्य दुसऱ्या कुणीतरी आता हाती घेतले पाहिजे.”

मेरी मॅक्लिऑड बीटन हिला १९५५ साली मृत्यूने गाठले. पण तिने स्थापन केलेली शाळा वाढतच चालली आहे. ज्याकरिता तिने आपले आयुष्य खर्ची घातले तें कार्य व त्याचे महत्त्व या शाळेच्या रूपाने वृद्धिंगत होत आहे.

# ६ : ॲलिस मॉरिसन नॅश

न्यू हॅम्पशायरमधील नॉर्थवुड शहरांतल्या कुणालाही विचारले तरी तो सांगेल कीं सुंदर आणि पाणीदार डोळ्यांची ऑलिस मॉरिसन आपल्याला शिक्षक व्हायचे आहे असे म्हणत असल्याचे आठवते. तिला नेहमी तींच स्वप्नें पडायची आणि ती त्यासंबंधीच बोलायची. नार्थवुडच्या शाळेतील शिक्षण-क्रम संपल्यावर तिने निर्णय घेतला व जवळच असलेल्या न्यू हॅमटन् येथील लिटररी आणि बायबल स्कूलमध्ये आपले नांव घातले व दोन वर्षांचा शिक्षिकेचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे ठरविले.

१९०० सालामध्ये शिक्षणक्रम पुरा होईपर्यंत त्या तरुण विद्यार्थी-शिक्षिकेने कोठे नोकरी करावयाची हे ठरविले नव्हते. न्यू हॅम्पशायरमध्ये शेकडो प्राथमिक शाळा होत्या. पण ॲलिसला दूरचा प्रदेश पाहाण्याची इच्छा होती. कदाचित् बोस्टन, न्यूयॉर्क किंवा पश्चिमेकडीलही प्रदेश यांपैकी कोठेही जाण्यास ती तयार होती.

एक दिवस सकाळी तिची एक वर्गमैत्रीण वाटेत भेटली. "मी आतांच एका जागेसंबंधी ऐकले आहे. कदाचित् तुला योग्य वाटेल," तिची मैत्रीण म्हणाली, "न्यूजर्सीमध्ये व्हाईनलँडजवळ एका शिक्षिकेची जरुरी आहे. बुद्धि-हीन मुलांची ती संस्था आहे."

"बुद्धिहीन मुलं ?" ती म्हणाली, "पण मला तर अशा मुलांच्या बाब-तीत कांहींच कळत नाहीं."

तिची मैत्रीण खांदे उडवीत म्हणाली, "पण दुसऱ्या कोणाला काय माहिती आहे ?"

ॲलिसने ही सूचना प्रथम धुडकावून लावावयाचे ठरविले. अनुभव नसताना एकदम बुद्धिहीन मुलांच्या बरोबर शिक्षिकेचें काम सुरू करणे कठीण होते.

त्यांतच व्हाईनलॅण्ड न्यूजर्सीबद्दल तिला काहीच माहीत नव्हते. पण अधिक विचार केल्यावर तिला ती कल्पना आकर्षक वाटली. "आव्हान स्वीकारणे मला आवडते" असे ती नेहमी म्हणे, "ते सिद्ध करण्याची संधी अनायासेच आली आहे."

दुसऱ्या दिवशी आपल्या मैत्रिणीला तिने गाठले. न्यूजर्सीमधील गांवाचे नांव विचारून कोणाला अर्ज करावयाचा याची माहिती पण मिळविली.

कांही आठवड्यांतच व्हाईनलॅण्डला जाणारी गाडी तिने पकडली. चकचकीत लोहमार्गाशेजारून न्यू हॅम्पशायरमधील हिरव्यागार टेकड्या व झाडे मागे टाकीत गाडी भरधाव चालली होती. ॲलिसच्या डोक्यात नोकरीचे विचार भराभर येऊं लागले.

मंदबुद्धीचा माणूस तिने कधीच पाहिला नव्हता. पण वेड्या व मंद बुद्धीच्या मुलांबद्दल लोकांची कुजबूज मात्र तिने ऐकली होती. मंदबुद्धी मूल म्हणजे कुटुंबाला लागलेला कलंक असेच बहुतेक लोक मानीत आणि एखाद्याला तसे मूल असलेच तर चारचौघात त्याचा कुणी उल्लेख करीत नसे.

त्या ट्रेनिंग स्कूलबद्दल अधिक माहिती मिळविण्याची तिने विशेष खटपट केली. १३ वर्षांपूर्वी फिलाडेल्फियामधील एक पाद्री स्टीफन ऑलिन गॅरिसन यांनी आपल्या घरी मिलव्हिल येथे ही संस्था सुरू केली. १८८८ मध्ये गॅरिसननी व्हाइनलॅण्डमध्ये मोठी इमारत घेतली. संस्था त्या जागेत हलविली. तेव्हापासून ती तेथेंच आहे. शाळेची सुरुवात सात मुलांनी झाली. इमारत यथातथाच होती. पण गॅरिसन यांच्या मृत्युसमयी शाळेचा परिसर १७० एकरांचा झाला होता. त्यांत दहा इमारती होत्या. मुलांची संख्या शंभराचेवर गेली होती. त्यांच्या मृत्यूनंतर शाळेची सूत्रें एडवर्ड रॅन्सन जॉन्स्टन यांच्याकडे आलीं. त्यांनी शाळेला वाहून घेतले.

व्हाईनलॅण्ड स्टेशनवर ती उतरली. "मला प्रथमतः प्रोफेसर जॉन्स्टन यांच्या हाताखाली काम करावे लागणार आहे." ती अस्वस्थपणे विचार करू लागली, "माझ्या नवीन कामात ते मला सांभाळून घेतील असा मला विश्वास वाटतो."

शाळेच्या मुख्याध्यापकांच्या कचेरीत तिने प्रवेश केला. प्रोफेसरसाहेब एका खुर्चीवर बसले होते. त्यांच्या मांडीवर एक सुंदर लहानशी मुलगी व बाजूला तीन मुलें खेळत होती. ब्रेर रॅबिटच्या साहसी कथा ते मुलांना गोष्टी-रूपाने सांगत होते. ते दृश्य पाहून ॲलिसला एकदम हायसे वाटले.

"अरे वा !" दारांत उभ्या असलेल्या तरुण स्त्रीला पाहून प्रोफेसर म्हणाले, "आपण मिस मॉरिसन का ?"

गोष्ट ऐकण्यात दंग झालेल्या मुलांना प्रोफेसरसाहेब बाजूला सारणार होते; पण ॲलिस म्हणाली, "कृपया आपली गोष्ट संपवा. मुलांइतकाच मलाही ती ऐकण्यात आनंद वाटतो आहे."

त्यांनी गोष्ट पुढे चालू केली. हळूच बाकाशेजारच्या खुर्चीवर ती बसली. ब्रेर रॅबिटची साहसकथा संपली. मुलें आनंदाने खेळण्यास बाहेर पडली. प्रो. जॉन्स्टन खुर्चीवरून उठले व त्यांनी नवीन शिक्षिकेचे शाळेत औपचारिक स्वागत केले.

"आपण सर्वजण या शाळेचे आधारस्तंभ आहोंत." ते म्हणाले, "पण या मुलांकरिता उत्कृष्ट मार्ग शोधणे हे आपले पहिले काम आहे."

न्यू हॅम्प्टनमध्ये ती फक्त प्राथमिक शिक्षिका म्हणूनच तयार झाली होती. मात्र या ठिकाणचा अनुभव तिला वेगळाच आला. व्हाइनलण्डमध्यें तिचे काम वर्गापेक्षा वर्गाबाहेरच अधिक होते. आपल्या खोलीत जाऊन सामानाची तिने आवराआवर केली. एवढ्यात शिक्षिकांची प्रमुख मिस व्हरनॅन दार ठोठावूं लागल्या.

"मिस मॉरिसन !" मिस व्हरनॅन म्हणाल्या, "आज संध्याकाळी मुलांच्या जेवणाची व्यवस्था तुम्ही पहा."

निमुटपणे ती मिस् व्हरनॅनच्या मागे गेली. जेवणघरांत आल्यावर तिची निराशा झाली. त्या ठिकाणी चिमुकली चुणचुणीत मुलें भेटतील अशी अपेक्षा होती. त्याऐवजी मोठीच माणसे तिला आढळली. त्यांपैकी कांही तर तिच्यापेक्षांही उंच होती.

तरुण शिक्षिका दरवाजांत थबकली. मिस व्हरनॅननी तिच्या मनांतील भीती ओळखली व चटकन एका सडपातळ पोक काढलेल्या मुलाकडे वळून हांक मारली,

"टीम ! आज संध्याकाळची प्रार्थना तूं करशील का ?"

"होय मिस व्हरनॅन." टीमच्या चेहऱ्यावर हासूं उमटले. सगळ्या मुलांनी माना खाली घातल्या. टीमने प्रार्थना केली.

सगळ्यांनी 'आमेन' म्हटले. त्यांत ॲलिस मॉरिसन सामील झाली आणि लगेच टेबलाशी मुख्य जागेवर बसली. लवकरच टीमने आपल्या दोस्तांची ओळख करून दिली. एकेकाच्या गमतीजमतीपण त्याने तिला सांगितल्या.

जेवणे संपली. "मिस मॉरिसन तुम्ही मला खूपच आवडतां." टीम म्हणाला, "आपल्या दोघांची मैत्री नक्कीच जमेल."

"त्यांत मला आनंदच आहे." ॲलिस त्याला म्हणाली, "माझ्या एखाद्या वर्गांत तूं असशीलच ?"

हें संभाषण ॲलिसने प्रो. जॉन्स्टन यांच्या कानांवर घातले. पण त्यांनी तिला चक्क सांगितले, "वर्गातले शिक्षण घेण्याइतकी त्याच्या बुद्धीची वाढ झालेली नाही. ह्या शाळेत त्याने आपल्या आयुष्याची सुरवात एक निरोप्या म्हणून केली आहे."

विशीचा उंबरठा नुकताच ओलांडलेल्या ॲलिसला आश्चर्याचा धक्का बसला. "पण साधें वाचन तो शिकूं शकेल व थोडे थोडे हिशोबहि त्याला जमतील." ॲलीस म्हणाली.

"पण एक गोष्ट जरूर लक्षांत ठेवली पाहिजे. ती अशी की हे नेहमीचे विद्यार्थी नव्हेत, त्यांची बुद्धि अतिमंद आहे. पण या गोष्टी तुम्हांला अनुभवानेच चांगल्या कळतील. अनुभवाचे महत्त्व फार मोठे आहे. टीमला मी तुमच्या वर्गात पाठवीन."

ॲलिस मॉरिसनला या विद्यार्थ्याकडे लक्ष देणे फारच कठीण पडले. तिने खूप पराकाष्ठा केली. ती फळ्यावर कॅट हा शब्द लिहीत असे. त्याचा

उच्चार ती टिमकडून घोकून घेई. दुसरे दिवशी कॅट ह्या शब्दाचे स्पेलिंग त्याला विचारी. तो हासत उत्तर देई. "मला मांजरे फार आवडतात. आपल्या जेवणघरात मांजरीची नवी पिल्लं आहेत. पाहिलीत का तुम्ही ती?"

बेरीज वजाबाकी शिकवितांना तिला तोच अनुभव आला २ आणि २ असे लिहून ती त्याची बेरीज करी. टिमला बेरीज करण्याकरिता फळ्याजवळ बोलवी. जवळ जाऊन तो म्हणे हे २ आणि हे २."

"पण ते २ आणि २ मिळून किती ?"

टिम हसून खांदे उडवून म्हणे, "त्याच्याशी तुम्हाला काय करायचंय ? २ आणि २ तेथे लिहिले आहेत."

मंदबुद्धीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा पहिला धडा ॲलिस मॉरिसन घेत होती. तिला खूपच कष्ट पडले. पण तिने धीर मात्र सोडला नाही. बुद्धिहीन मुलांच्या मर्यादा पतकरल्यावाचून तिला गत्यंतर नव्हते.

वसंत ऋतु होता. शाळेचे आवार उन्हाने न्हाऊन निघाले होते. ॲलिस मॉरिसन मैदानावर फेऱ्या घालीत होती. टिमला वळण लावण्यात आलेल्या अपयशाचे काहूर तिच्या डोक्यात माजले होते. तेवढ्यात प्रो. जॉन्स्टन तेथे आले. तिची व्यथा त्यांनी चटकन ओळखली.

"टिमच्या बाबतीत तुम्हाला नाउमेद होऊन चालणार नाही." ते म्हणाले, "कोणाहीपेक्षा शिक्षणावर माझी अधिक श्रद्धा आहे. लिहिण्या-वाचण्याशिवाय जगात अन्य गोष्टी असू शकतात हेही मी मानतो. टिमच्या बुद्धीची वाढ अपुरी झाली आहे. पण त्याच्याइतका आनंदी आणि उत्साही मुलगा तुम्हाला भेटणार नाही. माझ्या मते आपल्या शाळेचे बोधवाक्य "प्रथम आनंद नंतर सर्वकांही" हे असावे असे मला वाटते. हे फक्त टिमच सर्वार्थाने सिद्ध करूं शकतो."

ॲलिसने मानेनेच कबुली दिली. प्रोफेसरसाहेबांचे म्हणणे सत्य होते हे तिने ओळखले पण तिला नाउमेदी आवरता आली नाही. तिला गोंधळात टाकणारा टिम एकटाच नव्हता. तिचा कोणताहि वर्ग अपेक्षेप्रमाणे प्रगतिपथा-वर नव्हता.

तिला कोणीतरी हाक मारली. वळून पाहाते तों तो टिम होता. तो आपल्या कामगिरीवर चालला होता. हसत तिला अभिवादन करीत, चटकन एक कागदाचा तुकडा खिशांतून काढीत तो म्हणाला, "तुमचं एक पत्र आहे."

त्या कागदाच्या चिठोऱ्यावर काहीतरी खरडले होते. "तूंच कां नाही वाचून दाखवीत हे ?"

"जरूर" तिच्याकडून कागद परत घेत तोंडपाठ केलेली वाक्ये तो बोलू लागला, "मिस् मॉरिसन खूप सुरेख आहे. टिमला ती फारच आवडते. तिच्यासारखी शिक्षिका जगात नाही. ती टिमला कॅटचे स्पेलिंग शिकवते. २ व २ यांची बेरीज पण शिकवते. तिने त्याला खूपच शिकविलें आहे. त्याअर्थी ती त्याला आतां शिक्षण संपल्याचे प्रमाणपत्र देईल."

प्रो. जॉन्स्टन यांच्या म्हणण्याची सत्यता तिला आता पटली. वास्तविक टिममध्ये बदल करण्याचा तिला कांहींच अधिकार नव्हता. टिम ही एक आनंदी व्यक्ती होती. प्रेम व स्वातंत्र्य याची त्याला नितांत गरज होती.

"टिम !" ती वात्सल्याने म्हणाली, "आजपासून तुझे वर्गपाठ संपले. तुझ्या शिक्षणाचा आजचा शेवटचा दिवस."

आनंदाने उडया मारीत तो कामगिरीवर निघून गेला. ॲलिस मॉरिसन आपल्या वाटेने निघून गेली. आज तिला खराखुरा आनंद झाला. "प्रो. जॉन्स्टन यांचे बोधवाक्य मला मान्य आहे. "प्रथम आनंद नंतर सर्वकांही" हेंच खरे."

मंदबुद्धि मुलांना प्रेम आणि संरक्षण ह्यांची अतिशय जरूरी असते. ट्रेनिंग स्कूलची सुरवात करताना रेव्हरंड गॅरिसन यांच्या मनांत ही कल्पना आली.

अशा मुलांमुलींकरिता एक स्वतंत्र खेडे निर्माण करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती. त्यांच्याकरिता स्वतंत्र झोपडया असाव्यात व त्या झोपडयातील पालक आईवडिलांनी अशा मुलांची काळजी घ्यावी हा त्यांचा उद्देश होता. त्याला "कॉटेज प्लॅन" (झोपडी योजना) असे संबोधले जाते. त्याचा उपयोग व्हाइनलॅण्डशिवाय जगात पुष्कळ ठिकाणी केला जातो.

या योजनेमधून जे कौटुम्बिक वातावरण वाढीला लागले ते पाहून ॲलिसला नवल वाटल्यावाचून राहिले नाहीं. एकदां कडाक्याच्या थंडीला एका झोपडीतले आईबाप बळी पडले. जॉनी शाळेतून घरी आला तेव्हा त्याला दुसरेच "बाबा" दिसले.

"बाबा कोठे आहेत ?" जॉनीने विचारले.

तेथे हजर असलेल्या माणसाने बाबा आणि आई आजारी असल्याचे सांगितले. "बरे वाटल्यावर ते परत येतील."

हे ऐकून जॉनीच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. गुडवे टेकून त्याने परमेश्वराची प्रार्थना केली. "देवा आमच्या आईबाबाना लवकर बरें कर ! आम्हाला त्यांची गरज आहे आणि मला तर अधिकच आहे."

शांततेने आणि समजुतीने ॲलिस हळूहळू प्रगति करीत होती. तिच्या वर्गाची सुधारणा तिच्या अपेक्षेपेक्षा अधिक झाली. ज्यांना शक्य होते ती मुले लिहिण्यावाचण्यास शिकली. कांहीनी तर अंकगणिताचेही पाठ घेतले, कांही मुलींनी पाकशास्त्राचे ज्ञान मिळविले, तर कांही घरगुती कामात तरबेज झाल्या. मुलांना शाळेच्या शेतात मदत करण्याची संधी मिळाली. काही प्रौढ मुले चांगलीच कामे करू लागली. त्याबद्दल त्यांना पगारही मिळू लागला. त्या पगारांतून त्यांना आपला राहण्याचा व भोजनाचा खर्च भागविता येत असे.

तथापि सर्वच मुले स्वावलंबी होऊ शकली नाही. कांही तर इतकी परावलंबी होती की त्यांना कपडे घालण्यापासून जेवणापर्यंत सर्व शिकवावे लागे. बारा ते वीस वर्षांमधील कांही मुलांची प्रगति बालोद्यानाच्या पलिकडे गेली नव्हती. काही मुले तोतरी तर कांही बहिरी व कांही दृष्टीने अधु होती.

त्याकाळी मंदबुद्धी मुलांना शिक्षण देण्याच्या थोड्याच शाळा होत्या. व्हाईनलँडमधील ट्रेनिंग स्कूल हे त्यापैकी एक होते. "या मुलांच्या दैनंदीन सहवासात आपण पुष्कळच शिकलो आहोत." ॲलिस मॉरिसन प्रो. जॉन्स्टन

यांना म्हणाली, "या क्षेत्रात अधिक शिक्षक तयार करण्याकरिता आपल्या ज्ञानाचा उपयोग केला पाहिजे."

"त्याच गोष्टीवर मीहि विचार करीत आहे." प्रो. म्हणाले, "उन्हाळ्याच्या सुट्टीत शिक्षकांकरिता वर्ग सुरू करण्याची योजना तुम्ही तयार करा."

१९०४ च्या उन्हाळ्यामध्ये मानसिक विकृती असलेल्या व बुद्धिहीन मुलांना शिक्षण देणाऱ्या शिक्षकांकरिता व्हाईनलॅंड येथे शाळा सुरू करण्यात आली. पहिल्या वर्गात पांच विद्यार्थी होते. फीकरिता व राहण्याकरिता त्यांच्याकडून २५ डॉलर्स घेण्यात आले. शिक्षणक्रम ६ आठवड्यांचा होता. बुद्धिहीन मुलांच्या सर्वसामान्य प्रश्नांपासून तो शिक्षणपद्धति व शिस्त या विषयांचा त्यांत समावेश होता.

ॲलिस मॉरिसनचा जुना मित्र टिम या उन्हाळी वर्गांची आतुरतेने वाट पाही. तेथे येणाऱ्या लोकांना त्याची फार मदत असे. त्यांच्या खोल्या दाखविणे, त्यांना शाळेच्या आवारांत फिरवून आणणे या गोष्टी तो मोठ्या उत्साहाने करीत असे. अशाच तऱ्हेची मदत त्याने मिस् मॉरिसनला ती प्रथम व्हाइनलॅण्डला आली तेव्हा केली होती, उन्हाळी वर्गाचे विद्यार्थी त्याच्याशी प्रेमाने वागत. जे विद्यार्थी अनेक वर्षांनंतर पुन्हा दुसऱ्या खेपेस येत त्यांचे स्वागत टिम त्यांची नांवे लक्षात ठेवून करी व सामान उचलण्याकरिता पुढे धावे, हे पाहून त्यांना फार आश्चर्य वाटे.

एक दिवस प्रो. जॉन्स्टन मैदानांतील झाडाखाली वर्ग घेत होते. झाडाची सावली आल्हाददायक होती. आपल्या विषयात ते तल्लीन झाले होते. बोलता बोलता त्यांचा आवाज चढला आणि ते हातवारे करू लागले. त्याचवेळी टिम इमारतीच्या कोपऱ्यावरून पाहात होता. त्याला वाटले प्रो. जॉन्स्टन शिक्षकांवर रागावले आहेत. तो मोठ्याने ओरडला, "बरोबर आहे, त्यांना असेंच पाहिजे." वर्गात हशा पिकला. प्रो. मोठ्यांदा ओरडले, "टिम ! गाढवा माझ्या व्याख्यानाचा सगळा विचका करून टाकलास काय ?" टिम अगदी ओशाळला. पण प्रोफेसर आपल्याकडे हसून पाहाताहेत हे पाहून तो

पुढे धावला आणि म्हणाला, "माझा उपदेश वाईट नव्हता. माझ्या मनांत तुम्हाला मदत करायची होती."

"माझी खात्री आहे," ॲलिस मॉरिसन त्या विषयावर बोलताना पुढे केव्हातरी म्हणाली, "अपरिपक्व बुद्धीच्या मुलांबद्दल त्या दिवशी त्या शिक्षकांना खूपच समजले असले पाहिजे. एरवी ते ज्ञान त्यांना पुस्तकांतून मिळाले नसते."

अशा तऱ्हेचे वर्ग पुढे पुढे सर्व विद्यापीठात सुरू झाले. तोपर्यंत व्हाईनलॅंड येथेच उन्हाळ्यात वर्ग भरत असत. ॲलिसच्या नेतृत्वाखाली ते २७ वर्षे चालले होते. सर्व जगांतल्या खाजगी आणि सार्वजनिक संस्थांतर्फे स्त्रीपुरुष विद्यार्थी तेथे येत असत. पुढे पुढें त्यांची संख्या जवळ जवळ ९०० च्या वर गेली.

ॲलिसने व्हानलॅण्डमधील सर्व दिवस संपूर्णपणे शाळेकरितांच खर्च केले असे नव्हे. तेथे आल्यावर कांही महिन्यात एका उंच काळ्याभोर केसांच्या तरुणाशी तिची ओळख झाली. त्याचे नांव चार्लस इमर्सन नॅश असे होते. मित्र त्याला टेड असे संबोधित. न्यूयॉर्क राज्यातील ऑलबनीजवळ एका खेड्यात टेडचा जन्म झाला. ट्रेनिंग स्कूलमध्ये संगीत शिक्षणाचा आपला खर्च त्याने गाण्याचे कार्यक्रम करून आणि बॅण्डमध्ये व वृंदवादनात भाग घेऊन भागवला.

रेव्हरंड गॅरिसन यांनी एका पुरुषशिक्षकाकरता जाहिरात दिली होती. त्याच वर्तमानपत्रांत नोकरी पाहिजे अशी टेडची जाहिरात होती. योगायोगाने दोघे एकत्र आले व व्हाईनलॅण्ड संस्थेत संगीत, लष्करी कवायत आणि व्यायाम या विषयांचा शिक्षक म्हणून टेड रुजू झाला.

टेडच्या बरोबर सतत एखादे तरी मूल असे. ॲलिस मॉरिसनला तो एकटा क्वचितच दिसे. नेहमी त्याच्यामागे मुलामुलींची झुंबड उडे. सर्वांना तो समानतेने व ममतेने वागवी, मग ती मुले कितीहि लहान व अशक्त असोत टेड प्रत्येकाला मदत करी.

"मिस्टर नॅश" ती एक दिवस म्हणाली, "जॉन्स्टनशिवाय या संस्थेत तुमच्याइतके लोकप्रिय दुसरं कोणी नसेल असं वाटतं."

"मुलांशी माझं छान जमतं." टेड नॅशने हंसत उत्तर दिले, "पण माझी काळजी घेणारे कोणी तरी माणूस मला मिळावं असं वाटतं."

"पण तुमची तर सगळेच काळजी घेतात." ॲलिस जोराने पण गंभीरतेने म्हणाली.

"सगळीच नाही काही" टेडने उत्तर दिले. "इथे एक खूप मोहक तरुणी आहे. ती माझ्याशी कधीच बोलत नाही. तुमची तिची ओळख असेलच ? ती न्यू हॅम्पशॅयरची आहे. मला वाटतं तिचं नांव मॉरिसन असावं."

ॲलिसला हंसू आवरेना. "मी तुमच्याशी बोलत नाही, हे खरं नाही" ती म्हणाली, "आता नाही का बोलत तुमच्याशी ?"

"बोलता खरं" टेड दुखावल्यासारखे म्हणाला, "पण ते बोलणे शिक्षणाबद्दल, संस्थेबद्दल किंवा उन्हाळी वर्गाबद्दल असतं. तुम्ही, मी, आपण या विषयावर कधीच बोलत नाही."

ॲलिस लाजेने चूर झाली. चाचरत म्हणाली, "हो बोलूया की आपण."

टेडला आनंद झाला. "मग रविवारी दुपारी ? मला एक सुंदर जागा माहीत आहे."

लवकरच या तरुण शिक्षक-शिक्षिकेची गट्टी जमली. दर रविवारी दुपारी आपला वेळ एकमेकांच्या सहवासांत ती घालवीत. कालांतराने त्यांनी आपल्या विवाहाचा बेत जाहीर केला. तेव्हा लोकांना त्याचे फारसे आश्चर्य वाटले नाही. २७ जानेवारी १९०९ ला प्रो. जॉन्स्टनच्या दिवाणखान्यात तीं दोघे विवाहबद्ध झाली. समारंभानंतर प्रोफेसरसाहेब म्हणाले, "व्हाइनलॅण्ड-मध्ये कायमचे वास्तव्य करून सुखी रहा."

ॲलिस आणि टेड नॅश यांनाही अन्य ठिकाणी स्थाइक होण्याची इच्छा नव्हती. टेड नॅश त्या शाळेत जितके आदरास पात्र होते तितकेच लोकप्रिय

होते. प्रो. जॉन्स्टनच्या पश्चात १९५३ साली मृत्यू येईपर्यंत ते शाळेचे मुख्याध्यापक होते.

ॲलिस नॅशला १९२५ मध्ये संस्थेची संचालिका नेमण्यात आले. बुलेटिन या पत्रिकेची ती संपादिका होती. मानसिक अपरिपक्वतेच्या क्षेत्रांत काम करणाऱ्या एकोणतीस देशांच्या तज्ञांकडे ती पत्रिका रवाना होत असे. १९५२ मध्ये मिसेस नॅशला ट्रेनिंग स्कूलच्या शैक्षणिक सल्लागाराची जागा देण्यात आली.

पन्नास वर्षांहून अधिक काळ ट्रेड व ॲलिस नॅश या जोडप्याने व्हाईनलँड येथे घालविला. या अवधीत ह्या विशिष्ट शिक्षणक्षेत्राच्या इतिहासांतील कांहीं महत्त्वाचे टप्पे त्यांनी पाहिले. शास्त्रीय व वैद्यकीय माहितीच्या आधारे मंदबुद्धीच्या मुलांकरिता एक अभ्यासकेंद्र उघडावे असा रेव्हरंड गॅरिसन यांचा उद्देश होता. आपले स्वप्न साकार झालेले पाहण्याचे भाग्य त्यांना लाभले नाही पण प्रो. जॉन्स्टन यांनी मात्र १९०६ साली असे संशोधनकेंद्र सुरू केले. मानसिक रोगाचे तज्ञ डॉ. गोडार्ड हे त्या केंद्राचे संचालक होते.

बुद्धीची कार्यक्षमता अजमावण्याचे साधन—बिने सायमन चांचणी—(Binet–Simon Test) डॉ. गोडार्डनी युरोपांतून आणले. हे जगातील पहिले बुद्धिमापक साधन होते. त्याच्या साहाय्याने गोडार्ड मंदबुद्धीच्या मुलांचा दर्जा ठरवीत. त्यांच्याच अनुभवावरून पहिल्या महायुद्धांत शिपायांची बौद्धिक कार्यक्षमता अजमावण्यात आली. बौद्धिक कार्यक्षमतेवर संघटित केलेले हे अमेरिकेतील पहिलेच लष्करी दल होय. हीच पद्धत नंतर शिक्षण आणि उद्योग ह्या क्षेत्रांत वापरण्यात येऊ लागली.

शास्त्रज्ञांनी बुद्धिमांद्यस्वरुपासंबंधी महत्त्वाचे संशोधन केले आहे. तथापि त्याची कारणे आणि उपाय अजून अज्ञातच आहेत. आनुवंशिकता हे एक प्रमुख कारण समजले जात असे. परंतु आता त्याला तितके महत्त्व दिले जात नाही. अनेक बाबतीत ते संसर्गजन्य रोगांतून उद्‌भवलेले असते. कधी कधी जन्माच्या वेळेला होणारी जखम व गर्भावस्थेत झालेली दुखापत हीही त्याची कारणे असतात असे दिसते. आधुनिक संशोधनातून पुष्कळदा असे

दिसून आले आहे की गोवर, गालगुंड ह्यांसारखे जंतुजन्य रोग आईला गरोदर अवस्थेत झाले तर त्याचाहि परिणाम बुद्धीच्या विकासावर प्रतिकूल होतो.

प्रगती फारशी झालेली नसली तरी संशोधन चालूच आहे. "अशा मुलांमध्ये सुधारणा घडवून ती इतरांसारखी व्हावीत यासाठी तज्ज्ञ कांही तरी उपाय काढतील अशी आम्हाला आशा आहे." टेड नॅश एकदा म्हणाला, "ती आशा आम्ही अजूनही सोडली नाही आणि आमच्या प्रयोगशाळेचे कार्य थांबलेले नाही."

ज्या मुलांची बौद्धिक वाढ खुंटली आहे अशाच्या दैनंदिन प्रश्नाशी निगडीत होऊन ट्रेनिंग स्कूलने आपले कार्य चालू ठेवले आहे. सुधारलेल्या पद्धती, प्रयोगसिद्ध शिक्षणतंत्र यांची खूप प्रगती झाली असली तरी प्रो. जॉन्स्टन तसेंच ॲलिस आणि टेड नॅश यांनी शोधून काढलेले तंत्र–प्रेम हेच–अजूनहि सर्वश्रेष्ठ आहे.

"या तंत्राचा उपयोग कितीतरी फलदायी झाला आहे." ॲलिस म्हणते, "कितीतरी तरुण मुले बरी होऊन आपल्या घरी गेली. आणि कदाचित् खरे वाटणार नाही, पण सुमारे १०० मुले परीक्षेत उत्तीर्ण होऊन दुसऱ्या महायुद्धात नोकरीवर हजर झाली. त्यांपैकी एक तर आरमारांत खलाशी झाला."

अर्थात सर्वच मुलांची एवढी आश्चर्यजनक प्रगती झाली नाही. अनेक मुले अजून त्या काळवंडलेल्या वातावरणात इतरांपासून वेगळी अशी राहाताहेत. परंतु ॲलिस मॉरिसन, नॅश वगैरे शिक्षक-शिक्षिकांच्या अविरत प्रयत्नाने अशा मुलांच्या जीवनातला काळोख पुष्कळच कमी झाला आहे. त्यांत प्रकाश दिसूं लागला आहे. उत्साही व आनंदी वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या विश्वात "प्रथम आनंद नंतर सर्वकांही" हे बोधवाक्य सर्वार्थाने सार्थ झालें आहे.

## ७ : एला फ्लॅग यंग

१९१० सालात एला फ्लॅग यंग ही बहुधा अमेरिकेतील सर्वात अधिक प्रसिद्ध शिक्षिका असावी. शिकागो शहरांतील सुपरिंटेंडंट ऑफ स्कूल्स म्हणून नेमली गेलेली ती पहिली स्त्री होती. इतकेच नव्हे तर अमेरिकेच्या नॅशनल एज्युकेशन असोसिएशनची अध्यक्ष निवडून आलेली ती पहिली स्त्री होती. नॅशनल एज्युकेशन असोसिएशन ही अमेरिकेतल्या शिक्षकांची सर्वांत मोठी संघटना आहे. आश्चर्य म्हणजे एला यंगचे हायस्कूलचे शिक्षणही पुरे झालेलें नव्हते. वयाच्या १० व्या वर्षापर्यंत तिला लिहिता सुद्धा येत नव्हते.

न्यूयॉर्क संस्थानांतील बफेलो या गांवी १८४५ मध्ये एलाचा जन्म झाला. जन्मताच ती अशक्त होती. शालये जीवन तिला सहन होणार नव्हते. म्हणून तिचे नाव शाळेत दाखल करण्यात आले नाही. "एवढ्या नाजूक मुलीला हे कष्ट सहन होणार नाहीत." मिसेस फ्लॅग म्हणत असे.

या कारणास्तव एलाचे शिक्षण नेहेमीची चाकोरी सोडून झाले. भरपूर मोकळी हवा आणि सूर्यप्रकाश याची तिला आवश्यकता होती. बागेतील कामात आईबाप तिला गुंतवून ठेवीत. फुलांच्या व भाज्यांच्या वाफ्यात ती काम करी. रिकामपणी वडिलांचे लोहारकाम पहात बसे. तिचे वडील एक कुशल कारागीर होते. लवकरच ती सर्व कला तिने अवगत करून घेतली. सर्व तऱ्हेच्या हत्यारांची माहिती तिला आपोआपच मिळाली. आयुष्याच्या उत्तरार्धात ती वारंवार म्हणे, "हातकामाच्या महत्त्वासंबंधीचे विचार प्रसृत होण्यापूर्वीच-विशेषतः मुलींच्या बाबतीत–मी हाताने कामे करायला शिकले होते."

तिच्या आईवडिलांची ग्रंथसंपत्ति मोठी होती. वडील भावंडे शाळेतून पुस्तके नेहेमी घरी आणीत. पण एलाचे लक्ष मात्र वयाच्या नवव्या वर्षापर्यंत

लिहिण्यावाचण्याकडे व शिक्षणाकडे फारसे नव्हते. गावातील शाळेला लाग-लेली आगीची बातमी एक दिवस सकाळी वर्तमानपत्रांत ठळकपणे छापली होती.

"हे बघ !" एलाची आई म्हणाली, "शाळेतील मुलें आगीत होरपळून मेली. आणि कांही तर आगीतून वाचण्याकरिता खिडक्यातून उड्या मारताना मेली. ती तुझ्या वयाचींच होती."

एलाच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. ती सर्व बातमी तिने आईकडून पुन्हा पुन्हा वाचून घेतली. तिला रडू आवरेना. ते वर्तमानपत्र घेऊन ती तडक आपल्या खोलीत गेली. त्यांतला शब्दन् शब्द तिने वाचला. दुपारी ती आगीची बातमी विसरली पण अक्षरे वाचता अ ली या आनंदात खोलीच्या बाहेर आली.

"आई ! आई !" तिचा आनंद ओसंडत होता. "मला वाचता येतं, मला वाचता येतं !"

त्यानंतर तिला आवरणे कठिण झाले. तिने सर्व बायबल वाचून काढले. वडिलांच्या ग्रंथालयातील इतिहास व तत्त्वज्ञान या पुस्तकांची तर तिने पारायणे केली. फुलांच्या व फळभाज्यांच्या वाफ्याकडे तिचे साहाजिकच दुर्लक्ष झाले. आतापर्यंत त्यांची जोपासना ती काळजीपूर्वक करीत असे. आता बागेचे काम करायला तिने आपल्या भावाचे मन वळवले.

तिचा भाऊ चार्लस् बागेत काम करीत होता. वेताच्या खुर्चीत एला बसली होती. हातात पुस्तक घेऊन ती भावाला म्हणाली, "तूं पेरणी भांग-लणीचे काम चालू ठेव. मोठ्याने वाचून मी तुझे मनोरंजन करतें."

हळू हळू एलाची प्रकृती सुधारत होती. आता तिला १० वे वर्ष लागले होते. तिच्या आईने सरकारी शाळेत तिचे नाव घालण्याचे ठरविले. वडिलांचे जवळ तिने गणिताचे धडे घेतले होते. त्यांच्या इतिहास व भूगोलाच्या पुस्तकांचे तिचे वाचन मोठ्या प्रमाणावर झालेले होते.

"खरोखर नवी अशी एकच गोष्ट मला तिथे शिकायला मिळेल." ती म्हणाली, "आणि ती म्हणजे शुद्धलेखन."

ही नवीन विद्यार्थिनी वळणदार अक्षर काढायला शिकली. इतकेच नव्हे तर अन्य गोष्टीहि तिने आतमसात केल्या. त्यांचा उपयोग तिला पुढील आयुष्यात झाला. तिचा भाऊ चार्ल्स् एक दिवस शाळेत फार वाढाळपणाने वागला. त्याबद्दल शिक्षकांनी त्याला सर्व मुलांच्या समोर चांगला चोप देण्याचे ठरविले. एलाला ते दृश्य पाहवले नाही. मान खाली घालून ती जोर-जाराने रडू लागली. चार्ल्स्ने धावत जाऊन तिच्या गळ्यास मिठी मारली च तो तिच्या कानात कुजवुजला, "एला रडू नकोस. मी एकीवर एक तीन विजारी घातल्या आहेत."

हा प्रसंग आठवून ती नंतर जरी हसत असे तरी त्याचे गांभीर्य मात्र ती कधीच विसरली नाही. मुलांना शारीरिक शिक्षा करण्याच्या ती संपूर्ण विरुद्ध होती.

एला तेरा वर्षांची झाली तेव्हा त्यांचे कुटुंब शिकागो येथे राहाण्यास गेले. आठवीपर्यंत तिचे शिक्षण झाले होते आणि ती हायस्कुलात जाण्याच्या बेतात होती. शिकागोमधल्या नियमाप्रमाणे हायस्कूलला जाण्यापूर्वी तिला खालच्या शाळेतच आणखी एक वर्ष काढावे लागणार होते.

"हायस्कूल प्रवेशाची तिची सर्व तयारी झाली आहे." मिसेस फ्लॅगनी जोरदार तक्रार केली.

"माझा नाइलाज आहे" प्रिन्सिपॉलनी उत्तर दिले. "मला नियम मोडता येत नाही."

एलाचे नांव वॉरन अॅव्हेन्यू आणि वुड स्ट्रीट ह्यांच्या कोपऱ्यावरील ब्राऊन स्कूलमध्ये घालण्यात आले. तिला पहिल्या दिवसापासूनच शाळेत कंटाळा येऊं लागला. इतिहास, भूगोल, अंकगणित, वाचन या विषयात ती वर्गाच्या पुढे होती.

"मला कधी कधी असे वाटते" शिक्षक निराशेने म्हणत, "एला! तुझे दिवस आमच्या येथे वाया जात आहेत."

"मलाही तसेच वाटते" एला म्हणाली.

दुपारी घरी आल्यावर दप्तर आपटून ती आईवडिलांना म्हणाली, "मी शाळेंत जाणार नाहीं. शाळेत शिकवितात ते माझे आधीच झाले आहे."

ती दोन वर्षे घरीच राहिली. स्वताच अभ्यास करू लागली. मित्राच्या सल्ल्यावरून शिकागो येथील शाळेची शिक्षक-सनद तिने मिळवली. एका शाळेत नोकरीकरिता तिने अर्ज केला. अर्ज वाचून पहाताना मुख्याध्यापकांना आढळून आले की एलाचे वय फक्त १५ वर्षांचे होते.

"मिस फ्लॅग !" मुख्याध्यापक म्हणाले, "तुम्ही परीक्षेत चांगले यश संपादन केले आहे हे मी नाकारू शकत नाही. सर्व बाजूंनी विचार करता तुम्ही योग्य आहात. पण तुमचे वय ! वयाच्या पंधराव्या वर्षी मुली शाळेत शिकत असतात, शिकवीत नसतात."

एलाला हासू आवरेना. पण ती स्तब्ध राहिली. मुख्याध्यापक गोंधळले व सर्व गोष्टींचा त्यांनी पुन्हा विचार केला. "आमच्या नॉर्मल स्कूलमध्ये तुम्ही विद्यार्थिनी म्हणून राहाल का ? तुमचे वय झाले की तुम्हाला आम्ही शिक्षिका नेमू." मुख्याध्यापकांनी आपले म्हणणे तिच्यापुढे मांडले. त्यांचे म्हणणे तिला पटले. विद्यार्थी या नात्याने तिला आणखी एक मोलाचा अनुभव मिळाला. पदार्थविज्ञानशास्त्रांतील पाण्याच्या दाबाचे यंत्र हा भाग शिकविला जात होता. ते यंत्र कसे काम करते हे पाहाण्याऐवजी त्याच्या सुटचा भागाची नांवेच ती घोकते आहे ही गोष्ट वडिलांनी ओळखली. ते तिच्या अभ्यासाकडे आस्थापूर्वक पाहात असत.

"तिची बुद्धि तीक्ष्ण आहे. पण या शिक्षणपद्धतीत ती कितपत टिकू शकेल याची मला शंका आहे." त्यांनी तिच्या आईकडे तक्रार केली.

वडिलांचे म्हणणे बरोबर असल्याचे एलाच्या ध्यानात आले. पुस्तकांतील टीपा वाचून यंत्राची कार्यपद्धति तिने पूर्णपणे अवगत करून घेतली. अर्थात त्याकरिता तिला नेहमीपेक्षा अधिक वेळ खर्च करावा लागला.

दुसऱ्या दिवशी प्रश्नपत्रिकेत त्याच यंत्राची आकृती दिली होती. पण त्याचा एक महत्त्वाचा भाग वगळला होता. यंत्राची कार्यपद्धति एलाला

अत्रगत असल्याने तिनेच फक्त आकृतीतील चूक ओळखली आणि अर्थातच तीच एकटी पास झाली.

"त्या क्षणी मी असे ठरविले," ती म्हणाली, "की कोणाही विद्यार्थ्याला विषयाचे ज्ञान झाल्याशिवाय मी घोकंपट्टी करू देणार नाही. माझ्या वडिलांचे म्हणणे बरोबर होते. चांगल्या बुद्धीचा मुलगा सुद्धा ह्या पद्धतीने अभ्यास करू लागला तर लवकरच त्याची बुद्धि निकामी होईल."

शाळेंतील तिचे दुसरे वर्ष संपत आले तेव्हा तिने पतकरलेला मार्ग बरोबर का चूक अशी तिच्या आईच्या मनात शंका निर्माण झाली. "लहान मुलांच्या संगतीत तूं कधीच नव्हतीस." आई म्हणाली, "मग तुला मुले आवडतील हे कशावरून ? शिवाय तूं स्वताच्या चुकीच्या बाबतीत फार कठोर असतेस तसंच लहान मुलांशी कठोरतेने वागशील."

"तुझे म्हणणे बरोबर आहे असे मला वाटत नाही." एलाने आईला उत्तर दिले. "पण खात्री करून घ्यायचा एकच मार्ग आहे."

दुसऱ्या दिवशी तिने बालवर्गात जाऊन बसण्याची परवानगी मिळविली. मागच्या बाकावर बसून ती शांतपणे निरीक्षण करूं लागली. पाठीवर शेपटे सोडलेल्या, सैल ब्लाऊज घातलेल्या मुली आणि केस विंचरलेली, सैल चड्डया घातलेली मुले ओळीने वर्गात आली. त्यांना बोबड्या शब्दांत पाढे पाठ म्हणतांना तिने ऐकले. मधल्या सुट्टीत तिने त्यांच्याशी दोस्ती केली. आणि त्यांच्या खेळांत ती सामील झाली.

त्याच दिवशी दुपारी आपली चूक होत नसल्याची तिला खात्री पटली. शिक्षिका हाच आपला पेशा याचा तिला प्रत्यय आला.

"मुलं किती मजेदार असतात ! त्यांच्या सहवासात मी रमून जाते." तिने आईला सांगितले. "कधी मला माझा स्वताचा वर्ग मिळेल असं वाटतंय."

एला फ्लॅगला फॉस्टर स्कूलमध्ये नोकरी लागली. आठ महिन्यांनंतर ब्राऊन स्कूलमध्ये तिला प्रमुख साहाय्यक नेमण्यात आले. पांच वर्षांपूर्वी याच

शाळेत तिला अगदी कंटाळा आला होता. दुर्दैवाने नोकरीच्या पहिल्या कांही वर्षांतच तिला फार दुःखे सहन करावी लागली. तो नोकरीला लागल्यानंतर दोन आठवड्यांत तिची आई वारली. नंतर थोड्याच दिवसांत भाऊ चार्लस् रेल्वे अपघातात मरण पावला. विल्यम यंग नावाचा एक तरुण त्यांच्या कुटुंबाचा अनेक वर्षे मित्र होता. त्याच्याशी ती १९६८ मध्ये विवाहबद्ध झाली. आता तिच्या दुःखाने परिसीमा गाठली. थोड्याच महिन्यात तिच्या-पतीने आपली जीवनयात्रा अकाली संपविली. त्या दुःखाचा पूर ओसरण्याच्या आंतच तिचे वडील व बहीण न्युमोनियाला बळी पडले.

शोकसागर तिला बुडवू पहात होता. पण ती धैर्याने तरली. एला यंगने आपला शिक्षिकेचा पेशा पुढे चालू ठेवला. "माझे सर्व कुटुंब नष्ट झाले आहे. मला प्रेमाचे माणूस उरले नाही." ती म्हणाली, "आजपासून शिकागोतील लहान मुले हेच माझं कुटुंब."

साध्या पोषाखातील भेदक नजरेची एला यंग अनेक बालकांची आई झाली. पण ती नुसतीच लाड करणारी आई नव्हती. प्रसंगी वडिलांचा कठोरपणाही ती धारण करी. गैरवाजवी गोष्ट ती सहन करणार नाही याची मुलांना ताबडतोब प्रचीती आली.

स्किनर स्कूलमध्ये ती मुख्याध्यापिका होती. एक दिवस शाळेच्या अंगणात मुलांची धक्काबुक्की चाललेली तिने पाहिली. अंगावरील काळी-पांढरी शाल एका शिक्षिकेच्या अंगावर टाकून ती म्हणाली, "ही अंगावर घेऊन दरवाजात जा. त्याचा काय परिणाम होतो तें पाहा." युद्धातील पांढऱ्या निशाणाप्रमाणे त्या शालीने आपले काम केले. झोंबाझोंबी एकदम थांबली. परत सुट्टीत असा प्रकार घडला नाही.

विद्यार्थी आणि हाताखालील शिक्षिका यांच्याशी ती अनेक वेळां कठोरतेने वागे. पण त्यांचे हित मात्र सदैव तिच्या अंतःकरणात घर करून असे. ती जिल्हा शिक्षणाधिकारी असतांना तिला एक शिक्षिका आजारी दिसली. ही गोष्ट तिच्या लक्षांत आल्याबरोबर तिने एक टॉनिकची बाटली व त्याबरोबर एक चिठ्ठी तिच्याकडे पाठविली. "हे टॉनिक घेऊन पाहा. काल तुझी प्रकृती खूपच खराब दिसली. तुझ्या चेहऱ्यावर फिकटपणा आहे."

एकदा एका आजारी मुख्याध्यापिकेला भेटावयास ती दवाखान्यात गेली. "इथून बाहेर पडल्यावर तुम्ही काय करावयाचे ठरविले आहे ?" तिने विचारले.

"त्याचा मी अजून विचारच केला नाहीं." त्या आजारी बाई म्हणाल्या, "पूर्ण बरं वाटून कामावर जाईतोपर्यंत घराभोवती थोडे थोडे फिरण्याची सवय ठेवावी असे मला वाटते."

"त्यापेक्षा मी तुमची राहाण्याची सोय फ्लोरिडा येथे माझ्या नातेवाईका-कडे करणार आहे. विश्रांती आणि तेथील मोकळी हवा ह्यांनी तुम्हाला लवकर बरे वाटेल. मग तुम्ही शिकागोच्या थंडीला तोंड देऊ शकाल."

लवकरच त्या मुख्याध्यापक स्त्रीला एक फ्लोरिडाचे तिकीट मिळाले. त्या तिकीटाबरोबर संपूर्ण बरे वाटल्याशिवाय न परतण्याची कडक सूचना होती. दुसऱ्या एका प्रसंगी तिच्या दोघी शिक्षिकांची बहीण अतिशय आजारी होती. एलाने एक नर्स तिच्या शुश्रुशेकरिता ठेवली व तिचा पगार स्वतःच्या पगारांतून दिला.

शिकागो शहरातील तिचे कार्य सर्वतोमुखी झाले. शिकागो विद्यापीठाच्या प्रमुखांचे तिच्याकडे लक्ष गेले.

"तुम्ही आमच्या शिक्षणविभागात प्रोफेसर व्हावं अशी माझी इच्छा आहे." ते म्हणाले.

"ती एक हास्यास्पद घटना ठरेल," एला यंग म्हणाली. "मी नॉर्मल स्कूलमध्ये फक्त दोनच वर्षे शिक्षण घेतले आहे. विद्यापीठाच्या पदवीशिवाय मी प्रोफेसर कशी होणार ?"

"मला तुम्ही हव्या आहां, पदवी नको." अध्यक्ष हार्पर यांनी उत्तर दिले. तथापी एला त्यांच्या म्हणण्याला संमती देईना. पण हार्पर तितकेच निश्चयी होते. तिच्या अडचणीवर त्यांनी तोडगा शोधून काढला.

"तुम्हाला शैक्षणिक विषयावर साहाय्यक प्रोफेसर–लेक्चरर–नेमूं. तुम्ही पदेवाईक म्हणून हे काम करा." ते म्हणाले. "प्रोफेसरची जागा तुमच्या-

करिता रिकामी ठेवण्यात येईल. तुम्हाला जेव्हा आपण त्या जागेला योग्य आहों असे वाटेल तेव्हा तुम्ही ती पत्करा." विल्यम हार्परच्या मदतीने ती विद्यापीठांत दाखल झाली. अध्यापिका आणि विद्यार्थिनी म्हणून.

विद्यापीठाच्या पदवीदान सभारंभाच्या वेळी तिला पदवीही मिळाली. "आता तुम्हाला विद्यापीठाची पदवी प्राप्त झाली आहे." अध्यक्ष तिला म्हणाले. "माझी सूचना आता तुम्हाला मान्य करायला हरकत नाही. तुम्ही या ठिकाणी प्रोफेसर होऊ शकता."

"जरूर होईन" एला आनंदाने म्हणाली.

शिकागोमधील शाळाखात्याचा क्रम सबंध देशात दुसरा लागतो. १९०९ मध्ये एला फ्लॅग यंग शिकागोमधल्या शाळांची सुपरिंटेंडंट ऑफ स्कूल्स झाली. ही जागा तिला कशी मिळाली याबद्दल अनेक हकीगती आहेत. एक अशी की जून महिन्यामध्ये उकाडयात शिक्षणसमितीपुढे उमेदवारांची मुलाखत चालू होती. सभासद आधीच दमलेभागलेले. घरी परतण्याची त्यांना घाई लागली होती. एकामागून एक उमेदवारांच्या मुलाखती कशातरी उरकल्या जात होत्या. शेवटी मुलाखत एलाची झाली. समितीचे सभासद पेंगत होते. एलाने बोलावयास सुरवात केली. एकेकाची झोप पार उडाली. अखेर त्यांना हवे ते माणूस मिळाले. मात्र ती बाई होती.

यांतील कांही भाग निःसंशय खरा आहे. पण परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होती. राजकीय मतांच्या बुजबुजाटांनी शिकागो शहर भरून गेले होते. शिक्षणसमितीवर निरनिराळ्या पक्षांचे लोक होते. प्रत्येक पक्ष आपला उमेदवार पुढें आणण्याची खटपट करीत होता. बहुमत कोणताच पक्ष मिळवू शकला नाही. नाइलाजाने त्यांना तडजोड करावी लागली व ज्या उमेदवाराचे लक्ष राजकारणात नसून शिक्षणात आहे असाच उमेदवार निवडला गेला. एला यंगला तात्पुरते एका वर्षासाठी नेमण्याचे ठरले. तोपर्यंत दुसरा माणूस शोधण्याचा त्यांचा विचार होता.

मिसेस यंग हे सर्व जाणून होती. तरी तिने जाणूनबुजून तिकडे दुर्लक्ष केले. "माझे ध्येय शिकागो येथील मुलांचे कल्याण साधणे हेच आहे." ती आपले विचार बोलून दाखवी.

शिकागोची शिक्षणपद्धती देशात सर्वोत्कृष्ट ठरावी अशी तिची मनीषा होती. "प्रत्येक शाळेत एकएक बालोद्यान असलेच पाहिजे." तिने शिक्षण-समितीला सांगितले. वर्गासाठी जादा खोल्या, अधिक साधनसामुग्री आणि खास प्रशिक्षित शिक्षक यांची जरूरी होती. एलाची मुदत संपण्यापूर्वी शिकागोमधील प्रत्येक प्राथमिक शाळेत बालोद्यानाची सोय झाली होती.

विद्यार्थ्यांकरिता हस्तव्यवसाय व मुलींकरिता गृहशिक्षण यांची आवश्यकता होती. याशिवाय शहरांतल्या हायस्कुलांत व्यापार विषयाच्या शिक्षणाचा समावेश केला जावा असेही मिसेस यंगचे मत होते.

"शाळेतील शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सर्वच विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता येणार नाही." ती म्हणाली. "लघुलिपी लेखन आणि हिशेब ठेवणे या गोष्टी शिकविण्याची सोय आपण केली पाहिजे. त्यामुळे त्यांना चांगलें उपजीविकेचे साधन उपलब्ध होईल."

शिकागोच्या शाळेतील मुलांच्या आरोग्याकडेही तिने लक्ष दिले. जी मुले वारंवार आजारी पडत किंवा ज्यांना कायमचा रोग असे त्यांच्याबद्दल ती विशेष दक्षता घेई. "मुलांना मोकळी हवा व सूर्यप्रकाश यांची जरूरी लिहिण्यावाचण्याइतकीच आहे." ती म्हणे.

तिच्या सूचनेवरून शिकागो शहरांतील शाळांमध्ये लहान मुलांकरिता मोकळ्या हवेतील वर्ग सुरू झाले. त्याचा फायदा अशक्त मुलांना मिळाला. अशा वर्गांना भेटी देतांना एलाच्या नजरेत आपले लहानपण व कृश शरीर उभे राही.

"बागकामात मलांचे मन रमूं द्यावे. त्यांना मोकळी हवा मिळेल आणि मनोरंजनही होईल." एका मित्राशी बोलत असता ती म्हणाली, "पण स्पष्टच बोलायचं झालं तर खोरी कुदळी किंवा बागेतील चिखल मला परत पाहायला मिळाला नाही तरी चालेल. मी स्वताच त्या गोष्टी लहानपणी खूप पाहिल्या आहेत."

शिकागो शहराबद्दल तिला विशेष आकर्षण वाटे. त्या शहरात ती नव्यानेच राहावयास आली होती. प्राथमिक शाळेंतील मुलांकरिता "शिकागो"

हा स्वतंत्र विषय तिने सुरू केला. शहराचा इतिहास व भूगोल यांचा त्यांत समावेश असे. प्रसिद्ध वॉटरटॉवर व पशुसंग्रहालय पाहायला लिंकनपार्क येथे मुलांच्या सहली जात. हा वॉटर टॉवर १८७१ सालच्या मोठ्या आगीतून वांचला होता.

विद्यार्थ्यांच्या बरोबरीने शिक्षकांवरही तिचे लक्ष असे. शिकागो शहरांत ६००० शिक्षक होते. ती प्रत्येकाला आवर्जन भेटीचे आमंत्रण देई. आमंत्रणाचा स्वीकार करणाऱ्यांचा ती कधीही अव्हेर करीत नसे. कधी कधी शाळा-प्रमुखांना ती गटागटाने आपल्या घरी चहाला बोलवी. शिक्षकांच्या व शिक्षणाच्या प्रश्नांवर ती चर्चा करी.

तिच्या प्रेमाचा स्वीकार शिक्षक कृतज्ञतेने करीत. वर्षाच्या सुरवातीला होणाऱ्या तिच्या व्याख्यानाला बहुतेक सर्वजण हजर राहात. एक स्त्री म्हणाली, "तिच्यापासून मिळालेली स्फूर्ति अपूर्व आहे. माझ्या दीर्घ मुदतीच्या नोकरीत अशी सुपरिंटेंडेंट मी पाहिलेली नाही."

"तिच्या विनोदाचा लाभ व्हावा म्हणून आपण तिच्याकडे जातो" असे दुसरी एक शिक्षिका म्हणाली.

"मिसेस यंगच्या विनोदी स्वभावामुळे तिचे भाषण ऐकण्यास आम्ही उत्सुक असल्याने सभागृहात जागा पकडण्याची आम्ही घाई करीत असूं" आणखी एक शिक्षिका म्हणाली.

शिकागोच्या शिक्षकांना तिचा आधार वाटे. एला यंग नेहमी त्यांची बाजू घेई. शाळेच्या व्यवस्थेत शिक्षकांचा भाग असावा असे तिचे मत होते. त्या-करिता ती झगडत राहिली. तिच्या सूचनांची अम्मलबजावणी करण्यापूर्वी शिक्षकांनी विचार करावा आणि त्यांना आपली संमति द्यावी असा आग्रह ती धरी. "दुसऱ्यांच्या हत्यारांनी कोणालाच काम करता येत नाही." असे ती नेहमी सांगे.

पण तिने जेव्हा शिक्षकांचा पगार वाढविण्याबद्दलची सूचना मांडली तेव्हा शिक्षणसमितीने नकार दिला.

"त्यांना पुष्कळ पगार मिळतो" एक सभासद गुरगुरला, "एक छदाम जास्त मिळणार नाही."

अन्य सभासदांनी आपला होकार भरला. एलाने ताबडतोब तिथल्या तिथे नोकरीचा राजीनामा दिला.

"ज्या शिक्षणसंस्थेचे धोरण मला पटत नाही तिथे मी काम करणार नाही." तिने सांगितले.

तिच्या राजीनाम्याची बातमी दुसऱ्या दिवशी सकाळी वर्तमानपत्रांत आली. शिकागोच्या नागरिकांत संतापाची तीव्र लाट उसळली. शिक्षण समिती-च्या निषेधार्थ नागरिकांनी मोठी सभा भरविली. गर्दी आतोनात होती. एका वर्तमानपत्राने म्हटले, "शिकागो शहराच्या इतिहासात एवढी सभा कधीच भरली नव्हती. मिसेस एला फ्लॅग यंगला जेव्हढा पाठिंबा मिळाला तेव्हढा शिकागोने यापूर्वी कोणालाही दिला नाही."

सभा संपते आहे तोच शिक्षणसमितीने एलाला आपला राजीनामा परत घेण्याची विनंती केली. एला परत कामावर हजर झाली. पण भांडण मात्र संपले नाही. शिक्षकांची पगारवाढ न करण्याबद्दल समिती हट्टाला पोचली होती. दुसऱ्यांदा राजीनामा देऊन एला बाहेर पडली. शहरांतील आबाल-वृद्ध स्त्री-पुरुष जनता पुन्हा तिच्या पाठीशी उभी राहिली. अखेरीस समितीने पगारवाढ जाहीर केली. पुन्हा एकदा एला यंग शिकागोची सुपरिंटेंडंट ऑफ स्कूल्स झाली. १९१५ सालपर्यंत—वयाच्या ७२ व्या वर्षापर्यंत—तिने काम केले.

एला यंगचे एक बोधवाक्य प्रसिद्ध आहे. "मी **एकटी** आहे पण मी **कोणीतरी** आहे. मी **सर्व कांही** करू शकत नसले तरी **कांहीतरी** करू शकेनच. जे मला **करता येणे शक्य** आहे ते मला **केलेच पाहिजे** आणि जे मला **केलेच पाहिजे** ते परमेश्वराच्या कृपेने **मी करीन.**"

मिसेस यंगचे आयुष्य वरील बोधवाक्याचे मूर्तिमंत प्रतीक होते. शैक्षणिक क्षेत्रांतील दीर्घ कारकीर्दीत तिला मित्रहि चांगले लाभले. जेन ॲडम्सची ती मैत्रीण होती आणि स्त्रियांना निवडणुकीत मतदानाचा अधिकार असावा या चळवळीला तिचा पाठिंबा होता. १९१० मध्ये ती नॅशनल एज्युकेशन

ॲसोसिएशनची पहिली स्त्री अध्यक्ष झाली. त्यावेळीही ती स्त्रियांच्या समान हक्काच्या झगडयात अग्रभागी होतीच.

शिक्षक–व्यवसायात शिक्षकांमध्ये त्याकाळी स्त्रियांचे पुरुषांशी प्रमाण १० : १ होते. पण शिक्षक संघटनेत अधिकाराच्या जागी पुरुषच असत. कॉलेजचे प्रिन्सिपॉल आणि शाळांचे मुख्याध्यापक प्रामुख्याने पुरुषच असत. वर्गशिक्षिकांच्या एका गटाने शिक्षक संघटनेच्या कारभारात अधिक भाग मिळवण्याचा निश्चय केला. न्यूयॉर्क संस्थानांतल्या ऑग्डेन्सुवर्ग येथे भरलेल्या वार्षिक सभेत त्यांनी नियुक्तांची यादी बाजूला सारली. आणि आपल्या उमेदवाराचा प्रचार केला. तो उमेदवार म्हणजे एला फ्लॅग यंग. मते मोजली तेव्हा मिसेस एला यंग दोन तृतियांश मतांनी नॅशनल एज्युकेशन असोसिएशनची अध्यक्ष निवडून आली.

पहिले महायुद्ध सुरू झाले. विल्यम गिब्ज मॅकॅडू अमेरिकेचे कोषाध्यक्ष होते. त्यांनी एलाला महिला स्वातंत्र्यकर्ज समितीला मार्गदर्शन करण्याची विनंती केली. त्यावेळी तिचे वय ७० च्यावर होते. तरीही तिने ही विनंती मान्य केली. या कार्याकरिता तिला देशभर प्रवास करावा लागला. त्यांतच १९१८ मध्ये देशभर पसरलेला इन्फ्ल्युएंझा तिला लागला आणि त्यांतच तिचा अंत झाला.

शिकागोच्या मुख्याध्यापिकांनी तिच्या स्मरणार्थ एक निधी जमविला. त्यांतून शहरांतील गरजू बालबालिकांना शिष्यवृत्त्या व मदत दिली जाते. अशारीतीने मरणानंतर देखील ती शिकागो शहरांतील आपल्या लाडक्या बालकांवर लक्ष ठेवीत आहे.

# ८ : मार्था बेरी

जॉर्जिया राज्याचा वायव्य भूभाग पाईनवृक्षांनी आच्छादिलेल्या पर्वतराजीनी व्यापलेला आहे. त्या प्रदेशांतून प्रवास करण्याचा प्रसंग आला तर बेरी स्कूलला जरूर भेट द्या. गोथिक शैलीच्या भव्य इमारती, पस्तीस हजार एकराचा विस्तीर्ण जंगलमय प्रदेश आणि हजारो विद्यार्थी तुमचे मन ओढून घेतल्याशिवाय राहाणार नाहींत. सुरुवातीला तेथे एक लाकडी झोपडी, तीन मुले व एक लोकविलक्षण स्त्री—मार्था बेरी—एवढीच होती.

जॉर्जियांतील रोम शहरांत १८६६ साली मार्थाचा जन्म झाला. अकरा भावंडात ती सर्वांत मोठी होती. तिच्या वडिलांचे नांव थॉमस बेरी. त्यांचा कापसाचा व्यापार बऱ्यापैकी होता. प्रशस्त व सुंदर घरांत बेरी कुटुंब राहात असे. घराला नांव दिले होते ओक-हिल.

त्याकाळी इतके ऐटीत राहाण्याचे भाग्य फारच थोडयांच्या वाटयाला येई. मार्थाची एक मैत्रीण सुटीच्या दिवसात डोंगराळ भागातल्या आपल्या घरी रहात होती. एकदा मार्था बेरी तिच्या घरी गेली. त्या दोघी जंगलांतल्या रस्त्यांनी भटकत असता पुष्कळदा एखादी मोडकी तोडकी झोपडी त्यांना आढळे. अनवाणी आणि अर्धनग्न स्थितीत झोपडीतील मुले दाराशी बसलेली त्यांना दिसत. बायका घाणेरडया, घामट व अमंगळ असत. बायका उघडयावर स्वैपाक करीत तर पुरुष आपली ओबडधोबड हत्यारे घेऊन शेतीच्या कामात गुंतलेले असत. त्यांची उपजीविका शेतावर वेताचीच चाले.

"या लोकांकडे पाहा." मार्था आपल्या मैत्रिणीच्या कानात अगदी हळूच म्हणाली. "मुले म्हणजे केवळ हाडा-मांसाचा सापळाच."

"त्यांना खायला कोठे पोटभर मिळते आहे ?" मैत्रीण म्हणाली. "आणि पुष्कळांना तर लिहिण्यावाचण्याचा गंधही नसेल."

"त्यांच्याकरिता कांहीतरी केलेंच पाहिजे." मार्था म्हणाली.

मार्था बेरी पुढील शिक्षणाकरिता बाल्टिमोरला गेली. पण वडील आजारी पडले म्हणून ती परत आली. घरी तिच्या मदतीची अतिशय जरूरी होती. धंद्यातील कामकाज ती पहात असे. माल देणे घेणे व हिशेब ठेवणे ही कामे ती करी. संगळी कामे संपली म्हणजे ती अधूनमधून पर्वतप्रदेशाला भेट देऊन तेथील मुलांकरिता भेटीच्या वस्तू बरोबर नेत असे.

"दान सत्पात्री व्हावे" तिचे वडील म्हणाले. "या लोकांना मुख्य म्हणजे त्यांचं जीवन सुधारण्याची संधी मिळाली पाहिजे."

रविवार सकाळची वेळ. मार्था ओक-हिलच्या आवारांतल्या लाकडी बंगल्यांत बसली होती. तिने मध्येच वर पाहिले तर तीन मुले तिच्याकडे उघड्या खिडकीतून रोखून पाहताना तिला दिसली.

मार्थाने हसून आगंतूक पाहुण्यांचे स्वागत केले. ते तिघेही अनवाणी होते. पाय चिखलाने लडबडले होते आणि अंगावरील कपड्यांच्या चिंध्या झाल्या होत्या.

"हा माझा भाऊ, हा दुसरा आमचा मित्र. आम्ही टॉपहॉलरचे राहाणारे व मित्र पॉसम ट्रॉटचा राहाणारा."

"तुम्ही शाळेत जाता का ?" मार्थाने विचारले.

"नाहीं." तो मुलगा उत्तरला.

"आणि रविवारच्या शाळेचे काय ?"

मुलांना कांही कळलेच नाही. मार्थाने समजावून सांगितले. रविवारच्या शाळेत मुलांना परमेश्वर, येशु ख्रिस्त व बायबल यांचे शिक्षण मिळते.

"आमच्याजवळ बायबल आहे." एक मुलगा म्हणाला. "पण आमच्या वडिलांना वाचता येत नाही."

मार्थाने त्यांना आत बोलाविले. "मी तुम्हाला बायबलमधल्या सुंदर सुंदर गोष्टी सांगते."

मुले खाली बसली. कान देऊन गोष्टी ऐकूं लागली. सिंहाच्या गुहेत गेलेला डॅनिअल, डेव्हिड आणि गोलिॲथ राणी एस्तेर यांच्या गोष्टी तिने सांगितल्या. त्या गोष्टीत मुले रमून गेली.

"आम्ही पुन्हा येऊ का ?" त्यांतील एकाने विचारले.

"जरूर या पुढील रविवारी आणि आपल्या भावंडाना जरूर आणा."

पुढच्या रविवारी मुलांनी तिच्या झोपडीत गर्दी केली. मार्थाने प्रथम त्यांना हाततोंड स्वच्छ करण्यास शिकविले. सर्वांना खायला केक दिले व प्यायला लेमन दिले. बायबलमधील आणखी गोष्टी सांगितल्या. परमेश्वराची स्तोत्रे त्यांच्याकडून म्हणवून घेतली व झाडे, पक्षी, फुलपाखरे यांची मनोरंजक माहिती पण त्यांना दिली.

"पुढच्या रविवारी आमच्या आईवडिलांना आणले तर चालेल का?" एका लहान मुलीने जाताजाता हळूच प्रश्न केला.

"त्यांत आपल्याला आनंदच आहे." तिला कल्पनाही नव्हती की मोठी माणसे मुलांच्या एवढीच आस्थेने येतील म्हणून. एका आठवडयानंतर ओक हिलमध्ये डोंगरी रहिवाशांची रीघ लागली. कोणी खेचरावरून तरी कोणी पायी. बैलगाडीतून आणि खटाऱ्यांतून लोकांनी गर्दी केली. मिळेल ती जागा पकडून बसली. मार्थाचा शब्दन् शब्द ऐकण्यास ते लोक उत्सुक होते. बायबल-मधील गोष्टी त्या आठवडयात तिला नीटपणे सांगता आल्या नाहीत. कारण गर्दी फार होती. रविवारच्या प्रार्थनेकरिता दुसरी अधिक चांगली जागा निवडण्याचा विचार तिच्या डोक्यात सारखा घोळत होता. थॉमस ट्रॉटमध्ये एक पडिक चर्च होते. ओक हिलपासून ८ मैल लांब असले तरी तिने ते पसंत केले.

"तें छान होईल." ती मनाशी म्हणाली.

चर्चच्या पायऱ्या मोडकळीला आल्या होत्या. जमनीवरच्या किडलेल्या फळ्यांत किडयांचा बुजबुजाट झाला होता. पहिल्या दिवशींच जोराचा पाऊस आला. छिन्नविच्छिन्न झालेल्या छपरांतून पाणी गळूं लागले. लोकांना परत

क्रमांक ५७६९३ दि: ... ग्रंथ २०१८ ... १५८२७

पाठविण्याशिवाय दुसरा इलाज नव्हता. पण चर्चच्या दुरुस्तीचे आश्वासन त्यांच्याकडून तिला पाहिजे होते. मगच ती त्यांना सोडणार होती.

"पुढच्या रविवारी चर्चच्या दुरुस्तीच्या कामाला कोण कोण येणार आहे ?" तिने विचारले.

बराच वेळ शांतता पसरली. सरतेशेवटी एकजण उठून म्हणाला, "मिस मार्था, पाऊस असतांना आपण दुरुस्ती करूं शकणार नाही आणि पाऊस नसेल तर दुरुस्तीची जरूरी नाही."

मार्थाने एक उसासा टाकला. या लोकांची समजूत कशी काढावी याचा ती विचार करूं लागली.

बुधवारी कामाला सुरुवात होईल असे तिने जाहीर केले. कामावर येणाऱ्या लोकांची तिने जेवण्याखाण्याची व्यवस्थाही केली. कल्पनेबाहेर लोकांनी तिला प्रतिसाद दिला. झाडून सर्वजण कामावर आले. तिने प्रत्येकाला कामाला लावले आणि संध्याकाळचे आंत पायऱ्या दुरुस्त झाल्या. जमीन नीट केली गेली आणि छपराचे गळते काढले गेले.

मार्था बेरीची घोडागाडी लोकांच्या पूर्ण परिचयाची झाली होती. "रविवारच्या बाई आल्या" मुलें आनंदाने ओरडत, तिच्या घोडागाडीमागे धावत आणि आईबाप दरवाजांतून हात उंचावून तिचे स्वागत करीत.

पॉसम ट्रॉटच्या तिच्या रविवारच्या सभा फारच चांगल्या भरत. दुसरी दोन चर्चें दुरुस्त करण्याचे तिने ठरविले. तीन ठिकाणी तीन गट कामाला लागले. पण तेवढ्यानेही पुरे पडले नाही.

नुसत्या गाण्याने व गोष्टींनी मुलांचे समाधान झाले नाही. "आम्हाला आमचें नांव लिहावयाला शिकवाल का ?" डाग असलेल्या चेहऱ्याच्या एका मुलाने विचारले, "तुम्ही संख्या कशा लिहिता ?" त्याच्या बहिणीने लाजत लाजत विचारले.

तिच्या वडिलांनी मृत्यूपूर्वी तिला मोठी जमीन दिली होती. "शाळे-करिता खोली बांधण्यास ही जागा अगदी योग्य आहे." मार्थाने मनाशी

विचार केला. "मग मात्र मुले रोज येतील. हल्ली ती आठवड्यांतून एकदांच येतात."

नवीन शाळा हळू हळू भरभराटीस आली. प्रथम शिक्षकाला बसायला एक खोके होते. मुलांना बसायला फळ्या होत्या पण डोंगरी वस्तीतील मुले मोठ्या संख्येने शाळेत येऊं लागली. मग खोलीबरोबर एक शिक्षकही वाढला.

तेवढ्याने मार्थाचे समाधान झाले नाही. उन्हाळ्याची सुटी लागली म्हणजे शिकविलेल्या साऱ्या गोष्टी मुले विसरत. शाळा चालू असतांना सुद्धा केव्हा केव्हा आठवडे आठवडे घरीच राहात. "आम्हाला बटाटे काढायला त्यांची मदत लागते." मुलांच्या आया म्हणत.

"खरं म्हणजे वसतिगृह असलेली शाळाच हवी." मार्थाने मनाशी ठरविले. "मुलांची अज्ञान व दारिद्रय यांतून सुटका झाली पाहिजे. लेखन-वाचनाबरोबर स्वच्छता व पौष्टिक आहाराची त्यांना आवश्यकता आहे. आधुनिक शेतीव्यवसाय त्यांना शिकविला पाहिजे. वसतीगृहाशिवाय या गोष्टी शक्य नाहीत."

त्याच दिवशी मार्था शहरांत गेली. तिच्या वडिलांनी दिलेल्या जमिनीचे कागदपत्र घेऊन वकिलाच्या घरीं पोहोचली. जज् मोझेस राईट हे त्यांच्या कुटुंबाचे वकील होते.

"वकील साहेब, माझी जमीन मी पहाडी मुलांना देऊं इच्छिते. लवकरच त्या ठिकाणी एक शाळा व वसतिगृह बांधण्याचा माझा विचार आहे."

"एकदा दान केलेली जमीन परत मिळूं शकणार नाही. तुमच्यापाशी मौल्यवान अशी एवढी एकच गोष्ट आहे. हा व्यवहार करण्याच्या आधी तुम्ही काळजीपूर्वक विचार करावा असे मला वाटते." वकिलाने कायद्याचा मुद्दा स्पष्ट केला.

"मी याचा संपूर्ण विचार केला आहे." मार्थाने निर्धाराने उत्तर दिले. "तुम्ही यांत कांही करूं शकत नसाल तर मला दुसरा वकील पाहावा लागेल."

जज् राईटनी नाइलाजाने तिचे म्हणणे मान्य केले. १३ जानेवारी १९०२ ला नवीन शाळेचे उद्घाटन ठरले होते.

"त्याच्या आधी दोन गोष्टी आपल्याला साधायच्या आहेत." ती आनंदाने म्हणाली. "एक शाळेची इमारत बांधणे व दुसरे त्यांत शिक्षण घेण्यासाठी मुले जमा करणे."

मार्थाची घोडागाडी पुन्हा एकदां जंगलाच्या मार्गाने दौडूं लागली. रस्ता अरुंद व कच्चा होता. "शिकूं इच्छिणारी मुलें मला हवीत." वाटेंत भेटेल त्याला ती सांगत असे. "ज्ञान घेऊं इच्छिणारी व आयुष्यांत धडपड-णारी मुले मला आवडतात. शाळेची फी पन्नास डॉलर्स आहे. फी देणे ज्याला शक्य नसेल त्यान काम करावे."

शाळेच्या वसतिगृहाच्या इमारतीच्या कामाला सुरुवात झाली. काम-दारांचा एक चांगला संघ तिने शोधून काढला. बहुतेक वेळ मुलांच्या शोधांतच खर्च होई. पण फावल्या वेळात शाळेच्या कामांकडे ती कटाक्षाने लक्ष देई.

"या शाळेकरिता माझ्याकडील पैन पै खर्च होणार आहे" ती आपल्या त्या लोकांना बजावीत असे. "पण सर्व पैसा सत्कारणी खर्च व्हावा एवढीच इच्छा आहे." ओक-हिलचा माळा धुंडाळून तिने कांही फर्निचर जमवले. प्रसंगी लाकडी सामानसुमानाकरिता शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे भीक सुद्धा मागितली. कोठेतरी लिलाव होणार आहे अशी बातमी तिला कळली. लगेच ती तिकडे निघाली. लष्करी खाटा फारच कमी किमतीत तिला मिळाल्या. केवढा आनंद झाला तिला !

ठरल्यावेळी शाळेचे उद्घाटन झाले. शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या उत्साहाला उधाण आले होते. एका मुलाची—क्लेटन हेन्सनची—वकील होण्याची इच्छा होती. "मला येथे किती उच्च शिक्षण मिळेल ?" त्या मुलाने अधिरतेने विचारले.

"तुला पाहिजे तिथपर्यंत." मार्थाने उत्तर दिले. "हे छप्पर फोडून वर आकाशापर्यंत."

दुसरा मुलगा विलि जॅक्सन तीस मैल चालत आला. येताना बरोबर एक डुक्कर आणले होते त्याने शाळेच्या फीकरिता. एमरी अलेक्झांडर एक

बैलजोडी घेऊन आला. "हे नांगराला जुंपण्यालायक झाले आहेत." त्याने सांगून टाकले. "फीबद्दल मी बैल आणले आहेत."

वर्ष संपले. मार्थाच्या शाळेत १८ मुलें होती. पुढील वर्षी उन्हाळ्याच्या सुटीपूर्वी क्लेटन हेन्सन शिक्षण संपवून प्रशस्तिपत्रक मिळवण्यास सिद्ध झाला.

"तुझ्या पशस्तिपत्रक वितरणाचा समारंभ शक्य तितका सुरेख घडवून आणू."

समारंभाला १०० हून अधिक लोकांना आमंत्रणे गेली. शहरांतील वाद्यवृंद आपखुषीने हजर झाला. प्रमुख पाहुणे म्हणून होक स्मिथ यांची योजना झाली. ते कांही काळ अध्यक्ष क्लिव्हलंड यांचे गृहमंत्री होते. नंतर जॉर्जियाचे राज्यपाल होते. नैसर्गिक संपत्तीचे रक्षण करावे या मताचे ते कट्टर पुरस्कर्ते होते.

"मुलें ही एक निसर्गसंपत्तीच आहे" मार्थाने त्यांना सांगितले. "आमच्या शाळेत लक्ष घालणे हे तुम्हाला तर विशेष आवडेल."

होक स्मिथ नेहमी कामाच्या गडबडीत असायचे. पण मार्था बेरी तेवढीच निग्रही. त्यांच्याकडून होकार घेतल्याशियाय हालायचे नाही असे तिने ठरविले होते. सरते शेवटी स्मिथना होकार द्यावाच लागला. त्या संध्याकाळी पाहुण्यांचे माऊंट बेरी येथे स्वागत झाले. विस्तीर्ण भूप्रदेशावर कोठारासारखी दिसणारी ती एकाकी इमारत पाहून त्यांनी विचारले, "तुमची शाळा आहे तरी कोठे ?"

"हीच तर शाळा." मार्था उत्तरली.

"कितीजण प्रशस्तिपत्र घेणार आहेत ?" स्मिथनी विचारले.

मार्थाने गंभीरपणे उत्तर दिले, "फक्त एकच. तो अतिशय हुषार विद्यार्थी आहे. शिक्षण पूर्ण केल्याबद्दल त्याला आज निरोपसमारंभ आहे."

स्मिथना अतिशय आश्चर्य वाटले. ते तडक व्यासपीठावर चढले. तिच्या शाळेचे कौतुक करून आपल्या भाषणाने त्यांनी जनसमुदायाला हेलावून सोडले. मार्थाच्या आग्रहावरून नंतर ते मेजवानीलाही हजर राहिले. अर्थातच उशीर झाला. शाळेच्या अतिथीगृहात त्यांना रात्री मुकाम करावा लागला.

या सर्व आठवणी होक स्मिथ नंतर वारंवार सांगत असत. त्या रात्री ज्या खोलीत ते झोपले होते ती खोली तळमजल्याला होती. वर मुलींची निजायची जागा होती. रात्रभर मुले जागीच होती. त्यांच्या हसण्याखेळण्याचा आवाज होक स्मिथ ऐकत होते. पहाटे पांच वाजता मुलांनी सामानसुमान आवरले. ती उड्या मारीत खाली उतरली. प्रत्येकजण मिस बेरीच्या खोलीशी जाऊन तिचा निरोप घेई. "शाळेचे एक वर्ष अतिशय सुखांत गेले" असे म्हणून तिचे आभार मानी.

होक स्मिथ आधीच दमलेले होते. रात्री चांगली झोप न लागल्यानें त्यांचे डोळे चुरचुरत होते. तसेच सकाळी सहाला उठून ते खोलीबाहेर आले. न्याहारीच्या वेळी मार्था त्यांना म्हणाली, "तुम्ही बरेच लवकर उठलात. तुम्हाला अधिक विश्रांतीची जरूरी आहे."

हेच होक स्मिथ कालांतराने तिच्या शाळेच्या व्यवस्थापक मंडळाचे एक सभासद झाले. मार्थाच्या शाळेच्या प्रगतीने ते भारावून गेले होते. खिशांतून चेकबुक बाहेर काढून ते म्हणाले, "मिस बेरी ! तुमची शाळा पाहून मी अतिशय संतुष्ट झालो आहे. तुम्हाला अधिक वसतिगृहांची जरूरी आहे ह्याबद्दल माझी खात्री पटली आहे. माझी छोटीशी देणगी स्वीकारा आणि कामाला लागा."

अशा अनेक देणगीदारांची जरूरी होती. शाळेचा खर्च ही तिची सर्वांत मोठी डोकेदुखी होती. मोठ्या मुलांच्या अन्नखर्चाने तिची पांचावर धारणा बसली. "मी मुलींची शाळाच सुरू करावयास पाहिजे होती." ती कधी कधी मनाशी विचार करी. "मुलींचा अन्नखर्च नक्कीच कमी आला असता." बटाटे व वाल नेहमी चुलीवर शिजत ठेवलेले असत. डोंगराळ भागांतील मुलांना स्वाभाविकच अन्न भरपूर लागे. त्यांची भूक वाढती असते. एका मुलाने जेवणांत भाकरीची सबंध चवड फस्त केल्याचे तिने पाहिले.

"तूं या देशाचा थोर नागरिक बनशील अशी माझी खात्री आहे."

"हे तुम्ही असे ओळखले ?" त्या मुलाने विचारले.

"ह्या भाकरींची चवड वाया जाणार नाही."

झालेही तसेच. तो मुलगा मोठेपणी सेनेटचा (Senate) सभासद झाला.

मार्था वेरीच्या शाळेचे नांव सर्वतोमुखी झाले. जॉर्जियांतूनच नव्हे तर आलाबामा, टेनेसी आणि कॅरोलायना संस्थाने यांतूनही विद्यार्थ्यांची रीघ लागली. जादा विद्यार्थी म्हणजे जादा पुस्तके, जादा अंथरुणे आणि जादा अन्नखर्च. इतके असूनही कोणाला विन्मुख परतवल जात नसे.

एका रात्री मार्था वसतिगृहांतून फेरफटका मारीत होती. एका खोलीपाशी मुलाची प्रार्थना तिने ऐकली. तो म्हणत होता, "देवा आमच्या ताटल्या झिजून गेल्या आहेत. नांगराचे दोर वर्ष कांही काढणार नाहीत. मी असं ऐकलं आहे की न्यूयॉर्कमधले कांही लोक शाळांना मदत देतात. देवा मिस मार्थाला भरपूर शक्ति दे. न्यूयॉर्कला जाऊन लोकांना आपल्या अडचणी समजावून सांगू दे तिला. आमेन."

थोड्याच दिवसात ती न्यूयॉर्कला जायला निघाली. ज्यांच्याकडून मदत मिळेल अशी तिची अपेक्षा होती त्यांचे पत्ते तिने बरोबर घेतले. "एक चांगलासा प्रियकर शोधून काढ व लग्न करून टाक" पाहिल्यांदाच भेटलेल्या एका स्त्रीने हंसत तिला सुनावले. "एखाद्या गबाळ्या बाईला करूंदे हे काम."

एका मित्राने ब्रुकलीनमधील चर्चमध्ये तिचे भाषण ठरविले. त्याला तिच्याबद्दल सहानुभूति होती. मनातून घाबरलेली मार्था त्या दिवशी फारच छान बोलली. आपल्या मुलांच्या अडचणीचे चित्र तिने त्यांच्या डोळ्यांसमोर उभे करून मदतीचे आवाहन केले. तिचे भाषण संपल्यावर लोकांनी पुढें येऊन तिच्या हातांत चेक कोंबले. शाळेकरिता पुस्तके, कपडे व फर्निचर पाठविण्याचे आश्वासन दिले. एका जोडप्याने वॉलस्ट्रीटमधल्या एका श्रीमंत माणसाचे नांव दिले.

"आम्ही पाठविले असे सांगू नका" त्यांनी सूचना दिली. "ते गृहस्थ अतिशय उदार आहेत. तुम्हाला तेथे जरूर मदत मिळेल."

मार्था त्या श्रीमंताच्या घरी गेली. तिचे म्हणणे त्याने शांतपणे ऐकून घेतले. "आमच्या शाळेत प्रत्येकाला ५० डॉलर खर्च येतो. त्यापैकीं एकाचा खर्च तुम्ही द्याल अशी आशा आहे."

"एक गोष्ट विचारूं ?" तो गृहस्थ म्हणाला. "तुम्हाला दरमहा पगार किती मिळतो ?"

"पगार ? कांहाच नाही."

"मग यांतून तुम्हाला मिळतं काय ?"

"मला खूपच मिळतं." मार्थाने आवेशाने उत्तर दिले. त्या गृहस्थाची मदत देण्याची इच्छा नाही याची तिला खात्री पटली होती. "माझ्या शाळेत मुले फक्त कपड्यानिशी येतात. आणि परत जातात ते भोवतालच्या जीवनांत क्रांति घडवून आणण्याकरिता. मी त्यांची प्रगति होत असतांना पहाते...."

मार्था बोलत होती तेवढ्यांत त्या गृहस्थाने कांही तरी लिहिले. घडी करून तो कागद तिच्या हातीं दिला. त्यांचे आभार मानून मार्था लगोलग निघाली. घराबाहेर पडतांच तिने कागदाची घडी उघडली. ५० डॉलर ऐवजी ५०० डॉलरचा चेक तिला दिसला. एकाऐवजी दहा मुलांची सोय झाली.

न्यूयॉर्कच्या पहिल्या भेटीनंतर मार्थाने वारंवार दौरे काढले. वॉशिंग्टन, फिलाडेल्फिया, बाल्टिमोर, सेंट लुई, शिकागो वगैरे ठिकाणांना तिने भेटी दिल्या. "माझ्या मुलांना मदत मिळणार असेल तर मी कुठेंही जाईन व कुणालाही भेटेन." ती नेहमी म्हणे.

एकदा ती आजारी असतांना तिला फोन आला. तिने तसाच फोन घेतला. एक म्हातारा गृहस्थ शाळेबद्दल तिच्याची बोलूं इच्छित होता. तशीच उठून कसेतरी कपडे करून ती त्याच्या घरी गेली. त्यानेच दार उघडून तिचे स्वागत केले.

"मिस बेरी" अंगावरील शाल काढीत ती बसत असतांनाच तो म्हणाला, "तुम्हाला माझे हत्ती पाहायचे आहेत का ?"

"ही कांहीतरी थट्टा दिसत आहे. मी इतकी आजारी आहे की मला त्यात काहीच वाटायचे नाही." ती मनाशी म्हणाली.

पण शिष्टाचारासाठी ती म्हणाली, "जरूर."

त्या गृहस्थाने मार्थाला पोर्चमध्ये नेले. कोरलेल्या हस्तिदंताचे कितीतरी हत्ती तिथे होते. मार्थाने त्याचे कौतुक केले. त्याला अभिमान वाटला. तेवढ्यात त्याची म्हातारी बहीण तेथे आली. "आता आमच्या जपानी बाहुल्या तुम्ही पाहाच." ती म्हणाली.

मार्था अधिकच गोंधळली. नाजूक बाहुल्या पाहून तिने कौतुक केले.

"तुम्ही फार प्रेमाने मला ह्या सगळ्या वस्तू दाखवल्यात. तुम्ही जॉर्जियाला याल तेव्हा तुम्हाला मी माझा संग्रह दाखवीन मुलांचा." मार्थाने सांगितले.

"अर्थात येऊंच" तो गृहस्थ म्हणाला. "तुमची तिथे एक शाळा आहे असे ऐकतो. तुम्ही दिवाणखान्यात येता का ?"

शाल पांघरून मार्था दिवाणखान्यात शेकोटीपाशी बसली. वृद्ध गृहस्थाच्या व त्याच्या बहिणीच्या चेहेऱ्यावर स्मित झळकले.

"तुम्हाला खरं सांगू ?" तो म्हणाला, "ही तुमची परीक्षा होती. आम्हाला वाटलं तितकं जर तुमचं तुमच्या शाळेवर प्रेम असेल तर नक्कीच तुम्ही आमच्याकडे आज रात्री याल आणि आम्हा म्हाताऱ्यांशी सोशिकपणाने वागाल."

एवढे बोलून त्याने १०,००० डॉलरचा चेक त्या आश्चर्यचकीत झालेल्या पाहुणीच्या हातात ठेवला.

मदत गोळा करण्यात तिचा हातखंडा होता. मार्गातल्या अडचणी दूर होत होत्या. शाळेचे यश वाढत होते. सर्व ठीक व सुरळीत चालू होते. आणखी एक स्वप्न साकार करण्याची वेळ आतां आली होती.

"आता कशाची जरूरी असेल तर आणखी एका शाळेची—फक्त मुलींकरिता." तिने चालकांच्या पुढे विचार मांडले.

"अशक्य" एकजण ओरडला.

"हास्यास्पद" दुसऱ्याने साथ दिली.

"याचा अर्थ जादा वसतीगृहे, जादा वर्ग, जादा पुस्तके, अन्न व पैसा." तिसरा म्हणाला.

मार्था आपल्या ऑफिसमध्ये परत आली. देशांतील सर्व शिक्षणतज्ज्ञांना तिजकडून भराभर पत्रे रवाना झाली. "दक्षिणेतील एका नामवंत मुलींच्या शाळेकरिता चालिका पाहिजे." प्रत्येकाच्या पत्रात तिने लिहिले होते व मदतीची याचना केली.

बऱ्याच पत्रव्यवहारानंतर तिला एक योग्य चालिका आढळली.

मार्था तिला उतरवून घेण्यास स्टेशनावर गेली होती. तिथे ती मार्थाला म्हणाली, "नवीन शाळा पाहाण्यास मी अतिशय उत्सुक आहे."

"त्या तिथे" मार्थाने झाडीतील एका मोकळ्या जागेकडे बोट दाखविले. त्यांची गाडी दरवाजातून आंत येत होती. कांही मुले झाडी तोडून शाळेची जागा साफसूफ करीत होती.

नवीन चालिका निरखून पाहूं लागली. "तिथे तुम्हाला मुली दिसत नाहीत ?" आता मार्था मनोराज्यात मग्न झाली होती. "आपण पोर्चवर हिरवीगार वेल सोडू. रस्त्याच्या दुतर्फा व्हायलंटस असतील. त्यांना ती खूपच आवडतील."

"पण आपल्याला मुली कोठून मिळणार ?" नवीन बाई चाचरत बोलल्या.

"आपण हुषार मुली शोधून आणू." मार्था म्हणाली, "नवीन झाडे लावताना करतो तसं."

१९०९ च्या "थँक्सगिव्हिंग डे" (नोव्हेंबरचा शेवटचा गुरुवार) पर्यंत शाळेत पांच मुलींनी नांवे नोंदविली होती. वर्षअखेरपावेतो आणखी वीस मुलींची भर पडली.

स्वैपाक आणि वसतीगृहाची स्वच्छता मुलींनाच करावी लागे. मार्थाच्या विनंतीवरून सिंगर कंपनीने एक शिवण्याचे यंत्र शाळेला दिले. मुली त्या मशीनवर स्वताचे कपडे शिवीत. विविध व्यवसायांचे शिक्षण देण्याकरिता

मार्थाने एका शिक्षिकेची नेमणूक केली. पहाडी बायका वापरीत तशा नाजूक नक्षीच्या शाली विणणे, चादरी तयार करणे वगैरे गोष्टी त्यांना शिकवण्यात येत असत. मुलींनी बनविलेल्या हस्तकलांचे प्रदर्शन देशात ठिकठिकाणी भरविण्यात आले. या प्रदर्शनामुळे मेरीच्या शाळेची आपोआप जाहिरात झाली. शिवाय शाळेला चांगला फायदाही झाला.

शिक्षणाबरोबर खेळालाही महत्त्व दिले जाई. संगीताच्या चढाओढी वारंवार होत असत. प्रत्येक मुलीचा वाढदिवस साजरा करण्याचा मार्थाचा कटाक्ष असे. वाढदिवसाच्या मेजवानीत मुली दंग होत. एकदा वाढदिवसाची 'केक' इतकी सुंदर बनली होती की मुलीने ती कापण्याचे नाकारले. जिचा वाढदिवस होता ती म्हणाली, "ही केक अशीच राहू दे, लोकांनी ती पाहू देत. साजरा झालेला हा माझा पहिलाच वाढदिवस व पहिलीच केक."

चालक समितीला सुरुवातीला मुलींच्या शाळेची धास्ती वाटत होती. पण आपली भीती खोटी ठरल्याचे त्यांनी कबूल केले. लवकरच मार्थाने माऊंटबेरी येथे कॉलेज काढण्याचे ठरविले. त्याविरुद्ध कोणी ब्रसुद्धा उच्चारला नाही.

मार्थाच्या शाळची प्रसिद्धी देशभर सर्वतोमुखी झाली. अध्यक्ष थिओडोर रूझवेल्ट शाळेला भेट देण्याकरिता आले. शाळेची प्रगती पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला. दानशूर अॅन्ड्र्यू कारनेगी यांनी आपल्या आश्रयाखालील संस्थांच्या यादीमध्ये मार्थाच्या शाळेचे नाव घातले. हेन्री फोर्ड हे जोडपे शाळेचे परम-मित्र होते. प्रथमभेटीत मार्थाने त्यांचे मन आकर्षून घेतले. "घरी वाढवलेले धान्य, घरगुती जेवण आणि घरगुती वातावरण" या शब्दात तिने वर्णन केले. त्यानंतर फोर्ड दांपत्य शाळेला वारंवार भेटी देऊ लागले. शाळेतील शिक्षणाला तांत्रिक शिक्षणाची जोड दिलेली पाहून त्यांना फार बरे वाटले. पुष्कळदा फोर्ड स्वता शेतांतील ट्रॅक्टर्स चालवून पाहात. यंत्रसामुग्रीच्या दुरुस्तीला मदत करीत व त्यांची पत्नी क्लेअरा ही त्यांचा स्वयंपाक, विणकाम आनंदाने नजरेखालून घाली.

कांही दिवसांनी फोर्डनी आपल्या प्रमुख व्यवस्थापकाला जागेची पाहाणी करण्यास पाठविले. शाळेचे आवार वाढविण्यांत आले. आणि लवकरच त्या

जागेवर भव्य गॉथिक इमारती उभारल्या गेल्या. त्याकरिता जवळ जवळ चाळीस लक्ष डॉलर्स खर्च आला.

१९४२ मध्ये मार्था इहलोक सोडून गेली. मृत्युपूर्वी तिच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव झाला. जॉर्जिया विद्यापीठाच्या शिक्षण समितीची ती पहिली स्त्री-सभासद होती. संस्थानाच्या नियोजन मंडळाची ती पहिली स्त्रीसभासद झाली. विद्यापीठाने तिला एकामागून एक सन्मान्य पदव्या दिल्या. १९२५ मध्ये अध्यक्ष लव्हिन कुलिज यांनी तिला व्हाईट हाऊसमध्ये बोलावणे पाठविले. विशेष कार्याबद्दल त्यावेळी तिला थिओडोर रुझवेल्ट स्मृतिपदक बहाल करण्यात आले. बरोबर पांच सन्मान्य पाहुणे आणण्याची तिला विनंती करण्यात आली होती. तिने तात्काळ आपल्या पांच विद्यार्थ्यांची निवड केली. "माझ्यापेक्षां या सन्मानाला ते अधिक लायक आहेत." तिने अध्यक्षांना सांगितले.

मार्थाला जगभर प्रसिद्धी लाभली. पण तिचे मन मात्र जॉर्जियाच्या पठारावरच घुटमळत होते. अखेरच्या दिवसापर्यंत तिच्या आशा आकांक्षा शालेय जीवनाशी एकरूप झाल्या होत्या. शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या प्रत्येक विद्यार्थी–विद्यार्थिनीच्या जीवनाकडे ती उत्सुकतेनें पाही. जी मुले सुयश संपादन करीत त्यांच्या बहुमानाकरिता शाळेच्या आवारांत झाडे लावण्यात येत.

शाळेतील एखाद्या विद्यार्थिनीने तिच्याच शाळेतील एखाद्या विद्यार्थ्याशी विवाहबद्ध होणाचे ठरविले तर तिला खूप आनंद होई. शाळेचे चर्च गुलाबाच्या फुलांच्या तोरणांनी सुशोभित करण्यात येई आणि कन्यादान स्वता मार्था करी.

"विवाहसमारंभ मला नेहेमीच आवडतात." ती म्हणे, "ओकहिलच्या आमच्या दिवाणखान्यात झालेली माझ्या पांचही बहिणींची लग्ने मला आठवतात. प्रत्येक लग्नात तर मी स्वताच करवली असे."

आणि तुम्ही मात्र अद्याप लग्न केले नाही." एक नूतन परिणत मुलगी लाजत म्हणाली.

"माझे लग्न केव्हाच झाले आहे." तिने हसत उत्तर दिले. "माझे लग्न लागले आहे माझ्या शाळेशी. समोर दिसणारे शेकडो गोजिरवाणे जीव माझेच आहेत."

# १ : फ्लॉरेन्स डन्लॉप

रंगमंचावर मध्यभागी फ्लॉरेन्स डनलॉप उभी होती. पांढरा सफेद सॅटीनचा झगा तिला शोभून दिसत होता. त्यावरच्या जरीच्या कशिद्याने तिचें सौंदर्य अधिकच खुलले होते. गाण्याचा कार्यक्रम संपत आला. सुरेख व सुरेल आवाजात तिने शेवटली तान घेतली. तिचा प्रत्येक स्वर रसिकांच्या अंत:करणात भिडला. जनसमुदायाचा आनंद गगनात मावेना. कडक इस्त्रीचे पांढरे शर्ट व काळे कोट घातलेले कांही रसिक बेहोषीत ओरडले, "शाब्बास."

आनंदाने प्रफुल्लित झालेली फ्लॉरेन्स किंचित लवून रसिकांना अभिवादन करणार तोंच दिव्याच्या प्रकाशाचा झोत तिच्या डोळ्यावर पडला. "फ्लॉरेन्स ! फ्लॉरेन्स ! आजचा दिवस विसरलीस वाटते ? तुला सहलीस जायला उशीर होईल." एका बाईचा आवाज तिने ऐकला. तो तिला आईच्या आवाजासारखा वाटला.

फ्लॉरेन्सने डोळे किलकिले केले. कूस बदलली आणि खिडक्यातून आंत येणाऱ्या उन्हाकडे पाहिले. क्षणापूर्वीच आपण जगप्रसिद्ध गायिका होतो, आता कुठे आहों ?

"अरे आज तर वसाहत दिन" आठवण येऊन ती ओरडली. स्वप्न पार वितळले. ती कॉटवरून एकदम उठली. बहिणीच्या खोलीकडे धावत गेली. "एल्झी आटप लौकर" तिचे पांघरूण दूर करीत ती म्हणाली. "आज आपली सहल आहेना ?" एल्झी आळस झटकीत उठली. एकदम उडी मारून म्हणाली, "मी दोन मिनिटात तयार होते."

१ जुलै १८६७ रोजी कॅनडाच्या वसाहतीची स्थापना झाली. तो दिवस सर्वत्र पाळला जाई व डन्लॉप कुटुंब विशेषपणे साजरा करी. ऑंटारिओ प्रासादात ऑटवाजवळ रिदोह्यू येथे डन्लॉप मंडळी राहात. तिथून जवळच

असलेल्या एका सरोवराच्या कांठी त्या दिवशी ती सहलीस जात. फ्लॉरेन्स व तिची वहीण एल्झी खूप खपून वनभोजनाची तयारी करीत. सामान वाहून नेण्यास भाऊ नेहमीच सज्ज असत.

हिरव्यागार हिरवळीवर वनभोजनाची तयारी चालू होती. फ्लॉरेन्स एल्झीला म्हणाली, "आज सकाळी मला सुंदर स्वप्न पडले, त्याचवेळी आईने मला जागे केले. मी एक प्रसिद्ध गायिका होते. सुंदर सुंदर कपडे घालून व वेशभूषा करून रंगभूमीवर गात होते. गाणे संपले आणि लोकांनी आरोळ्या ठोकल्या 'शाब्बास ! शाब्बास !'

"आहेच तसा तुझा आवाज मधुर" एल्झीने तिला खुलविले. "कोणी सांगावं ? एखाद्या दिवशी तुझं हे स्वप्न सत्यसृष्टींत उतरेल. तुझ्या कार्यक्रमाच्या पहिल्या रात्री मी ऐटीत बसली असेन. माझा पोषाख पण हेवा वाटणारा असेल."

दोन्ही हातांचे आंगठे आणि तर्जनी ह्यांची वर्तुळे करून ती दुर्बिणीसारखी डोळ्यासमोर धरून फ्लॉरेन्स म्हणाली, "फ्लॉरेन्स डनलॉप ! पाहाच एकदा तिचे सौंदर्य. तिच्या आवाजाइतकेच खुलून दिसणारे आहे."

एल्झी खदखदून हंसली. आपल्या वनभोजनाच्या साध्या कपड्यांकडे फ्लॉरेन्सने निरखून पाहिले आणि मोठ्याने हंसत ती म्हणाली, "कां दिसते की नाहीं मी प्रमुख गायिकेसारखी ?"

फ्लॉरेन्स डन्लॉप गायिका म्हणून कधीच प्रसिद्धीस आली नाही. तिचा मधुर आवाज रविवारच्या उपासनेवेळच्या गाण्याशिवाय इतरत्र कोणालाच ऐकूं आला नाही. पण तिने मोठेपण मिळविले ते निराळ्याच मार्गाने.

फ्लॉरेन्सचे हायस्कूल शिक्षण संपले व तिने ऑटवाच्या नॉर्मल स्कूलमध्ये शिक्षकसनद मिळविण्याकरिता प्रवेश केला. "शिक्षिकेचा पेशा अतिशय कंटाळवाणा. तुला तो मानवेल का ?" तिच्या शाळेंतील एक मैत्रीण म्हणाली.

"कंटाळवाणा ?" फ्लॉरेन्सने उत्तर दिलें. "मला मुळीच तसे वाटत नाही. ते खरंखुरं धाडस ठरेल असे मला वाटते."

"काय धाडस ?" दुसऱ्या मुलीने तिला उडवून म्हटले. "साध्या शिक्षिकेचे रटाळ जीवन, त्यांत कसले आले आहे धाडस ?"

शाळेचा पहिला आठवडा संपला. मैत्रिणीची समजूत चुकीची असल्याची तिची खात्री पटली. "मुलामुलीना लिहिण्यावाचण्यास शिकवण्यात आनंद आहे." तिची खात्री पटली. "आणि ही तर शिक्षिकेच्या जीवनाची कोठे सुरवात आहे."

दुसरा आठवडा संपेतो ती नवीन व्यवसायाशी एकरूप झाली.

१९१६ मध्ये फ्लॉरेन्सला शिक्षकसनद मिळाली. एका प्रोफेसरने तिला विचारले, "ऑन्टारिओच्या ग्रामीणभागात शिक्षकेची नोकरी करायचे तुम्हाला आवडेल का ?"

"जीवनाची चाकोरी बदलण्याची वेळ आली आहे. गेली २० वर्षे मी ऑटावांतच आणि आसपास राहिले आहे."

ऑटावाच्या धकाधकीच्या जीवनातून ती बाहेर पडली. तिला हायसे वाटले. पहाटेचा झुळझुळ वारा व काटेरी झुडुपे मधेमधे असलेली शेते तिला खूप आवडली. नवीन शिक्षिकेचे मन आपल्याबद्दल चांगले व्हावे याबद्दल मुले उत्सुक होती. याही गोष्टीचे तिला नवल वाटले.

शाळेची इमारत लाकडी असून रंगाने पांढरी शुभ्र होती. सॅम्युअल द शॉम्पलेनची माहिती तिने मुलांना विचारली. सगळ्यांनी हात वर केले. मुलांच्या उत्साहाला भरते आले होते. "तूं सांग एलिझबेथ" मागील बाकावर बसलेल्या एका मुलीला ती म्हणाली.

"कॅनडाचे संस्थापक व पहिले गव्हर्नर सॅम्युएल द शॉम्पलेन होते."

"शाब्बास ! तुम्ही सर्वांनी हा धडा चांगला केला आहे. पण तुमच्यापैकी किती मुलांना सॅम्युएल द शॉम्पलेन यांच्या पत्नीची माहिती आहे ? या देशांतील पहिली शाळा त्यांनीच सुरू केली. त्यांचे विद्यार्थी म्हणजे रेड-इंडियन लोकांची मुले. वर्गात येण्यासाठी मुलांचे मन वळवण्याकरिता त्या आरसे वापरीत. मग आरशात पाहाण्याच्या नादांत मुले शाळेत रमून जात."

ही माहिती ऐकून मुलें आनंदाने हसली. पुढील बाकावरचा एक छोटासा मुलगा हात वर करून म्हणाला, "बाई आम्हाला आणखी गोष्टी सांगा. तुमच्यासारख्या बाई असल्या की शाळेची गम्मतच."

पुढे पुढे वर्गातील मुलांचें लक्ष अभ्यासाकडे विशेष नसे. पहिल्या दिवसाइतकी ती उत्सुक नसली तरी आनंदित असत. एक गोष्ट तिच्या लक्षांत आली. वेगवेगळ्या मुलांच्या बौद्धिक पातळ्यात फार अंतर होते. "ही सर्व मुले एकाच वयाची आहेत." ती विचार करू लागली. "पण कांही हुषार आहेत तर कांही मंद आहेत. जोसेफ गणित चटकन सोडवितो तर मरिअॅनचे पाढेही पाठ नाहीत."

वाचनाच्या बाबतीत तेंच. आपल्या सहशिक्षिकांना याबद्दलचा अनुभव विचारला. खांदे उडवीत एकीने उत्तर दिले, "हे असेच असते."

फ्लॉरेन्सने आपले कार्य चालूच ठेवले. विद्यार्थ्यांची बौद्धिक कुवत वेगवेगळी असते. तसेच त्यांचे स्वभावधर्मही भिन्न असतात याची तिला जाणीव झाली. कांही कमालीचे शांत होते. त्यांना वर्गात बोलके करणे महाकर्म कठीण. तर कांहीचे लक्ष पाठांत गुंतविण्याकरिता तिला फार त्रास पडे. "पण कांही झाले तरी यांना वळणावर आणण्यासाठी मला मार्ग शोधलाच पाहिजे" तिने मनाशी ठरविले.

ग्रामीण शिक्षणक्षेत्रात दोन वर्षे घालविल्यानंतर तिने ऑटावास परतण्याचा विचार केला. "ग्रामीण विद्यार्थ्यांपेक्षा शहरांतील विद्यार्थी कांहीं वेगळे असतात का हे जाणून घेण्यास मी उत्सुक आहे." ती म्हणाली.

कॅनडाच्या राजधानीत ती परत राहाण्यास आली. तेथे ती रमली. मुख्यप्रधानांच्या निवासस्थानावरून फेरफटका मारणे तिला आवडे. पार्लमेंट गृहासमोर डौलाने फडफडणारे युनियन जॅक तिला विलोभनीय वाटे. दर शनिवारी ऑटावामधील वस्तुसंग्रहालयाला ती भेट देत असे आणि संध्याकाळी सिनेमागृहात किंवा मित्रांसमवेत संगीत कार्यक्रमाला जाई.

शहरांतील मुले ग्रामीण भागांतील मुलांइतकीच तल्लख बुद्धीची होती. तिला त्यांच्यांत विशेष फरक आढळला नाही. शाळेत जाणाऱ्या सर्व मुला-

मुलींच्या स्वभावधर्माचा तिला अभ्यास करावयाचा होता. त्याचसाठी ती ऑटावाला आली होती. क्वीन्स विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी तिने नांव दाखल केले. विद्यापीठाच्या प्राध्यापकांनी मुलांची मनोभूमिका तिला समजावून सांगितली. थोडा का होईना त्याचा फायदा तिला मिळाला.

शिक्षणक्षेत्रांतला तिचा अनुभव वाढूं लागला. सर्वसामान्य मुलांत तिचे मन रमत नसे. व ज्या किंवा वाईट अर्थाने जी असामान्य असत त्यांच्या-बद्दल तिला विशेष कुतुहल होते. कांही मुलांचा स्वभावधर्म भिन्न असे. त्यांचे शाळेच्या नित्य अभ्यासाकडे लक्ष नसे. अशांच्याबद्दल तिला विशेष आस्था वाटे. कांही मुले बुद्धीने तीक्ष्ण होती. कांहीं जड, कांही विकृत मनोभूमिकेची तर कांही रोगिष्ट. आंधळे, बहिरे व सतत आजारी अशा मुलांबद्दल तिला कुतूहल असे.

"अशाच मुलांच्या बाबतीत मला काम करावयाचे आहे." फ्लॉरेन्स म्हणाली "या मुलांची वैशिष्टचे मला जाणून घ्यावयाची आहेत."

तिच्या डोक्यात अनेक कल्पना होत्या. शैक्षणिक विषयाला व मानस-शास्त्राला वाहून घेतलेली अनेक मासिके तिने वाचली. आणि लंडनमध्ये एक वर्ष काम करण्याची जेव्हा संधी आली तेव्हा तिने तावडतोब अर्जही केला.

"ज्या मुलांच्या विशिष्ट अडचणी असतात त्यांचं शिक्षण कसं चालतं हे जाणून घेण्याची मला उत्सुकता आहे."

फ्लॉरेन्स डन्लॉप सेंट लॉरेन्स येथे बोटीवर चढली. देश सोडतांना दिसलेला देशाचा विशाल देखावा, अटलांटिकमधील दीर्घ प्रवास, लंडन-मधील बकिंगहॅम राजवाडा आणि पार्लमेंटचे सभागृह या गोष्टींनी तिचे अंतःकरण उंचबळवून टाकले.

"मला अगदी घरी आल्यासारखे वाटते" फ्लॉरेन्सने आपल्या इंग्लंड-मधील मार्गदर्शकांना सांगितले. "आमचे ऑटावाचे पार्लमेंट-सभागृह असेंच आहे. घड्याळ व मनोरा दोन्हीही पण सारखेच."

फ्लॉरेन्सने वेस्टमिनिस्टर अॅबे पाहिले. केन्सिंगस्टनमधील अरुंद रस्ते आणि पिकॅडली सर्कसची तुफान गर्दी याची तिला गंमत वाटली. पण आपल्या

कामात ती नेहमी तत्पर असे. त्याकडे ती दुर्लक्ष करीत नसे. वर्षाच्या शेवटी तिला अधिक प्रवासाची संधी मिळाली. दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया व न्युझिलंड या देशांना तिने भेटी दिल्या. तेथील शाळा पाहिल्या, शिक्षकांशी चर्चा केली व विशिष्ट विद्यार्थ्यांच्या प्रश्नाचा अभ्यासही केला.

त्याकाळांत तिचे शिक्षणविषयक विचार तयार झाले होते. ऑटवाच्या सरकारी शाळेत ते अमलात आणण्याची ती वाट पाहात होती. १९२७ मध्ये ती मायदेशी परतली. तिचा उत्साह दांडगा होता. तिच्या कल्पना साकार होण्याची वेळ आली. शहराच्या सुपरिंटेंडंट ऑफ स्कूलसनी तिला सुपरवायझर ऑफ स्पेशल एज्युकेशन नेमले.

"हे कार्य फार मोठे आहे" सुपरिंटेंडंटने तिला बजावले. "त्याची आता कोठे सुरवात आहे. आतापर्यंत ऑटवामध्ये विशिष्ट वर्गांची अशी संघटित योजना नव्हतीच."

"माझा अनुभव असा आहे कीं, कोणतंही मोठं काम पार पाडायचा उत्तम मार्ग म्हणजे कामाला एकदम सुरुवात करायची." फ्लॉरेन्स उत्तरली.

आठवड्याच्या शेवटी शहरांतील प्रत्येक शाळेच्या प्रमुखाकडे प्रश्नपत्रिका रवाना झाल्या. किती मुलांच्या विशिष्ट अडचणी होत्या ? कोणत्या प्रकारच्या अडचणी ? त्यांची नांवे ? त्यांचे पत्ते ? जन्मतारीख ? बौद्धिक चांचणीचा निकाल ? शारीरिक तपासणीचा निकाल ?

तिच्या उपक्रमाला चांगलीच साथ मिळाली. प्रत्येक शाळेने प्रश्नपत्रिका भरून पाठविली. प्रत्येकीला कांहीतरी सांगायचे होते. कांही मुलें हुषार असूनसुद्धा त्यांचेकडे विशेष लक्ष देण्यास शाळांना फुरसत नसे. कारण सामान्य विद्यार्थी बराच वेळ घेत. कित्येकांच्या बुद्धीची कुवतच कमी होती. शाळेचे शिक्षण पूर्ण करणे त्यांच्या आवाक्याबाहेर होते. पण त्यांचा झगडा मात्र चालूच असे. अनेक मुलें डोळ्यांनी अधू होती. पुस्तकांतील अक्षरे वाचणेही त्यांना शक्य नव्हते. मग फळ्यावरचे तर दूरच. बहिऱ्यांची एक वेगळीच अडचण होती. शिक्षक बोलत त्यांतील अक्षरही त्यांना ऐकू येत नसे. कांही

मुले दीर्घ आजाराने अंथरुणाला खिळली होती. त्यांना परत शाळेत येता येईल की नाही ह्याची शंका होती.

रात्री उशीरापर्यंत फ्लॉरेन्सच्या खोलीतील दिवा जळत असे. शनिवारचे करमणुकीचे कार्यक्रम तिने रद्द केले. "कामाचा ढीग पडला आहे." फ्लॉरेन्सने आपल्या मित्रांना सांगितलें.

या विशिष्ट समस्या हाताळू शकतील असे शिक्षक शोधणे आवश्यक होते. वारंवार वैद्यकीय सल्याचीही गरज पडे.

"हृदयव्यथा असलेल्या मुलांची समस्या कशी सोडवायची ? " फ्लॉरेन्स त्यांना विचारी, "त्यांच्यावर अभ्यासक्रमाची सक्ती किती असावी ? आणि क्षयरोगी विद्यार्थ्यांचे काय ? त्यांना सर्व वेळ बाहेर ठेवले तर त्यांच्या शिक्षणाचे काय ? मुलांचे कान व डोळे आपल्याला तपासून घेता येतील का ? या सगळ्या अडचणींवर आपण मात कशी करायची ?"

स्थानिक वैद्यकीय सल्ला ती घेत असे. ती स्वता मानसशास्त्राची तज्ज्ञ होती. ती सुरवातीला मुलांची वर्गवारी निश्चित करी. मंदबुद्धीचे व हुषार विद्यार्थी वेगळे काढी. त्यांच्याकरिता शिक्षणपद्धति ठरवून देई. हुषार मुलांचे शिक्षण लवकर संपविण्याची तिने सोय केली.

"प्रत्येकाला त्याच्या कुवतीप्रमाणे उत्कृष्ट शिक्षण मिळाले पाहिजे हें माझे ध्येय आहे" ती म्हणे.

नवीन पद्धतीचा परिणाम एकदम जाणवला नाही. तो कांही चमत्कार नव्हता. पण हळू हळू फ्लॉरेन्सने आपल्या शिक्षणपद्धतीला आकार दिला. शहरांतील प्रत्येक मुलाचें शिक्षण व त्याला पाहिजे असलेली मदत मिळण्याची त्यांत सोय होती. भावनेचा तोल गेलेल्या विद्यार्थ्यांकरिता खास वर्ग उघडले. नुसत्या ओठांच्या हालचालीवर आधारलेली बहिऱ्यांना वाचन शिकविण्याची सोय करण्यात आली. अधु दृष्टीच्या मुलांकरितां वेगळे वर्ग उघडले. अशक्त व पंगूंकरिता सूर्यकिरणात वर्ग चालू केले. व बौद्धिक शिक्षणास लायक नसलेल्यांकरिता धंदेशिक्षण चालू केले. आजारी मुलांच्या

शिक्षणाची सोय त्यांच्या घरींच केली. शिक्षकच त्यांच्या घरी ठराविक वेळी जात.

फ्लॉरेन्स डनलॉप केवळ देखरेखीचे काम करीत नसे. मुलांवर तिची असीम भक्ती असे. प्रत्येक मुलाची अडचण समजून घेणे ती महत्त्वाचे मानी. एका अंध मुलाने अंध बालवीरांच्या पथकात नांव घातल्याचे सांगितले तेव्हा तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले. कॅनडाच्या शोधाचे चित्र तिच्या घरांतील भिंतीवर कांहीं पंगु मुलांनी काढले त्याची तिला धन्यता वाटे. तो ठेवा ती फार जपत असे. लॅरी हा तिच्या आवडत्या विद्यार्थ्यांपैकी एक होता. तो मोटारअपघातात भयंकर जखमी झाल्यामुळे चाकाच्या खुर्चीवरून फिरत असे. त्याच्या अंगाभोवती जाडजूड पट्टे बांधले होते. "पंगु विद्यार्थ्यां-करिता आम्ही खास वर्ग सुरू केले. त्यांत लॅरी प्रथम दाखल झाला." ती म्हणाली. "परीक्षेत तो पहिला आला व त्याने मॅकगिल विद्यापीठात प्रवेश केला. आज तो टराण्टोमधील नामांकित वकील आहे. त्याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे."

पिंगट रंगाचा इझाबेल ही तिची दुसरी आवडती विद्यार्थिनी. "प्रथम तिच्या शिक्षकांना वाटले की तिची बौद्धिक वाढ अपुरी आहे. पण आम्ही बौद्धिक चांचणी घेतली तीत ती चांगलीच उतरली. पण तिच्या कानांची परीक्षा केली तेव्हा तिची खरी अडचण उघड झाली. तिला ऐकू येत नव्हते. ती संपूर्ण बहिरी होती. ओष्ठवाचनाच्या वर्गात आतां तिने नांव दाखल केले आहे. तिची प्रगति खरोखरीच प्रसंशनीय आहे. ती हस्तकौशल्यात फार हुषार असल्याचा शोधही आम्हाला लागला. तिने विणलेले स्वेटर व मफलर तुम्ही पाहाच एकदा."

दरवर्षी जूनमध्ये ऑटावांतले आपले काम पुरे झाले की पुस्तके घेऊन ती थेट न्यूयॉर्कला जात असे. कोलंबिया विद्यापीठाच्या ग्रीष्म वर्गांना हजर राहून तिने एम्. ए. व पीएच्. डी. ह्या पदव्या मिळविल्या.

मानसशास्त्र विभागाचे प्रमुख तिला म्हणाले, "प्रत्येक वर्षी तुम्ही नेमानें येथे येतां याची आम्हाला आंता चांगली सवंय झाली आहे. आमच्या ग्रीष्म वर्गाला तुम्ही नेहमी याल अशी आम्हांला अशा वाटते."

"जरूर." फ्लॉरेन्सने उत्तर दिले. "विशिष्ट शिक्षण पद्धतीचा प्रसार व्हावा असेंच मला वाटते." अकरा वर्षे या वर्गांना ती नेमाने जात असे.

तिने साऱ्या जगभर प्रवास केला. कॅनडाचे शिक्षक तिला परदेशांतील आपला वकील मानीत. जगांतील मानसशास्त्रांची प्रयोग-केंद्रें व विशिष्ट विद्यार्थ्यांचे वर्ग यांचे तिनें निरीक्षण केलें. ऑटावामधल्या स्वत:च्या कार्याबद्दलही व्याख्यानें दिलीं. साधारण मुलांच्या अभ्यासासाठी एक आंतरराष्ट्रीय मंडळ काढण्यांत आले. त्याच्या संस्थापकांमध्ये फ्लॉरेन्स डन्लॉपचाही समावेश होतो.

डॉ. डन्लॉप आपल्या शैक्षणिककार्यांत नेहमी मग्न असे. तरीही ऑटावाच्या कार्लेटन विद्यापीठाच्या स्थापनेत तिने भाग घेतला. संध्याकाळी मानसशास्त्राचे वर्गही ती अनेक वर्षे घेत असे. "तुम्ही संध्याकाळी घरी जात असाल त्या अगदी दमूनच नाहीं ?" तिचा एक विद्यार्थी म्हणाला.

"मुळींच नाही." डॉ. डन्लॉपनी उत्तर दिले. "आठवड्यातून एक दोन वेळेला नवीन लोकांचा परिचय होतो. नवीन नवीन गोष्टी ऐकू येतात. मग मन प्रसन्न राहातं."

"तुम्ही कधीच सुट्टी घेत नाही का ?" मुलाने विचारले.

"घेते तर ! माझं काम करतानाच मला विश्रांती मिळते." ती उत्तरली.

सुट्टीत ती प्रामुख्याने अमेरिकेला भेट देत असे. अमेरिकेंत ती खूपच प्रसिद्ध होती. त्या देशांतील सर्व शहरांतल्या शाळांकडून तिला बोलावणे येई विशिष्ट वर्ग सुरू करण्यासाठी तिच्या मदतीची याचना करण्यात येई. वॉशिंग्टन येथील अमेरिकेच्या शिक्षणखात्याने तिची सर्वप्रथम भेट घेऊन तिचा सल्ला घेतला. मेरीलँड, ओहियो व कॅलिफोर्नियांतल्या अनेक संस्था ह्यांच्यासाठी तिने शिक्षणसल्लागाराचे काम केले.

तरुण व मुलें यांच्यासंबंधीची एक परिषद व्हाईट हाऊसमध्ये १९६० साली भरली होती. अध्यक्ष आयसेनहॉवर यांनी त्या परिषदेचे डॉ. डन्लॉपला आमंत्रण दिले तेव्हा कोणालाही आश्चर्य वाटले नाही. तिच्या

अनेक चहात्यांना आनंद झाला. पण हा अभूतपूर्व बहुमान तिने आपल्या कार्याच्या आड येऊं दिला नाही. ऑटवाच्या वर्तमानपत्राचा बातमीदार तिला भेटावयास आला. पण खंबीरपणाने तिने कळविले, "मी काम बाजूस टाकून कुणालाहि भेटू शकत नाही." अगदी संध्याकाळी केवळ दहा मिनिटेच ती त्याला भेटली.

"पण हा सर्व गाजावाजा कशाकरिता ?" डॉ. डनलॉप म्हणाल्या. "जें काम करायलाच पाहिजे आहे तेवढेच मी करते आहे."

फ्लॉरेन्स डन्‌लॉपचा ६४ वा वाढदिवस जवळ आला. आयुष्याची ३० वर्षे तिने ऑटवाच्या सरकारी शाळांच्या सेवेत घालविली होती. "सार्वजनिक कार्यांतून निवृत्त होण्याची तुझी वेळ आली नाही का ?" तिच्या बहिणीने—एल्झीने—सुचविले.

"निवृत्त ?" तिने विस्मयाने प्रश्न केला. "मी वृद्ध झाले असे मला बिलकूल वाटत नाही. तीस वर्षांपूर्वी होते तशीच मी अजून आहे. मग निवृत्तीचे विचार येणार तरी कसे मनात ?"

बोलतांना तिच्या डोळ्यात चमक दिसली. आपली जागा घेणारी तितकीच लायक व्यक्ती तयार करण्याचे मार्ग तिने यापूर्वीच आखले होते. त्यानंतर कांही महिन्यांनी तिने आपली निवृत्ती जाहीर केली. तिच्या सन्मानार्थ मेजवान्यांचे व जेवणाचे भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

अशाच एका मेजवानीच्या वेळी एक स्नेही तिला म्हणाले, "तुम्हाला हवी असलेली विश्रांती तुम्ही आता घेणार तर ?"

डॉ. डन्‌लॉप गालांतल्या गालांत हसली. "निवृत्त झाले तरी निष्क्रीय होणार नाही." भेटीस आलेल्या चिंतातूर लोकांना उद्देशून ती म्हणाली, "मी म्हातारी झाली आहे असे का तुम्हाला वाटतें ?"

सॅनफ्रान्सिस्कोच्या सरकारी महाविद्यालयात विशिष्ट शिक्षणाची प्राध्यापिका म्हणून तिची नेमणूक झाली. केस पिकले होते पण उत्साह

कायम होता. "अनेक वर्षे या क्षेत्रांत मी काम केले आहे. त्या प्रश्नांचा अभ्यास केला आहे." ती म्हणाली. "तें सर्व ज्ञान तरुण शिक्षकांना देणे हे माझें कर्तव्य आहे. मी सोडलेले सूत्र हाती घरून त्यांनी कार्य पुढे चालू ठेवावे."

कॅलिफोर्नियामधील त्या नवीन आयुष्यात ती रमून गेली पण ऑटवा ती विसरली नाही. तें तिचे घर होते. १९६२ मध्ये तिचे वारंवार डोकें दुखूं लागले. मधून मधून तिला घेरी येई. ते दुखणे केवळ वृद्धपणाचेच नव्हते. डॉक्टरांच्या मतें गंभीर दुखण्याची ती चाहूल होती. त्यांनी हळुवार इशारा पण दिला. एका वर्षाच्या आंत तिने इहलोकाची यात्रा संपविली.

मरणोत्तर दुखवटयाचे संदेश जगाच्या कानाकोपऱ्यांतून आले. स्तुति-सुमनांचा वर्षाव झाला. "लोकांनी एवढं भावनेच्या आधीन कां व्हावं हेंच मला कळत नाही." ती म्हणाली असती. कारण तिने अशा स्तुतीला जिवंत-पणी कधींच थारा दिला नसता. "मी एक साधी शिक्षिका आहे." खरो-खरीच एक साधी शिक्षिका. तिने कॅनडाच्याच नव्हे तर जगाच्या शिक्षण-क्षेत्रात क्रांतिकारक कार्य केलें.

## १० : व्हर्जीनिया गिल्डरस्लीव्ह

व्हर्जीनिया गिल्डरस्लीव्ह कॉलेजमध्ये कां गेली ? पुष्कळांना विस्मय वाटला. तिचे उत्तर एकच "माझ्या आईला बरं वाटावं म्हणून." अनेकांचा अर्थातच त्यावर विश्वास बसत नसे. पण तिच्या म्हणण्यात सत्यता मात्र होती.

व्हर्जीनियाला बालवर्गापासूनच शाळेबद्दल उत्साह नव्हता. दोन मोठे भाऊ व अनेक पाळीव प्राणी होते. त्यांच्याबरोबर दिवसभर घरी खेळण्यात ती रमत असे. कोंदट व गर्दीच्या वर्गांत डांबून राहाणे तिला आवडत नसे. बेरीज, वजाबाकी व पाढे यांचा तिला मनस्वी तिटकारा.

पश्चिम भागांत ४८ नंबरच्या रस्त्यावर गिल्डरस्लीव्ह कुटुंब राहात असे. घराची बांधणी पिंगट दगडाची असून ते प्रशस्त होते. न्यूयॉर्कच्या पांचव्या ॲव्हेन्यूपासून ते फार दूर नव्हते. त्याकाळी तो शांत लोकवस्तीचा भाग होता. शहरांतील रहिवाश्यांना तो भाग उपनगरासारखा वाटे. पण आज मात्र हा भाग बँका, दुकानें व कचेऱ्या यांनी गजबजून गेला आहे.

१८७७ मध्ये व्हर्जीनिया गिल्डरस्लीव्हचा जन्म झाला. त्या कुटुंबात मुलांच्या खेळाची भरपूर साधने होती. दोन तीन कुत्रे, कांही ससे, पांढरे उंदीर, एक दोन साळींदर व कांही साप पण होते. मुलांना त्यांच्याशी खेळण्याचा कंटाळा आला की ती लपंडाव मांडीत. त्याकरिता जागाही भरपूर असे. संध्याकाळ झाली कीं माडीवर पळायचें. खिडक्यांचे पडदे सारून बाहेरची गंमत पाहायची. नगरपालिकेच्या दिवे लावणारांची धावपळ पाहाणे हा त्यांचा आवडता छंद होता.

पहिल्या दिवशीं शाळेत व्हर्जीनिया एकच वाक्य वाचावयास शिकली. तिला फार आनंद वाटला. सबंध पुस्तक तिनें भरभर वाचून काढलें. हळूहळू घरच्या ग्रंथालयातील प्रत्येक पुस्तक वाचण्याचा ती प्रयत्न करूं लागली. डिकन्स आणि मार्कट्वेन् ह्यांची पुस्तकें, चेंबरचा विश्वकोश आणि तिच्या भावाने आणिलेल्या सवंग कादंबऱ्याही तिने सोडल्या नाहींत.

"पुस्तकांतल्या किडया बाहेर ये. जरा खेळूं या." भावाने तिला थट्टेनें हाक मारली. वाचनालयांतल्या कोचावरच्या तिच्या जागेवरून तो तिला ओढी.

"ऊं ! थांबरे जरा एवढें प्रकरण संपविते." त्याच्या बोलण्याकडे तिचें लक्षच नसे.

हॅरी तिच्यापेक्षा सातच वर्षांनी मोठा होता. पण तिच्या जन्मापासून तोच तिचा पालक झाला होता जणू. तिला सेंट्रलपार्कमध्ये नेहमी आपल्या बरोबर नेई. त्याचे बागेत धावणे खेळणे नेहमीच चाले. बागेंतून दिसणाऱ्या आगगाड्यांची ये जा पाहण्यात तीं रमून जात. कोलंबिया विद्यापीठात तो शिकत होता. तेव्हा त्याने व्हर्जीनियाला ग्रंथालयसुद्धा दाखविण्यास नेले.

"मला थोडे काम आहे." त्याने थोडे समजावून सांगितले. "ते संपेपर्यंत पुस्तक घे आणि वाचीत बैस."

तिने भोवताली नजर टाकली. दिव्यांना हिरव्या शेड्स् लावल्या होत्या आणि पुस्तकांच्या रांगा छताला भिडल्या होत्या. "मला येथे बरे वाटते."

मनाशी तिने ठरविले. आपल्या आयुष्यांत कोलंबियाचा भाग फार मोठा असेल याची तिला पुसटहि कल्पना नव्हती.

१८९१ सालचा उन्हाळा संपत आला. व्हर्जीनिया गिल्डरस्लीव्ह व तिचे दोघे भाऊ ह्यांना विषमज्वराने पछाडले. हॅरीचा ताप विशेष तीव्र नव्हता तो लवकरच बरा झाला. व्हर्जीनियाचे दुखणे मात्र रेंगाळले. बरेच दिवस ताप उतरलाच नाही. तीन ऑक्टोबर १८९१ ला तिला चौदा संपून पंधरावे लागले तेव्हांही ती चांगली वरी झाली नव्हती, तिला आनंद वाटावा म्हणून आईवडिलांनी तिला एक सोन्याचे सुबक घड्याळ बक्षीस देण्याचे ठरविले. हॅरीने समारंभास साजेसे भाषण करावयाचे ठरविले.

"आपल्या कुटुंबात व्हर्जीनिया सर्वांना फार हवीहवीशी वाटते. तिच्यावरच्या प्रेमाचे प्रतीक म्हणून मी तिला ही भाषणाची छोटीशी भेट देत आहे."

त्याने गंभीरतेचा आव आणला. भाषण संपवले. लवून सर्वांना अभिवादन केले व खाली उतरला. तांबड्या फितीत बांधलेली घड्याळाची पेटी तिच्या हातांत दिली.

"घड्याळ ! आणि सोन्याचे !" ती मोठ्याने ओरडली. "आतां मला लवकर बरे झाले पाहिजे. त्याशिवाय घड्याळ कसं घालतां येणार ?"

ती लवकरच बरी झाली पण हॅरीचे दुखणे उलटले. तिचें भावावर निरतिशय प्रेम होते. विषमज्वराने जोर केला. अखेर त्यांतच त्याचे दुःखद निधन झाले.

"त्या काळ्याकुट्ट दुर्दैवी घटनेने माझ्या आयुष्याचे दोन भाग केले." त्या प्रसंगाची आठवण झाली की तिला भडभडून येई.

घरांतील आनंदी वातावरणावर विरजण पडले. कळा पार बदलून गेली. कुटुंबावर अवकळा पसरली. मिसेस गिल्डरस्लीव्ह कोणाचेही स्वागत करण्याच्या मनस्थितीत नव्हती. चहापार्ट्या व मेजवान्या साहजीकच बंद

पडल्या. व्हर्जीनिया तर सारखी वाचनालयांतच बसलेली असायची. अन्य कशातच तिचे मन रमत नसे.

कोलंबिया विद्यापीठात हॅरीची हुषार विद्यार्थ्यांत गणना होत असे. त्याने वकिलीला सुरुवात केली होती. त्यांतही तो चमकेल असे दिसत होते. आईला आता हॅरीच्या जागी व्हर्जीनियाच होती. तिच्या शिक्षणाकडे भरपूर लक्ष देण्याचे आईने ठरविले.

जानेवारीत व्हर्जीनिया आजारांतून संपूर्ण बरी झाली. भावाच्या वियोगाचे दु:ख ती विसरू शकत नव्हती. मनाची व्यथा कायम होती. ब्रेअरली स्कूल रॅडक्लिफच्या प्रवेशपरीक्षेकरिता मुलींची तयारी करून घेत असे. ती शाळा नुकतीच स्थापन झाली होती. शाळा यथातथा नव्हती याचा चालकांना अभिमान होता. अभ्यासाशिवाय अन्य कोणत्याच गोष्टी तेथे चालत नसत. वागण्याच्या चालीरीती आणि बारकावे मुलींनी घरींच शिकाव्या अशी अपेक्षा असे. शाळेंत जर्मन, फ्रेंच, लॅटीन ह्या भाषा, गणित और प्रौढ मुलींना पाठ करता येईल अशा अन्य विषयांचा समावेश असे.

अभ्यासाबद्दल फारसा उत्साह नसलेल्या व्हर्जीनिया गिल्डरस्लीव्हला हा शिक्षणक्रम त्यावेळी आवडण्यासारखा नव्हता. कांही वर्षांनी तिचे मन बदलले हे वेगळे. वर्ष संपतांच तिला कॉलेजमध्ये पाठविण्याची भाषा आईने सुरू केली.

"तुला बुद्धी आहे" आई ठामपणे म्हणाली. "मग तुझ्या भावांसारखे चांगले शिक्षण घेण्यास काय हरकत आहे ?"

ब्रेअरलीच्या शिक्षकांनी तिला ब्रिन मॉवर शाळेंत नाव घालण्याला सुचविले. पण मिसेस गिल्डरस्लीव्हने तिकडे दुर्लक्ष केले. "अतिशय उत्तम असे कॉलेज इथे न्यूयॉर्कमध्येच आहे."

१८८९ मध्ये नुकतेच कोलंबिया विद्यापीठाने स्त्रियांसाठी एक कॉलेज उघडले होते. त्या विद्यापीठाच्या प्रमुखांपैकी एक कर्तबगार प्रमुख बर्नर्ड

ह्यांच्या नावाने स्थापन झालेले बर्नर्ड कॉलेज मॅडिसन अॅव्हेन्यूत एका जुन्या पिंगट रंगाच्या घरांत भरत असे.

मुलीला घेऊन मिसेस गिल्डरस्लीव्ह त्या संस्थेत गेली. व्हर्जीनिया नाखुषच होती. "वर्ष दोन वर्षे माझ्या मुलीला खास गणिताचे शिक्षण घ्यायचे आहे." आईने प्रमुखांना सांगितले.

"आमच्या येथें खास विद्यार्थ्यांची सोय नाही. प्रत्येकाला चार वर्षांचा संपूर्ण अभ्यासक्रम पुरा करावा लागतो. सर्व प्रकारच्या प्रवेश परीक्षाही आयोजित केलेल्या आहेत."

परीक्षेच्या विषयांची लांबलचक यादी कॉलेजप्रमुखांनी सांगितली आणि व्हर्जीनियाने सुटकेचा दीर्घ श्वास सोडला.

"ग्रीक भाषा मी कधीच शिकले नाही." बाहेर जातांना तिने आईला बजावले. ती आनंदांत होती. "बरं झालं कॉलेजची कटकट मिटली."

"असं कोठं झालंय का? तुला कॉलेजमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी आपल्याला दुसरे मार्ग शोधले पाहिजेत."

ती ब्रेअरीला परतली. खास वर्गांत लगेच तिने प्रवेश केला व ग्रीक भाषेच्या अभ्यासाला सुरुवातही केली. त्यानंतर तिने एकही क्षण वाया जाऊं दिला नाही. बर्नर्ड कॉलेजच्या प्रवेश परीक्षेच्या तयारीचा तिने चंग बांधला. जून महिना आता सुरू झाला होता. एके दिवशी सकाळी ३४३ मॅडिसन अॅव्हेन्यूत ती हजर झाली. परीक्षेची तिची तयार पूर्ण झाली होती.

गणित तर तिच्या आवडीचा विषय. तो पेपर चांगला गेला. नंतर रोमचा इतिहास. "सर्व रोमन सम्राटांची नांवे व तारखा द्या." तिने पहिला प्रश्न वाचला.

बरेंच डोकें खाजविलें. पहिले नांव लिहिले ऑगस्टस. टायबेरिअस दुसरा असावा असे तिला वाटले पण पुढे सगळे सपाट.

परीक्षा संपली. "मी नक्कीच नापास होणार" ती निराश झाली. बर्नार्ड येथे प्रवेश मिळणार नाही ह्याचा तिला आनंद झाला नाही. उलट

राग आला स्वताच्या बेअकलीपणाचा. "मला कॉलेजमध्ये गेलेंच पाहिजे. ज्ञान संपादन केलेंच पाहिजे."

व्हर्जीनियाला अखेर कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला. रोमन सम्राटांसंबंधी तिला कांही माहिती नसली तरी इतर विषयात तिला चांगलेच मार्क मिळाले होते. १८९५ मध्ये तिला अठरावे संपून एकोणीसावे वर्ष सुरू झाले. त्या वर्षीं तिने कॉलेजांत प्रवेश केला. वर्गांत ती नवीन होती आणि अजूनही कॉलेजांत राहाण्याला तिचे मन तयार झाले नव्हते. बरोबरीच्या विद्यार्थ्यां-बद्दल तिचे मन अनुकूल झाले नाही. कॉलेजची इमारत जुनाट होती. तीही तिला मुळींच आवडत नव्हती. शयनगृहांचे वर्ग केले होते आणि तळघरांत कपडे करायची जागा केली होती. एके दिवशी वर्गाधिकाऱ्यांची निवडणूक व्हायची होती. "इथें एक विद्यार्थिनी अशी आहे की तिची कोणत्याही जागेवर निवड होणार नाही. ती विद्यार्थिनी म्हणजे व्हीसीजी." खिन्न मनाने विचार करीत ती मागील बाकावर एकटीच बसली होती.

पण चमत्कार असा घडला की ही नवीन विद्यार्थिनी अभ्यासांत रमूं लागली. वर्गांत २१ विद्यार्थिनी होत्या. त्यांपैकीं अनेकींशी तिची गट्टी जमली. हां हां म्हणता कॉलेजचे दुसरे वर्ष सुरू झाले आणि व्हर्जीनिया वर्गप्रमुख म्हणून निवडून आली. तिचे कॉलेजचें आकर्षण वाढू लागले. त्याला कारणही तसेंच घडले. मॅडिसन अॅव्हेन्यूमधून कॉलेज दुसरीकडे हलविण्याचे ठरले. मॉर्निंगसाईड हाइडस् नांवाच्या भागांत कोलंबिया विद्यापीठाच्या नवीन इमारती तयार झाल्या होत्या. त्यांच्या शेजारीच प्रशस्त पटांगणात कॉलेजची नवीन इमारत उभी होती.

आईला खूष करण्याकरिता कॉलेजला गेलेली व्हर्जीनिया १८९९ मध्ये कोलंबिया विद्यापीठाची बी. ए. झाली. पदवीधराची पुठ्ठ्याची टोपी डोक्यावर घातलेली आणि पदवीपत्राची गुंडाळी हातांत घेतलेली ही नवीन पदवीधर नुसती वर्गप्रमुखच नव्हती तर सर्वांत हुषार विद्यार्थिनी पण होती. तरीहि तिच्या मनांत नवीन निद्यार्थिनीसारखीच एक प्रकारची

अंधुकशी भीती घर करून राहिली. "माझं शिक्षण संपलं." ती आतां मनाशीं विचार करूं लागली. "पण आतां पुढे काय ?"

पुढें काय याची तिला यत्किंचतही कल्पना नव्हती. पण पदव्युत्तर शिक्षणाकरिता तिला शिष्यवृत्ती मिळाली. तिने इतिहास घेऊन एम्. ए. व्हायचें ठरविले. आयुष्यांत पुढे काय व्हायचे याची वर्षानंतर सुद्धा तिला कल्पना आली नाही.

"एक वर्ष स्वस्थ बसावे व विश्रांती घ्यावी." तिने आईवडिलांना सांगितलें.

त्यांनाही पण ते पटले. "तूं खूप झटून अभ्यास केलास" वडील म्हणाले. "माझ्या मतें तुला विश्रांती हवी."

कांही आठवड्यांच्या आंतच तिची विश्रांती एकदम संपली. बर्नार्डच्या इंग्रजी प्रोफेसरांकडून तिला एक चिठ्ठी आली. "आम्ही या वर्षी इंग्रजीचा एक जादा वर्ग सुरू करणार आहों. तुम्ही शिक्षिका म्हणून याल का ?"

व्हर्जीनियाला या कल्पनेची गम्मत वाटली. "मी वर्गांत बांकावर बसत होते. आता बाकासमोर बसावे लागणार याची मजा तर पाहूं."

व्हर्जीनिया क्रोरोरॉन गिल्डरस्लीव्ह अशा प्रकारे शिक्षिका झाली व तिने त्यांत यश संपादन केले. तिच्या कर्तृत्वाबद्दल प्रो. ब्रूस्टरना खात्री पटली इतकी की लवकरच तिला कॉलेजच्या दुसऱ्या वर्गाच्या आवश्यक इंग्रजीची शिक्षिका म्हणून बढती देण्याचे त्यांनी ठरविले.

व्हर्जीनियाने नम्रतेने ती जागा नाकारली. "कॉलेजमध्ये जाऊन मला डॉक्टरेटचा अभ्यास करावयाचा आहे."

व्हर्जीनिया फिरून एकदा अभ्यास व परीक्षा यांत दंग झाली. १९०८ चे सुमारास दुसरी पदवी तिला घ्यावयाची होती. पदवीदान समारंभाचा पोषाख तिने अंगावर घातला. तिचा उत्साह पहिल्या इतकाच दांडगा होता. पोषाख शानदार होता. तिने मखमली पट्टे असलेला सुंदर रेशमी झगा,

निळ्या-पांढऱ्या पट्ट्याचे कोलंबिया विद्यापीठाचे स्कंधवस्त्र, जरीच्या गोंड्याची मखमली टोपी. सर्व कांही तिला शोभून दिसत होते. पुढे अशा अनेक प्रसंगी तिला हा पोषाख घालावयाचा होता.

शिक्षण संपवून ती बर्नार्डला माघारी आली. पण मोठ्यांच्या झगड्यांत सापडली. बर्नार्ड कॉलेजच्या डीनची जागा रिकामी होती. कॉलेजच्या विश्वस्तांनी त्या जागेवर एका स्त्रीची नेमणूक करण्याचा आग्रह धरला. पण कोलंबिया विद्यापीठाचे अध्यक्ष बटलर त्या जागेकरिता एकादा पुरुष शोधण्याच्या खटपटीत होते. पुढे त्यांनी आपला विचार बदलला. पण आता ती जागा पत्करण्यास कोणीही व्यक्ती सांपडणे अशक्य झाले.

"कोणती सभ्य स्त्री ही जागा पत्करील ?" एका प्रोफेसरांनी खोचून विचारले. "विश्वस्त व अध्यक्ष यांच्या झगड्यांत त्या बिचारीचा चुराडाच होईल."

एके दिवशी दुपारी व्हर्जीनियाला कोलंबियाला विद्यापीठाच्या अध्यक्षांचें बोलावणे आले. ती ऑफिसमध्ये त्यांना भेटावयास गेली. "हे बोलावणे कशासाठी आहे याची मला अंधुकशी कल्पना आहे."

भेटीच्या सुरुवातीलाच बटलरनी तिची आशंका पक्की केली. "बर्नार्ड कॉलेजच्या डीनची जागा पत्करणे तुम्हाला आवडेल का ?"

"डीनची कामं काय राहतील त्याच्यावर सर्व अवलंबून राहील." तिने ठांसून उत्तर दिले. "माझी सध्याची शिक्षकेची जागा चांगली आहे. नुसतं विद्यार्थ्यांवर देखरेख करण्यासाठी ही जागा मला सोडावयाची नाही. आणि बर्नार्ड कॉलेजची मी डीन होणार असेन तर शिक्षणाबद्दलचीं माझी कांही मते आहेत ती मान्य झाली पाहिजेत."

अध्यक्ष बटलरनी कांहीही अभिवचन दिले नाही पण कांही दिवसांनंतर तिला एक पत्र पाठविलें. सोबत डीनला देऊं केलेल्या विविध अधिकारांची यादी जोडली होती. तरीही व्हर्जीनिया कांकूं करीत होती. अध्यापनावर तिचे प्रेम होते. तो व्यवसाय सोडणे तिच्या जिवावर आले. पण बर्नार्डवरही

तिचे प्रेम होते. नालायक लोकांचे हातांत बर्नार्डचा कारभार जाऊं देणे तिला पसंत नव्हते. अखेर तिची कॉलेजवरची निष्ठा श्रेष्ठ ठरली. आणि १ फेब्रुआरी १९११ या दिवशी व्हर्जीनिया बर्नार्ड कॉलेजच्या डीनपदी विराजमान झाली.

व्हर्जीनिया अवघी तेहतीस वर्षांची होती. वयाच्या मानाने फारच मोठी जबाबदारी तिने पत्करली होती. पहिल्या दिवशी ती ऑफिसमध्ये गेली तेव्हा अगदी गांगरली याची कबुली पुढे तिनेच दिली.

"पण मला कामाला सुरुवात कधीतरी करायला हवीच." अखेर निर्णय घेऊन तिने स्वताला सावरले. टेबलावरची घंटा वाजविली व सेक्रेटरीला बोलाविले व देशांतील या अग्रगण्य महिला विद्यापीठाचे प्रश्न एकामागून एक हाताळण्यास सुरुवात केली.

"कांही दिवसांनी मी मोटार चालवायला लागले. मोटारची मला प्रथम विशेष माहिती नव्हती. कुठें ओढ, तर कुठे ढकल, तर कधी पायानेच दाब असा प्रकार चालायचा. डीनच्या खुर्चीवर बसल्यावर मला अगदी तसाच अनुभव आला."

विश्वस्त व अध्यक्ष यांच्या झगडयांत तिचा चुराडा तर झाला नाहींच उलट लवकरच सर्व परिस्थिती तिने आटोक्यांत आणली. शिक्षणाचा दर्जा वाढविण्यावर तिचे विशेष लक्ष होतें.

"मुलांच्या प्रमाणे मुलींनाही खूप अभ्यास द्या." कोलंबियाहून कांहीं प्रोफेसर बर्नार्ड कॉलेजमध्ये व्याख्याने देण्यास येत, त्या सर्वांना तिचें आग्रहाचे सांगणे असे. विद्यार्थिनीना मिळालेले गुण जाहीर करण्याची पद्धत तिनेंच सुरू केली. "कोणाला किती गुण मिळाले व कोण नापास झाले हें सर्वांनाच कळायला हवे. निकाल जाहीर झला की मुले आपोआपच अभ्यासांत लक्ष घालूं लागतील."

"ही सूचना अमलांत आणल्याखेरीज त्याचे परिणाम तुम्हांला कळायचे नाहीत" आळशी मुलींना अभ्यासाला लावण्याच्या उद्देशाने ती सांगत असे. "मनाला चालना देण्यात एक प्रकारची मौज असते."

शिस्त व मुलांचे वर्तन या विभागावर एक मदतनीस नेमली होती. पण एक दोन प्रसंगीं डॉ. गिल्डरस्लीव्हला स्वताच लक्ष घालावे लागले. प्रसंग लहानच होते. कॉलेजच्या अंडरग्रॅज्युएट ॲसोसिएशनची अध्यक्ष असलेली मुलगी डोक्यावर हॅट न घालतां ब्रॉडवे रस्ता ओलांडून विद्यापीठाकडे गेली होती. बर्नार्ड कॉलेजात सर्वांना धक्का बसला. दुसरी घटना १९१५ मध्ये घडली. दरवर्षी उन्हाळ्यांत खेळाचे सामने होत. या वर्षी मुलांनी अनवाणीच खेळांत भाग घेतला. तें शिस्तीला सोडून होते. आजच्या काळात या घटनेकडे कोणाचे लक्षही गेले नसते. पण त्या काळी त्या गोष्टी गंभीर समजल्या जात.

न्यूयॉर्कमध्ये वेगवेगळ्या वंशांचे लोक राहातात. आयरिश, इटालियन, स्लोव्हाक आणि जर्मन वगैरे अनेक लोक तिथे आहेत. अशा विविध राष्ट्रियत्वाच्या व विचारसरणीच्या लोकांची तिला माहिती असल्यामुळे त्यांचे महत्त्वही ती जाणून होती. म्हणून बर्नार्डच्या कॉलेजांत विविध प्रकारचे विद्यार्थी असावे असा तिचा प्रयत्न असे.

"निरनिराळ्या धर्मांच्या, समाजाच्या व वेगवेगळ्या आर्थिक दर्जाच्या विद्यार्थ्यांना वाव द्या." प्रवेशाबाबत नेमलेल्या खास अधिकाऱ्यांना तिची सूचना असे. "वेगवेगळ्या प्रकारच्या लोकांची माहिती असणे, त्यांना समजून घेणे हे सुद्धा एक शिक्षणच आहे."

डीनची जागा तिने घेतली व तिची दृष्टी विशाल होऊं लागली. तिला सारें जग जवळचे वाटूं लागले. पहिले महायुद्ध संपल्यानंतर पदवीधर स्त्रियांची आंतरराष्ट्रीय संघटना स्थापण्यास तिने मदत केली. "जगांतील विद्यापीठांतील महिलांमध्ये मैत्री व सद्भावना निर्माण करणे, त्यांचे हितसंवर्धन करणे, एकमेकांच्या देशाबद्दल सहानुभूतीची व मदतीची भावना वाढविणे" हें त्या संघटनेचे ध्येयवाक्य होते.

आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील तिचे कार्य फार मोठे होते. इंग्लंड, स्कॉटलंड, हंगेरी व नॉर्वे वगैरे देशांतील अनेक लोकांबरोबर तिची मैत्री झाली. तुर्कस्थानांत इस्तंबुल येथें मुलींसाठीं एक अमेरिकन कॉलेज होतें. त्याच्या

विश्वस्त बोर्डावर तिची नेमणूक झाली. बाह्य जगाचा खूप अनुभव तिच्या पदरी पडला. त्याचा फायदा बर्नार्डला द्यायचे तिने ठरविले. तिच्या आग्रहावरून जगांतील निरनिराळ्या प्रोफेसरांच्या भेटीचा कार्यक्रम ठरविण्यात आला. बर्नार्डच्या परिसरांत अनेक देशांतील महिला प्रोफेसर येऊन राहात. इंग्लंड, स्पेन, फ्रान्स, जर्मनी वगैरे देशांतील अनेक विद्वान महिलांनी बर्नार्ड येथे व्याख्याने दिली. विविध विषयांवरील परिसंवादांत भाग घेतला.

विद्यार्थिनींना शिष्यवृत्त्या सुरू करण्याबद्दल डॉ. गिल्डरस्लीव्हने विशेष जोर धरला. शिष्यवृत्तीतून वसतिगृहाचा खर्च, जेवणाचा खर्च व फी भागावी असा तिचा उद्देश होता. स्नेह्यांनी तिच्या विनंतीला मान दिला. उदारपणे मदत मिळूं लागली. जगांतील कानाकोपऱ्यातून आलेल्या अनेक स्त्रियांचे बर्नार्डच्या कॉलेजात स्वागत झाले. "यामध्ये त्या मुलींचा फायदा होतो तसा आपलाही." डॉ. गिल्डरस्लीव्ह म्हणे.

जगांतील जनता जवळ यावी. एकमेकांचे विचार समजावून घेण्यास मदत व्हावी या हेतूने डॉ. गिल्डरस्लीव्हने आंतरराष्ट्रीय भूमिकेवरून विविध प्रश्नांचा अभ्यास करण्याचा कार्यक्रम आंखला. त्यांत भाषा, साहित्य व वेगवेगळ्या देशांची संस्कृती यांचा समावेश होता.

नामांकित शिक्षणतज्ज्ञ व आंतरराष्ट्रीय सद्भावनांची पुरस्कर्ती या दोन गुणांनी तिला अधिकच पुढे आणलें. एका महत्त्वाच्या जागेवर तिची नेमणूक झाली. १९४५ मधील एका संध्याकाळी जेवणापूर्वी ती विश्रांती घेत होती. तिची घर सांभाळणारी बाई खोलीच्या दरवाजापाशी आली आणि म्हणाली, "तुम्हाला बहुमान मिळाला. तुमचे अभिनंदन करण्याचा पहिला मान मला मिळूं द्या."

"कशाबद्दल ?"

"सॅन्फ्रान्सिको परिषदेकरिता तुम्हाला प्रतिनिधी निवडले आहे. मी आतांच रेडिओवर ऐकले."

डॉ. व्हर्जीनिया गिल्डरस्लीव्ह एकदम गोंधळून गेली. प्रथम तिचा विश्वास बसेना. दुसऱ्या दिवशी सकाळच्या वर्तमानपत्रात संयुक्त राष्ट्रांची सनद तयार करण्याचे काम ज्या परिषदेकडे दिले होते तिच्यावरच्या अमेरिकन प्रतिनिधींची नांवे प्रसिद्ध झाली त्यांत व्हर्जीनिया ही एकमेव स्त्री-प्रतिनिधी होती.

संयुक्त राष्ट्रांची सनद मंजूर झाली. पण तेवढयाने डॉ. गिल्डरस्लीव्हचे कार्य संपले नाही. जनरल डग्लस मॅकार्थर जपानमध्ये कार्य करीत होते. पराभूत राष्ट्राची शैक्षणिक पुनर्रचना करण्याचे काम जनरल मॅकार्थरनी एका अमेरिकन मंडळावर सोपवले होते त्यांत डॉ. गिल्डरस्लीव्ह ही होती.

परराष्ट्र खात्याने जपानी लोकांचीं वैशिष्टयें आणि जपानी शिक्षणपद्धती ह्यांविषयी तिला थोडक्यात माहिती दिली. त्यांत तिला कांही कठीण वाटलें नाही. कठीण वाटली ती एकच गोष्ट. "विजार घातल्य शिवाय लष्करी विमानाने प्रवास करता येणार नाही" हा सरकारी हुकूम.

"पण मी मुळी विजार कधी वापरलीच नाही." ती म्हणाली.

"नाइलाज आहे." उत्तर आले. "सरकारी हुकूम"

धांवपळ केली. न्यूयॉर्कची सर्व दुकाने धुंडाळली तेव्हां एक विजार मिळाली आणि गिल्डरस्लीव्हचे विमान पश्चिमेच्या रोखाने पूर्वेकडे झेप घेऊं लागले.

जपानच्या प्राचीन शिक्षणपद्धतींत अमेरिकन निरीक्षकांना बदल घडवून आणायचा होता. पण हें काम सोपे नव्हते. तथापि नवीन लोकशाही राजवाटीला अनुकूल अशा कांही सूचना त्यांनी केल्या. त्यांच्या वास्तव्याने जपानी लोकांचे खचलेले नीतीधैर्यही सुधारले. जपानच्या इतिहासांतला तो एक अत्यंत निराशामय कालखंड होता. एक जपानी शिक्षणतज्ज्ञ व्हर्जीनियाला म्हणाला, "तुमचे स्नेहपूर्ण कार्य आम्ही कधीही विसरणार नाही."

१९४६ साली डॉ. गिल्डरस्लीव्ह निवृत्त झाली. देशाची व कॉलेजची तिने केलेली सेवा अभिमानास्पद होती. व तिची कारकीर्द उल्लेखनीय होती."

त्रस्त अशा आजच्या जगांत, वर्गांत काय किंवा वर्गाबाहेर काय, शिक्षक चांगले कार्य करू शकतात ह्याचे डॉ. गिल्डरस्लीव्हचे चरित्र हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
REFBK-0015921

# हो अशीं चरित्रे म्हणजे

## तुमच्या कर्तबगारीला आवाहन !

| | |
|---|---|
| * चर्चिल : ब्रिटनचा पोलादी पुरुष | रु. २·०० |
| * क्रिस्टफर कोलंबस : जगप्रसिद्ध प्रवास वृत्तान्तासह | रु. २·५० |
| * संशोधक जादूगार : जगप्रसिद्ध संशोधक वेस्टिंगहाउस | रु. ३·०० |
| * एलिनार रुझवेल्ट : उद्बोधक जीवनचरित्र | रु. २·०० |
| * अर्वाचीन भारतीय शास्त्रज्ञ : द्वा. वा. केळकर | रु. १·७५ |
| * महाराष्ट्राच्या कर्तृत्वशालिनी : ऐतिहासिक स्त्री-चरित्रे | रु. २·०० |
| * नामयाची जनी : संशोधनपूर्ण चरित्र : रा. चिं. ढेरे | रु. १·७५ |
| * पै पैशानें कुबेरपद : कल्पक अमेरिकन व्यापाऱ्याचे चरित्र | रु. २·०० |
| * दूरध्वनीचा जनक बेल : सर अलेक्झांडर ग्रॅहम बेल | रु. १·७५ |
| * वुड्रो विल्सन : अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचे चरित्र | रु. २·०० |
| * राईट बंधु : पहिले विमान संशोधक बंधु | रु. २·०० |
| * अॅब्राहम लिंकन : अमेरिकेंतील गुलामांचा मुक्तिदाता | रु. १·५० |
| * हेन्री फोर्ड : प्रख्यात मोटार कारखानदार | रु. २·०० |
| * लिंडन जॉन्सन : अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष | रु. २·५० |

व्होरा अॅन्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई २.